CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, २० नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २९० | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



'स्वदेशी' एक 'विचार' आहे, एक 'जीवन-दर्शन' आहे आणि त्याला संवेदनेची सोनेरी किनारसुद्धा आहे. त्यात स्वावलंबनाची जिद्द आहे, गुलामीविषयी घृणा आणि स्वातंत्र्याविषयी सळसळता उत्साह आहे. म्हणून स्वदेशीच्या संदर्भात आपण आपले विचार आणि विचार प्रणालीचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये आपले आचरण देखील स्वदेशी असले पाहिजे. स्वावलंबनाची निर्मिती स्वदेशी विचारांमधून होते.

- **बिंदुमाधव जोशी**
  संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत

## विनम्र अभिवादन



संत गाडगेबाबा यांची आज पुण्यतिथी

## महत्त्वाचे



### भारताने सलग ८ वी टी-२० मालिका जिंकली

**अहमदाबाद :** भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धची ५ सामन्यांची टी-२० मालिका ३-१ अशी जिंकली आहे. शुक्रवारी खेळल्या गेलेल्या ५ व्या सामन्यात संघाने दक्षिण आफ्रिकेचा ३० धावांनी पराभव केला. २३२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, भारतीय गोलंदाजांनी अहमदाबादमध्ये दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ८ गडी बाद २०१ धावांवर रोखले. वरुण चक्रवर्तीने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराहने २ विकेट्स घेतल्या. क्विंटन डी कॉकने ३५ चेंडूत ६५ धावा केल्या. तत्पूर्वी, भारतीय संघाने तिलक वर्मा आणि हार्दिक पंड्याच्या अर्धशतकांच्या मदतीने २० षटकांत ५ गडी बाद २३१ धावा केल्या. तिलकने ४२ चेंडूत ७३ धावा केल्या, तर पंड्याने २५ चेंडूत ६३ धावा केल्या. संजू सॅमसनने ३७ धावा आणि अभिषेक शर्माने ३४ धावा केल्या. पंड्याने १६ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारतीय संघाकडून हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक आहे. युवराज सिंगच्या नावावर भारतीय संघाकडून सर्वात जलद अर्धशतक (१२ चेंडू) करण्याचा विक्रम आहे.

# बांगलादेशात आगडोंब

**भारतीय उच्चायुक्तालयांवर हल्ले** | **हादीच्या मृत्यूनंतर कट्टरपंथीयांचा उन्माद** | **२८ पत्रकारांना जाळण्याचा प्रयत्न** | **हिंदू तरुणाला झाडाला उलटे टांगून जाळले**





शरीफ हादीचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर उन्मादी जमावाने ढाक्यात एकत्र येऊन हिंसाचार सुरू केला. आंदोलकांनी जाळलेल्या प्रोथोम ओलो या दैनिकाच्या कार्यालयाजवळील पुस्तकाच्या दुकानालाही आग लावण्यात आली. आगीतून वाचलेली पुस्तके उचलताना चिमुकली. या चिमुकलीला पुस्तकाचे महत्व कळले पण हिंसाचार करणाऱ्यांना नाही

◆ **ढाका, १९ डिसेंबर**

माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा कट्टर विरोधक आणि भारताविरोधात गरळ ओकणारा इन्कलाब मंचचा प्रवक्ता ३४ वर्षीय शरीफ उस्मान हादी याचा गुरुवारी मृत्यू झाल्यानंतर बांगलादेशातील कट्टरपंथीयांनी गुरुवारी रात्री अक्षरशः धुडगूस घातला. जाळपोळ करीत चितगाव, ढाकासह चार भारतीय उच्चायुक्तालयावर हल्ले चढविले. याशिवाय दोन वर्तमानपत्रांच्या कार्यालयांना आग लावत २८ पत्रकारांना जाळण्याचा प्रयत्न केला.



शरीफ हादी

कट्टरपंथीयांनी हिंदू नागरिकांनाही लक्ष्य करीत ईशनिंदेच्या आरोपात एका हिंदू तरुणाला झाडाला उलटे टांगून जाळले. यात त्याचा मृत्यू झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लष्कराला तणाव असलेल्या भागात तैनात करण्यात आले. निदर्शकांनी बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबुर रहमान यांच्या घराची तोडफोड केली. हादीवर चार दिवसांपूर्वी अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. प्राथमिक उपचारानंतर त्याला सिंगापूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले होते. उपचार सुरू असताना हादी याचे निधन झाल्याचे कळताच विद्यार्थी संघटना आणि कट्टरपंथी आक्रमक झाले आणि त्यांनी देशातील प्रमुख शहरात हिंसाचार सुरू केला. चितगाव येथील सहाय्यक भारतीय उच्चायुक्तांच्या घरावर दगडफेक करण्यात आली. यावेळी निदर्शकांनी भारतविरोधी घोषणाबाजी केली आणि भारतीय उच्चायुक्तालय बंद करण्याची मागणी केली. याशिवाय इतर तीन भारतीय उच्चायुक्तालयावरही दगडफेक केली. सुरक्षा दलाने हस्तक्षेप करीत त्यांना हुसकावून लावले. (वृत्तसंस्था)

### देशात हिंसाचाराला थारा नाही : मोहम्मद युनूस



**हिंसक आंदोलनानंतर जाहीर संदेशात बांगलादेशमधील हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस म्हणाले, देशात कोणत्याही हिंसाचाराला स्थान नाही. हिंदू नागरिकाच्या हत्येत सहभागी असलेल्यांना सोडणार नाही. अतिरेकी गटांकडून जाणीवपूर्वक हिंसाचार पसरविण्याचा प्रयत्न असून, नागरिकांनी सावध राहावे. पत्रकारांवर झालेल्या हल्ल्याबाबत आम्ही दिलगिरी व्यक्त करतो. हादीच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाईल.**

### इंटरनेट सेवा अनिश्चित काळासाठी बंद

गुरुवारी संतप्त आंदोलकांनी ढाका येथील दोन नामांकित वृत्तपत्रांच्या कार्यालयांवर हल्ला करून इमारतीला आग लावली. या आगीच्या वेळी अनेक पत्रकार आणि कर्मचारी इमारतीत अडकले होते. जीव वाचविण्यासाठी २८ पत्रकारांनी एका खोलीत आश्रय घेतला, मात्र आग त्या खोलीपर्यंत पोहोचल्याने काहींनी इमारतीच्या छतावरून उड्या मारल्या. हिंसाचार नियंत्रणात आणण्यासाठी बांगलादेश सरकारने देशातील इंटरनेट सेवा अनिश्चित काळासाठी बंद केली आहे. शाळा, महाविद्यालये दोन दिवसांपासून बंद आहे.

### जमावाने हिंदू नागरिकांची घरे जाळली

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आंदोलकांनी हिंदू नागरिकांना लक्ष्य करीत अनेक घरांना आग लावली. मयमनसिंग जिल्ह्यात दुबालिया पाडा भागात ईशनिंदेच्या आरोपाखाली दीपू चंद्र दास या २५ वर्षीय तरुणाला झाडाला उलटे टांगून जाळून मारले. तो एका कापड कारखान्यातील कामगार होता. पोलिसांनी या प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल केलेला नाही. औपचारिक तक्रार आल्यानंतर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे अधिकाऱ्याने सांगितले.

# नगरपरिषदा-पंचायतींसाठी आज मतदान; उद्या निकाल

◆ **नागपूर, १९ डिसेंबर**

न्यायालयीन अपील दाखल झालेल्या तसेच निवडणूक आयोगाने ऐनवेळी स्थगिती दिल्याने विदर्भातील अनेक नगरपरिषद व नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक आयोगाकडून सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार शनिवारी विदर्भातील एकूण २५१ जागांवर मतदान होणार आहे. या मतदानाचा निकाल रविवार, २१ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

यवतमाळ नगरपरिषद अध्यक्ष आणि ५८ नगरसेवकपदांसाठी तर पांढरकवडा येथे दोन जागांसाठी, दिग्रस येथे ३ तर वणी येथे एका जागेसाठी निवडणूक घेण्यात येत आहे. अशा एकूण ६५ जागांसाठी



मतदान होत आहे

अमरावती जिल्ह्यात अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासह २८ सदस्य आणि उर्वरित ठिकाणच्या ८ अशा एकूण ३६ जागांसाठी मतदान होणार आहे.

वर्धा जिल्ह्यातील देवळी येथील नगराध्यक्षासह वर्धा, हिंगणघाट, पुलगाव येथील २८ जागांसाठी उद्या मतदान होणार आहे. अकोला जिल्ह्यातील बाळापूर, वाशीम जिल्ह्यातील वाशीम व रिसोड आणि बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तसेच खामगाव, देऊळगावराजा व जळगाव जामोद येथे उद्या मतदान होणार आहे.

बाळापूर नगरपरिषदेत २५ नगरसेवक व नगराध्यक्षपदासाठी निवडणूक होत आहे. शेगाव न.प. येथे एका जागेसाठी. वाशीम नगर परिषद अध्यक्ष व १६ प्रभागांतील ३२ नगरसेवकपदांसाठी आज मतदान होणार आहे. देऊळगाव नगराध्यक्षपदासह ३० नगरसेवकपदांसाठी मतदान होईल.

घुग्घूस नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासह २२ सदस्यपदांसाठी तसेच वरोडा नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ७ ब आणि बल्लारपूर नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ९ अ तसेच गडचांदूर नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ८ च्या एका जागेकरिता मतदान होईल. गडचिरोली नगरपरिषदेच्या तीन प्रभागांसाठी तर आरमोरी नगरपरिषदेतील एका प्रभागासाठी निवडणूक होत आहे.

गोंदिया नगरपरिषदेच्या २ जागा आणि तिरोडा नगर परिषदेच्या एका जागेकरिता मतदान होणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### पुढे ढकलल्या होत्या निवडणुका

**मुंबई :** राज्यातल्या २४ नगर परिषदा आणि नगर पंचायती तसेच १५४ सदस्यपदांसाठी उद्या दि. २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांमुळे २ डिसेंबरला होणारे मतदान राज्य निवडणूक आयोगाने पुढे ढकलले होते.

### हिंदूंच्या सुरक्षेसाठी कारवाईची शक्यता

◆ **नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

बांगलादेशात भडकलेला हिंसाचार आणि हिंदू नागरिकांवर होणाऱ्या हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर भारतीय नौदलाने बंगालच्या उपसागरात नोटम जारी केला आहे. २५ ते २६ डिसेंबर रोजी नोटम जारी करण्यात आला. हिंदू आणि अल्पसंख्यकांवर सातत्याने होणाऱ्या हल्ल्यामुळे त्यांच्या सुरक्षेसाठी भारतीय लष्कराकडून कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बांगलादेशमध्ये हिंसाचार, जाळपोळ आणि अल्पसंख्याकांवरील हल्ल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. गुरुवारी एका हिंदू तरुणाला जिवंत जाळण्यात आले, तसेच हिंदूंच्या घरावर झालेल्या हल्ल्यामुळे अल्पसंख्यकांमध्ये दहशत आहे. (वृत्तसंस्था)

# कोकाटेंना दिलासा, पण टांगती तलवार कायम

## जामीन मिळाल्याने तूर्तास अटक टळली

◆ **मुंबई १९ डिसेंबर**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला असल्याने काहीसा दिलासा मिळाला असला, तरी त्यांच्यावरील टांगती तलवार अद्याप कायम आहे. न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने तूर्तास कोकाटेंची अटक टळली आहे.



राज्यात सर्वत्र चर्चेत असलेल्या शासकीय सदनिका घोटाळा प्रकरणात स्थानिक आणि जिल्हा सत्र न्यायालयाने माजी मंत्री कोकाटे यांना दोषी ठरले होते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी त्यांचे पहिले खाते काढले आणि त्यानंतर मंत्रिपददेखील गेले.

कोकाटे यांच्यावरील असलेल्या दबावामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. दिलेला मंत्रिपदाचा राजीनामा राज्यपालांनी स्वीकारला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

नाशिक जिल्हा न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला आव्हान देणाऱ्या कोकाटे यांच्या याचिकेवर शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने कोकाटे यांना १ लाख रुपयांच्या जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. या निर्णयामुळे कोकाटे यांना मोठा वैयक्तिक दिलासा मिळाला असून त्यांची संभाव्य अटक सध्या टळली आहे. मात्र, न्यायालयाने केवळ जामीन दिला असून त्यांच्या शिक्षेला स्थगितीबाबत अद्याप निर्णय दिलेला नाही. (तभा वृत्तसेवा)

### आमदारकीचे काय होणार?

**माणिकराव कोकाटे यांच्यासाठी सर्वात मोठी अडचण ही त्यांच्या आमदारकीबाबत आहे. न्यायालयाने अद्याप त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिलेली नाही. नियमानुसार, दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर संबंधित लोकप्रतिनिधीचे पद धोक्यात येते. या पृष्ठभूमीवर उच्च न्यायालयाने आता कोकाटे यांच्या आमदारकीचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपविला आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष यावर काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**

# महापुरुषांचे विचार, अनुभूतींचे सार आचरणात आणणे म्हणजे संघ

## सरसंघचालक डॉ.मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

◆ **सिलीगुडी, १९ डिसेंबर**

संघाचे स्वयंसेवक समाजातील प्रत्येक क्षेत्रात कार्य करत सातत्याने पुढे जात आहेत. संघ म्हणजे नेमके काय, असा प्रश्न अनेकांना पडतो. मुळात, संघ म्हणजे भारतीय महापुरुषांचा विचार आणि अनुभूतींचे सार व्यवहारात, आचरणात आणण्याची प्रक्रिया आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.



संघ शताब्दी वर्षानिमित्त सिलीगुडी येथे युवा संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उत्तर बंगालच्या आठ जिल्ह्यांतील युवक-युवतींसह शेजारी राज्य सिक्कीमचेही युवा सहभागी झाले होते. यावेळी युवा वर्गाशी संवाद साधताना सरसंघचालक म्हणाले की, भविष्याची जबाबदारी तुम्ही स्वेच्छेने घ्या किंवा घेऊ नका, पण ती युवा वर्गाच्या खांद्यावरच आहे. जर आपण केवळ स्वत:साठीच काम केले तर आपण आणि आपले कुटुंब सुरक्षित राहू शकणार आहे का?

आजवरचा इतिहास सांगतो की, जेव्हा जेव्हा देशावर संकट आले तेव्हा तेव्हा समाज जागृत झाला आहे. शक, हूण, मुघल, पठाण आणि शेवटी इंग्रजांच्या काळापर्यंत या इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे. समाजातील भेदभाव आणि संकीर्ण स्वार्थाला दूर करण्याच्या उद्देशाने समाज सुधारणेचे प्रवाह सुरू झाले. आपण कोण आहोत? आपले पूर्वज कोण आहेत? अशा आत्मबोधाला नव्याने जागृत करण्यासाठी दयानंद सरस्वती तसेच रामकृष्ण-विवेकानंदांच्या प्रेरणेने समाज सुधारण्याचे कार्य सुरू झाले.

किशोरावस्थेतच डॉक्टर हेडगेवारांनी नागपुरातील शाळेत 'वंदे मातरम्' आंदोलनाचे नेतृत्व केले. स्वातंत्र्यवीर सावरकर, सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळकांसारख्या महापुरुषांप्रमाणेच डॉक्टरांनी देखील हे जाणले की, समाज निर्माणाविना राष्ट्राचा उद्धार करण्याचे प्रयत्न यशस्वी होणे नाही. डॉक्टरांनी अभ्यासाच्या निमित्ताने अनुशीलन समितीशी संपर्क स्थापित केले आणि पश्चिम भारतात क्रांतिकारी आंदोलनाचा विस्तार केला. राजद्रोहाच्या आरोपासंदर्भात आपली बाजू मांडणाऱ्या डॉक्टरांनी प्रश्न केला होता की, इंग्रजांना कोणत्या कायद्याच्या आधारे भारतावर राज्य करण्याचा अधिकार मिळाला? हे त्यांचे फार मोठे धाडस होते. देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व्यक्तिनिर्माणाच्या कार्याची सुरुवात डॉक्टरांनी केली, असे गौरवोद्गार सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी काढले. (वृत्तसंस्था)

### हृदयात भारत भक्ती, तोच खरा हिंदू

रवींद्रनाथ टागोरांनी आपल्या 'स्वदेशी समाज' या लेखात म्हटले आहे की, नेतृत्व करणारे आणि नेतृत्वाची क्षमता असणारे व्यक्तीच खरे नायक असतात. आज जे लोक स्वत:ला हिंदू मानत नाहीत, ते देखील हिंदू पूर्वजांचेच वंशज आहेत. पूजा पद्धती, खान-पान वेगवेगळे राहू शकेल. पण, आपण एक राष्ट्र आणि एकाच संस्कृतीचे पाईक आहोत. ज्याच्या हृदयात भारताविषयी भक्ती, आदर असेल तोच खरा हिंदू आहे. सर्व प्रकारच्या विविधतांचा सन्मान करणारी विशिष्ट परंपरा ही आपली हिंदू संस्कृती आहे. भारतातील प्रत्येक व्यक्ती भारतासाठी जगावा, भारताला त्याने जाणून घ्यावे आणि भारताला सर्वोपरी मानावे, असा आग्रह करत डॉ. मोहनजी भागवत यांनी उपस्थितांना संघात येऊन संघाचे कार्य जाणून घेण्याचे आवाहन केले.




# सत्ताधारी, विरोधकांचे 'मनोमिलन'

## ओम बिर्ला यांच्याकडील चहापानासाठी सर्वपक्षीय नेते आले एकत्र

**नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्या दालनात सर्वपक्षीय नेत्यांसाठी परंपरेप्रमाणे चहापानाचा कार्यक्रम झाला. ओम बिर्ला यांच्याशिवाय या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, काँग्रेसच्या प्रियांका वढेरा, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांच्यासह अनेक पक्षांचे नेते तसेच केंद्रीय मंत्री सहभागी झाले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी परदेश दौऱ्यावर असल्यामुळे काँग्रेस पक्षातर्फे प्रियांका वढेरा या चहापानाला उपस्थित राहिल्या. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगेही या कार्यक्रमाला अनुपस्थित होते. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात अशा कार्यक्रमावर काँग्रेस पक्षाने बहिष्कार घातला होता.

संसदेच्या दोन्ही सभागृहातील कामकाजावरुन सत्ता पक्ष तसेच विरोधी पक्षांत तणाव होता, पण त्याचे कोणतेही पडसाद या कार्यक्रमात दिसले नाही. यावेळी उपस्थितांमध्ये हसतखेळत अनेक विषयावर चर्चा झाली.



## महत्वाचे...



### सोलापुरात भारतीय रिझर्व बँक अंतर्गत जनजागृती शिबिर

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

सोलापुरात भारतीय रिझर्व बँक अंतर्गत व धान फाउंडेशन आयोजित ठेवीदार शिक्षण व जनजागृती शिबिर धान फाउंडेशनचे एम. कल्याणसुंदरम व एस. शिवानंदन, महाराष्ट्र समन्वयक वैभव दरबेशवार, धानच्या अन्नपूर्णा धेंडे तर प्रमुख वक्त्या - बँक ऑफ इंडिया प्रभारी चेतना गावड, स्टेट बँक ऑफ इंडियाचे वेदांत देशमुख, तसेच बँक ऑफ महाराष्ट्रचे माजी शाखा व्यवस्थापक प्रसाद अतनुरकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हॉटेल पूनम भोज येथे संपन्न झाला. पहिल्या सत्रात चेतना गावड यांनी नामनिर्देशन, निष्क्रिय खाती व डिजिटल फसवणुकीपासून संरक्षण यावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात वेदांत देशमुख यांनी डिजिटल पेमेंट प्रणाली/कार्ड वापर व सुरक्षित ऑनलाइन व्यवहारांची माहिती दिली. तिसऱ्या सत्रात प्रसाद अतनुरकर यांनी विविध कर्ज योजनांद्वारे आर्थिक सक्षमीकरणावर भर दिला. अंतिम सत्रात सअन्नपूर्णा ढेंढे यांनी सामाजिक सुरक्षा व विमा योजनांचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतते साठी धान सोलापूरचे समन्वयक झेंडेकर, अक्षय टाकनसर, अश्विनी शिंदे यांनी परिश्रम घेतले.



### दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय तळमजल्यावर हलवा; 'प्रहार'ची मागणी

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

दिव्यांग सक्षमिकरण विभागा सुरु करण्याचा आदेश आल्यानंतर तीन महिन्यांपूर्वी घाईगडबडीत जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्यावर कार्यालय सुरु करण्यात आले. मात्र, दिव्यांगांना तिथे जाण्या-येण्यासाठी अडचण आहे. तेव्हा हे कार्यालय तळमजल्यावर हालवा, अशी मागणी प्रहार क्रांती आंदोलनाचे जिल्हा संघटक भीमाशंकर लोखंडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे केली आहे. लोखंडे यांन म्हटले आहे की, सप्टेंबरपासून स्वतंत्र दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे जिल्हा कार्यालय सुरु करण्यात आले. मात्र, हे कार्यालय पहिल्या मजल्यावर आहे. त्यामुळे दिव्यांगांना पाय-या चढून जाण्या-येण्यासाठी खूप त्रास होत आहे. जिथे दिव्यांगांना एकवेळ जाताना त्रास होतो. तिथे त्यांना योजनांचा लाभ मिळविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यासाठी जाणे शक्य नाही. त्यामुळे त्यांना वेळेवर कामे करता येणार नाही. तेव्हा हे कार्यालय तळमजल्यावर सुरु केले तर सोईचे होईल. तेव्हा हे कार्यालय तळमजल्यावर सुरु करावे.



### सोलापूर बार असोसिएशनच्यावतीने वकिलांसाठी आरोग्य जागरूकता शिबीर

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

सोलापूर बार असोसिएशन, सोलापूरच्या वतीने सर्व वकील सभासदांसाठी आरोग्य जागरूकता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दि. १७ डिसेंबर रोजी सोलापूर बार असोसिएशन हॉल येथे हे शिबीर पार पडले. शिबीराचे उद्घाटन सोलापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ वकील ॲड. व्ही. एस. आळंगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ॲड. संजीव गायकवाड, ॲड. असीम बांगी, ॲड. जाहीर दर्जी, ॲड. तुकाराम चिंचोळी, ॲड. मळसिद्ध देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमात आरोग्यम धनसंपदा संस्थेचे तज्ज्ञ सुधीर कुलकर्णी, सुरज पाटील, राहुल पाटील, जयश्री डोंगरे व भारत साठे यांनी उपस्थितांना आरोग्यविषयक माहिती देत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सोलापूर बार असोसिएशनचे खजिनदार ॲड. अरविंद देडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी केले.



### प्रश्नमंजुषा स्पर्धेत सोशल उर्दू प्रशाला द्वितीय

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

बज्म-ए-गालीब यांच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय आंतरशालेय उर्दू प्रश्नमंजुषा स्पर्धेत सोशल उर्दू प्रशाला द्वितीय क्रमांक मिळवून पारितोषिक प्राप्त केले. स्पर्धेत १४ शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मोहम्मद खिजर, फैज शेख, जैनब अब्दुल, रजाक शेख, युसरा शेख, सुमेरा शेख यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना सहशिक्षक रशीद मुल्ला, जुल्कफ्ल बागबान यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांना व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक रिजवान शेख, उपमुख्याध्यापक इम्तियाज शाब्दी, पर्यवेक्षक रसूल चौधरी, पर्यवेक्षिका यास्मिन शेख, पर्यवेक्षक अल्ताफ कुमठे यांनी अभिनंदन केले.


# येणे, राहणे आणि जाणे या तीन टप्प्यांमध्ये जीवन सामावलेले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१९ डिसेंबर-**

जीवनाचे सूत्र अतिशय साधे आहे. येणे, राहणे आणि जाणे या तीन टप्प्यांमध्येच संपूर्ण जीवन सामावलेले आहे. गुरुकृपा, सद्विचार, प्रेम व संतोष यांच्या साहचर्याने या प्रवासाला अर्थ प्राप्त होतो. गुरुंच्या मार्गदर्शनाखाली जगलेले जीवनच खऱ्या अर्थाने सफल, सार्थक आणि मंगल ठरते, असे प्रतिपादन विजयपूरचे महांतेश हिरेमठ यांनी केले.

बृहन्मठ होटगी मठाचे प.पू.योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या आठव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक मंडळाच्या वतीने आयोजित गुरु महात्म्य या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

द्वेष, मत्सर व अहंकार यांचा लवलेशही न ठेवता जो संतोषाने जगतो, सर्वांवर अमर प्रीतीचा वर्षाव करतो, तोच खऱ्या अर्थाने गुरु होय. असा गुरु केवळ उपदेश देत नाही, तर स्वतःच्या आचरणातून जीवनाचा मार्ग उजळून दाखवतो. त्याच्या चरणी गेल्यावर मनातील अंधार दूर होतो आणि आत्म्याला प्रकाशाचा स्पर्श मिळतो.



जीवन ही एक कठीण पण अर्थपूर्ण परीक्षा आहे. या परीक्षेत यशस्वी व्हायचे असेल, तर गुरुभक्ती हाच सर्वात विश्वासार्ह आधार आहे. गुरूवरील निष्ठा, श्रध्दा व समर्पण यांमुळे मन दृढ होते, विचार शुद्ध होतात आणि शेवटी आत्म्याला मुक्तीचा मार्ग सापडतो. गुरुकृपेने जीवनातील अडथळे संधींमध्ये परिवर्तित होतात.

सज्जनसंगातूनच सद्विचारांची बीजे मनात रुजतात. विशेषतः गुरुंच्या सानिध्यात राहिल्यास जीवनाला योग्य दिशा मिळते. अशा सान्निध्यात मन शांत होते, अंतःकरण समाधानाने भरते आणि जीवनात सुख व शांती सहज नांदू लागते. सदाचार, संयम व सत्याच्या मार्गावर चालत उत्तम प्रकारे जीवन जगावे.

तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींचे कार्य हे खऱ्या अर्थाने अलौकिक व प्रेरणादायी आहे. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी शिक्षणालाच साधन मानून अनेक शिक्षण संस्था स्थापन केल्या. भावी पिढी सुसंस्कृत, ज्ञानसंपन्न व चारित्र्यवान घडावी या उदात्त हेतूने त्यांनी गुरुकुल परंपरेची पुनर्स्थापना केली, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार, खजिनदार ललिता कुंभार, वेदमूर्ती श्रीशैल हिरेमठ, सेवानिवृत्त प्राचार्य रेवणसिध्द रोडगीकर, संजीव कवचाळे, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिकाद्वय वैशाली कुंभार, विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापकद्वय शिवानंद मेणसंगी, श्रावण बिराजदार, एम.डी. बिराजदार, सेवानिवृत्त शिक्षक पंडित कवचाळे, सरपंच विनोद पाटील, लक्ष्मण चिलगेरी, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शितल पाटील यांनी केले.

## लाड कमिटी अंतर्गत वारसांना नेमणूका द्या

### कामगार संघटना कृती समितीची आयुक्तांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग यांच्या १३ ऑक्टोबर २०२५च्या शासन निर्णयाप्रमाणे महापालिकेतील लाड कमिटी अंतर्गत वारसांना तात्काळ नेमणुका देण्यात याव्यात अशी मागणी सोलापूर महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने अध्यक्ष कामगार नेते अशोक जानराव यांनी आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांच्याकडे केली आली.

शासन निर्णय २३ फेब्रुवारी २०२३नुसार लाड-पागे वारसा हक्क लागू केलेला आहे. सोलापूर महापालिकेत सफाई कामगारांना महापालिका ठराव १६ ऑगस्ट १९९६ पासून लागू करण्यात आला आहे. यानंतर संघटनेच्या सततच्या मागणीमुळे झाडूवाला बिगारी ड्रेनेज मजूर यांना दि. १ जानेवारी २०१३ पासून लाड- पागे समितीच्या शिफारशी महापालिकेमधील सफाई कामगारांना अनेक वर्षाने लागू करण्यात आला आहे. हा सफाई कामगारांवर मोठा अन्याय आहे. दि. २८ डिसेंबर २०२१ रोजी महापालिकेमध्ये आकृतीबंध मंजूर करण्यात आला. १९६७ मध्ये सफाई कामगार- ४४३, झाडूवाले- ६२९, बिगारी- ५३४ व ड्रेनेज मजूर- ६१ असे एकूण १६६७ पदांना लाड कमिटी लागू आहे.

नियमित प्रकरणातील वारसदारांना तात्काळ नेमणुका द्याव्यात आणि ८३३ नवीन वारसदारांना नेमणुका देण्यासाठी नवीन आकृतीबंध तयार करावा नव्या आणि जुन्या वारसदारांची एकत्र प्रतिक्षा यादी करून जागा रिक्त होतील त्याप्रमाणे जागा भरण्याचे शासनाचे धोरण असेल तर दहा- दहा वर्ष कोणालाही नोकरी मिळणार नाही एवढेच नव्हे तर प्रतीक्षा यादीतील वारसदार वयोमानानुसार सेवानिवृत्त होतील याचा विचार व्हावा.

## मोटारसायकलची धडक; तरुण गंभीर

**बार्शी, दि. १९ डिसेंबर-**

बार्शी शहरातील लातूर रोडवरील एम. आय.टी. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर भरधाव व चुकीच्या दिशेने येणाऱ्या मोटारसायकलने दिलेल्या धडकेत एक तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. दि. १७ डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ७.४० वाजताच्या सुमारास राकेश हनुमंता चलवादी (वय ३०, रा. अंबरनाथ वेस्ट, जि. ठाणे; सध्या रा. जामगाव (आ), ता. बार्शी) हा त्याच्या ताब्यातील एच.एफ. डिलक्स मोटारसायकल (क्र. एमएच-१३ डीडी ७९६५) वरुन जामगाव येथून बार्शीकडे जात असताना, समोरुन राँग साईडने भरधाव येणाऱ्या एच.एफ. डिलक्स मोटारसायकल (क्र. एमएच -१३ बीएम ६८२६) ने त्याला जोराची धडक दिली.सदर अपघातात राकेश चलवादी यांना डोक्याला, हाताला व पायाला गंभीर जखमा होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. अपघातानंतर त्यांना तातडीने १०८ रुग्णवाहिकेद्वारे जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना ससून हॉस्पिटल, पुणे येथे हलविण्यात आले आहे. अपघातास कारणीभूत असलेल्या मोटारसायकलचा चालक दत्तात्रय चंद्रकांत पवार (रा. बार्शी) हा देखील जखमी होऊन उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्याची माहिती आहे. या प्रकरणी फिर्यादी सौरभ आंधळकर (वय २५, रा. बार्शी) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन संबंधित वाहन चालकाविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## 'एमआयएम'चे अजनाळकर यांचा शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

शिवसेनेचे उपनेते माजी आमदार व संपर्क प्रमुख संजय कदम यांच्या हस्ते अमितकुमार अजनाळकर यांचा जाहीर प्रवेश करण्यात आला. त्यांनी सोलापूर दक्षिण विधानसभा निवडणूक २०१९ साली MIM पक्षाकडून लढवली होती.

पोलीस भरती ॲकॅडमीच्या माध्यमातून त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवत समाजकार्य केले आहे. याप्रसंगी माजी आमदार शहाजी पाटील, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, शिवसेना राज्य प्रवक्त्या ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख अमर पाटील, अमोल शिंदे, शहर प्रमुख सचिन चव्हाण, महिला जिल्हा संपर्क प्रमुख अनिता माळगे, माजी जिल्हा प्रमुख तथा नगरसेवक मनोज शेजवाळ, माजी जिल्हा प्रमुख मनीष काळजे, अल्पसंख्यांक जिल्हा प्रमुख एजाज शेख, शहर प्रमुख गफूर शेख, मोहसीन शेख, संपर्क प्रमुख रजा मुजावर, उपशहर प्रमुख मोईन शेख आदी उपस्थित होते.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची अवैध दारु विक्री, वाहतुकीवर धडक कारवाई

### ४ वाहनांसह १६ लाखांचा मध्यमान हस्तगत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

राज्य उत्पादन शुल्क विभागाची गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य वाहतूक व बनावट मद्यविक्री, निर्मिती केद्रावर तसेच अवैध देशी/विदेशी मद्य व हातभट्टी दारु निर्मिती/विक्री/वाहतुकीवर केलेल्या धडक कारवाईत ४ वाहनांसह रूपये १६ लाख ५१ हजार २२०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने १८ डिसेंबर रोजी दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क पंढरपूर क्र.२ विभाग सोलापूर यांनी मौजे गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथे अवैध गोवा बनावटीचे विदेशी मद्याची वाहतूक करणारी १ टाटा इंडिका व्हीस्टा कार विदेशी मद्याच्या ७५० मिलीच्या ३७ बाटल्या व विदेशी मद्याची बनावट २५० टोपनासह रु.३,८४,०६०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क कुर्डुवाडी क्र.२ यांनी मौजे. इंदापूर ता. बार्शी येथे बनावट विदेशी मद्य निर्मितीवर कारवाई केली असुन सदर कारवाईत ५३७५ विदेशी मद्याची बनावट टोपने व विदेशी मद्यासह एकुण रु.७,५२५/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.२, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कुर्डुवाडी विभाग, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक धाराशिव, वैराग पोलीस स्टेशन स्टाफसह केलेल्या मौजे. भातंबरे ता. बार्शी संयुक्त कारवाई तसेच निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस विभाग यांनी हातभट्टी दारु निर्मिती/विक्री/वाहतूकीवर केलेल्या धडक कारवाईत १५ गुन्हे नोंद करण्यात आले असुन १० जणांवर कारवाई करुन २४,१८० ली. गुळमिश्रित रसायन, ६८० लि. हातभट्टी दारु, ३८.८८ ब.ली. विदेशी मद्य, २२.९५ ब.ली. देशी मद्य, २७.७५ ब.ली गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य, १.६२ ब.ली. बनावट विदेशी मद्य व ५६२५ बनावट टोपने तसेच ४ वाहनासह एकुण रूपये १६,५१,२२०/-चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अ-विभाग सोलापूर यांनी अवैध ढाब्यावर कलम ६८ व ८४ अंतर्गत कारवाई करुन ४ आरोपींवर कारवाई करण्यात आलेली आहे.

## प्रथमोपचाराने अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतातः डॉ. चिडगुपकर



### सोलापूर विद्यापीठात महिला कक्षातर्फे कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ डिसेंबर-**

योग्य वेळी दिलेले प्राथमिक उपचार हे अपघातग्रस्त किंवा अचानक आजारी पडलेल्या रुग्णाच्या जीवासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात. सामान्य नागरिकांनीही प्रथम उपचारांचे मूलभूत ज्ञान आत्मसात केल्यास अनेक मौल्यवान जीव वाचू शकतात, असे प्रतिपादन चिडगुपकर हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. मीनल चिडगुपकर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील महिला विकास कक्षाच्या वतीने ''स्वयंरक्षण आणि प्रथमोपचार'' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात झालेल्या या कार्यशाळेत डॉ. मीनल चिडगुपकर यांनी प्रथमोपचार विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर हे होते. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, डॉ. अंजना लावंड, डॉ. ज्योती माशाळे, लक्ष्मी आढाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात स्वयंरक्षण विषयावर संगीता जाधव यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी प्रात्यक्षिकासह विद्यार्थिनी आणि महिलांना प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री मोहिते-जाधव व सुप्रिया अनुभुले यांनी केले तर आभार ज्योती कोकणे यांनी मानले.

## मनपा शाळांतील विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक होणे आवश्यक

### मल्हारी माने; मनपा प्राथमिक शिक्षण मंडळातर्फे शिष्यवृत्ती कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

मनपा शाळांवरील पालकांचा विश्वास वाढण्यासाठी मनपा शाळांतील अधिकाधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेतून शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांची जादा तयारी करून घ्यावी. विद्यार्थ्यांचा नियमित सराव करून घ्यावा, असे आवाहन या प्रसंगी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी केले.

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळातर्फे आयोजित इयत्ता पाचवी आठवी शिष्यवृत्ती एक दिवशीय कार्यशाळा जोडबसवन्ना चौक येथील महानगरपालिका मुलांची केंद्रशाळा क्रमांक सहामध्ये पार पडली. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेस महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका



व्यवस्थापनाच्या ६३ शाळांमधील संबंधित परीक्षेची शिष्यवृत्तीची तयारी करून घेणारे सर्व शिक्षक, मुख्याध्यापक उपस्थित होते. या सर्व शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा कसबे तडवळे येथील शाळेतील शिक्षक जगन्नाथ धायगुडे, बाळासाहेब जमाले, शहाजी पुरी आणि अनिल बनसोडे यांना निमंत्रित करण्यात आले होते.

कार्यशाळेची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. कार्यशाळेस पर्यवेक्षक मनीष बांगर, भगवान मुंडे, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, केंद्रीय मुख्याध्यापिका अश्विनी लांबतुरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी रियाज अत्तार, वरिष्ठ लेखा सहाय्यक अमोल गायकवाड, प्रफुल्ला कदम, सुवर्णा गुरव, लक्ष्मण पुजारी, ज्ञानेश्वर गरड, सौदागर वाघमारे, भगवान गायकवाड उपस्थित होते.



## जिल्हा प्रशासनातर्फे अल्पसंख्यांक हक्क दिन

**सोलापूर, १९ डिसेंबर-**

येथील जिल्हाधिकारी व जिल्हा नियोजन कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्यात आला. शासनाच्या वतीने अल्पसंख्याकांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती देऊन प्रशासन त्या योजनाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करत आहे. तसेच अल्पसंख्याकांचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी सीमा होळकर यांनी दिली.

यावेळी अल्पसंख्यांक हक्क आयोगाचे राज्य सदस्य वसीम बुरान, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, उपमुख्य नियोजनकारी अधिकारी स्मिता पाटील, शिक्षणाधिकारी कादर शेख, अल्पसंख्यांक समिती सदस्य अनिल विपत, कौशल्य विकास सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे, सहाय्यक नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला उपस्थित होते.

महिला व बालविकास विभागांतर्गत पोषण आहार, लसीकरण, पूर्व प्राथमिक शिक्षण, आरोग्य तपासणी, मदरसा आधुनिकीकरण योजना, शिष्यवृत्ती योजना, मुलींसाठी वस्तीगृह सुधारणा, समुपदेशन कार्यक्रम याबाबत माहिती देण्यात आली.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बांगलादेशात जिहादींचा हैदोस

## ढाक्यासह अन्य भागांत लुटालूट अन् जाळपोळ

### भारताविरोधात घोषणाबाजी

बांगलादेशातील अनेक शहरांमध्ये भारताविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. जमाते-इस्लामी आणि नॅशनल सिटीझन पार्टीने हादीच्या मृत्यूनंतर निदर्शने सुरू केली. हादीला मारणाऱ्यांना भारताने आश्रय दिला असून त्यांना सोपविले जात नाही तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची धमकी शर्जील आलमने दिली आहे. तसेच ढाक्यातील उच्चायुक्त कार्यालयही बंद करण्याचा इशाराही दिला.

### बांगलादेशी भारताचे उपकार विसरले

पाकिस्तानी सैन्याने बांगलादेशी नागरिकांवर अमानवीय अत्याचार केले. लाखो महिलांवर बलात्कार केले. जवळपास ३० लाख बांगलादेशींना ठार करण्यात आले. अशा कठीण काळात भारताने हस्तक्षेप करीत बांगलादेशी नागरिकांची अत्याचारातून सुटका केली. बांगलादेश एक स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात आला. पण, भारताचे हे उपकार बांगलादेशातील जिहादी विसरले आहेत.

### ५ ऑगस्ट २०२४ पासून बांगलादेश अशांत

गेली १५ वर्षे विकासाच्या मार्गावर असलेल्या बांगलादेशात युवकांनी आंदोलन करीत ५ ऑगस्ट २०२४ रोजी शेख हसीना वाजेद यांना सत्तेवरून हटविले. तेव्हापासून बांगलादेशात अशांतता निर्माण झाली. भारताशी व्यापार थांबल्याने कारखाने बंद पडले, बेरोजगारी वाढली, हिंदूवर अत्याचार सुरू झाले. गेल्या वर्षभरापासून या देशात आंदोलने सुरू आहेत.

**ढाका, १९ डिसेंबर**

भारताविरोधात सातत्याने गरळ ओकणारा विद्यार्थी नेता आणि कट्टरपंथीय शरीफ उस्मान हादीचे गुरुवारी रात्री सिंगापूर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्याच्या निधनाचे वृत्त समजताच कट्टरपंथीय रस्त्यावर उतरले अन् जाळपोळ, लुटालूट सुरू केली. भारतविरोधी घोषणाबाजी करीत प्रसारमाध्यमांची दोन कार्यालये जाळून टाकली.



अपक्ष उमेदवार म्हणून प्रचारासाठी जात असलेल्या शरीफवर १२ डिसेंबरला तीन हल्लेखोरांनी जवळून गोळ्या झाडल्या. चेहरा आणि मानेला गोळी लागल्याने तो गंभीर जखमी झाला. परिस्थिती चिंताजनक असल्याने त्याला सिंगापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

उपचार सुरू असताना गुरुवारी रात्री त्याचा मृत्यू झाला. या बातमीनंतर ढाक्यात शहाबाग चौकात मोठ्या संख्येने युवक जमा झाले आणि आंदोलनाला सुरूवात केली. काही वेळानंतर जमाव हिंसक झाला आणि जाळपोळ सुरू केली. बंगाली वृत्तपत्र प्रोथोम आलो आणि इंग्रजी वृत्तपत्र डेली स्टारच्या कार्यालयांवर हल्ला केला. युवकांनी दोन्ही कार्यालये पटवून दिली. परिणामी शुक्रवारचा अंक प्रकाशित होऊ शकले नाही. डेली स्टारच्या कार्यालयात घटनेच्यावेळी जवळपास ३० पत्रकार उपस्थित होते. सुरक्षा जवानांच्या मदतीने सर्वांची सुटका करण्यात आली. (वृत्तसंस्था)




भाषा लुप्त होणे म्हणजे एक संस्कृती मृतपाय होण्यासारखे आहे. पश्चिम बंगालमधील काही भागात लेप्चा भाषा बोलली जाते. ही भाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. ही भाषा वाचविण्यासाठी तिचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करावा, या मागणीसाठी शुक्रवारी कोलकाता येथे निदर्शने करताना लेप्चा समुदायाचे नागरिक

# प्रश्नांसाठी रोख रक्कम प्रकरणी महुआ मोइत्रांना मोठा दिलासा

## लोकपालचा आदेश हायकोर्टाकडून रद्द

**नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

पैसे घेऊन संसदेत प्रश्न विचारल्याच्या प्रकरणात सीबीआय सध्या तृणमूल खासदार महुआ मोइत्रा यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल करणार नाही.



दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी लोकपालने आरोपपत्र दाखल करण्यास दिलेली मंजुरी रद्द केली आहे.

न्यायमूर्ती अनिल क्षेत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने याचिकेवर निकाल दिला. सर्व पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर खंडपीठाने यापूर्वी आपला आदेश राखून ठेवला होता. लोकपालच्या १२ नोव्हेंबरच्या आदेशाला मोइत्रा यांनी आव्हान दिले होते, ज्याने सीबीआयला त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची परवानगी दिली होती. सुनावणीच्या शेवटी, मोइत्रा यांचे प्रतिनिधित्व करणारे वरिष्ठ वकील निधेश गुप्ता यांनी सीबीआयच्या कारवाईवर अंतरिम स्थगिती मागितली. तथापि, त्या टप्प्यावर कोणताही अंतरिम दिलासा देण्यास खंडपीठाने नकार दिला. मोइत्रा यांनी म्हटले आहे की मला स्पष्टीकरण मागण्यात आले. पण, लोकपालांनी माझ्या स्पष्टीकरणाचा योग्य विचार न करता कारवाईला मान्यता दिली. तोंडी युक्तिवादांनाही परवानगी दिली. (वृत्तसंस्था)

### संपूर्ण प्रकरण काय आहे?

२०२३ मध्ये भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी मोइत्रावर महागड्या भेटवस्तू आणि पैसे घेऊन व्यावसायिक दर्शन हिरानंदानी यांच्या सांगण्यावरून अदानी समूह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य करण्यासाठी लोकसभेत प्रश्न विचारल्याचा आरोप केला होता. महुआंवर राष्ट्रीय सुरक्षेशी तडजोड केल्याचाही आरोप होता. त्यानंतर हे प्रकरण लोकसभेच्या एथिक्स कमिटीकडे पाठवण्यात आले होते, जिथे महुआ दोषी आढळल्या होत्या. त्यानंतर महुआ यांना लोकसभेतून निष्कासित करण्यात आले होते. केंद्रीय तपास यंत्रणा सीबीआय देखील खासदार महुआ मोइत्रा यांच्या विरोधात प्राथमिक तपास करत आहे.

# मृत्युपत्र लिहिणाऱ्याची इच्छा सर्वोपरी

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

### दुसऱ्या समुदायात विवाह करणाऱ्या मुलीला समान हिस्सा नाकारला

**नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

मृत्यूपत्राचा मुद्दा असेल तर त्यात हस्तक्षेप करता येत नाही. मृत्यूपत्राच्या संदर्भात समानतेपेक्षा ते लिहिणाऱ्याची इच्छा सर्वोपरी असते. अखेरचे मृत्यूपत्र कोणत्याही स्थितीत नाकारता येणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

नऊ भावंड असलेली शैला जोसेफ तिच्या वडिलांच्या एन.एस. श्रीधरन यांच्या मालमत्तेत समान हक्क मागत होती. तथापि, श्रीधरन यांनी शैलाला तिच्या समुदायाबाहेर लग्न केल्यामुळे मालमत्तेत वाटा देण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती एहसानुद्दीन अमानुल्ला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांचे न्यायासन या प्रकरणाची सुनावणी करत होते.

निकाल लिहिताना न्यायमूर्ती चंद्रन म्हणाले, सिद्ध मृत्युपत्रात



हस्तक्षेप करता येत नाही. उच्च न्यायालय आणि ट्रायल कोर्टाचे निर्णय रद्द केले जातात. असे आढळून आले आहे की वादीला (शैला) तिच्या वडिलांच्या मालमत्तेवर कोणताही अधिकार नाही, जी मृत्युपत्राद्वारे इतर भावंडांना देण्यात आली आहे.

**समानतेचा प्रश्न उद्भवत नाही**

शायलाचे वकील पी.बी. कृष्णन यांनी न्यायालयाला सांगितले की, मालमत्तेच्या १/९ व्या भागावर तिचा हक्क आहे, जो खूपच लहान भाग होता. न्यायालयाने म्हटले की, एखाद्या व्यक्तीच्या मालमत्तेच्या वाटणीबाबत मृत्यूपत्रात समानतेचा प्रश्न उद्भवत नाही. न्यायालयाने असे म्हटले की, ज्या व्यक्तीला त्याच्या मालमत्तेच्या वाटणीवर पूर्ण अधिकार आहे अशा व्यक्तीने लिहिलेल्या मृत्यूपत्रातील मजकुरावर सावधगिरीचा नियम लागू करता येत नाही. जर सर्व भावंडांना मृत्यूपत्राद्वारे वारसाहक्कात वंचित ठेवले गेले असते, तर न्यायालये सावधगिरीचा नियम लागू करू शकली असती. (वृत्तसंस्था)

# ठाण्यात बँक्वेट हॉलमध्ये आग

### हजारो लग्नाचे पाहुणे बचावले

**ठाणे, १९ डिसेंबर**

ठाणे शहरात एका बँक्वेट हॉलमध्ये आग लागल्यानंतर एक हजारांहून अधिक लग्नाचे पाहुणे कोणतीही इजा न होता सुखरूप बचावले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. ही घटना गुरुवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास शहराच्या घोडबंदर रोडवरील ओवळा परिसरातील विवाह सभागृहाच्या आवारात घडली.

'द ब्लू रूफ क्लब'च्या लॉनवरील एका केबिनच्या बाहेर ठेवलेल्या मंडपाच्या सजावटीच्या साहित्याला आग लागली. त्यावेळी त्या ठिकाणी लग्नाचा स्वागत समारंभ सुरू होता. घटनेच्या वेळी त्या ठिकाणी एक हजारांहून अधिक पाहुणे उपस्थित होते, असे ठाणे महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख यासीन तडवी यांनी सांगितले.

आग लागल्याचे लक्षात येताच पाहुण्यांना सुरक्षितपणे ठिकाणाहून बाहेर काढण्यात आले, त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, असे ते म्हणाले. वेळीच दाखवलेली सतर्कता आणि तातडीने केलेल्या स्थलांतरामुळे मोठी दुर्घटना टळली. (वृत्तसंस्था)

# बंडखोरांनी पळविला माशांनी भरलेला ट्रक

## मणिपूर | चार बंडखोरांसह सात जणांना अटक

**इम्फाळ, १९ डिसेंबर**

मणिपूरच्या इम्फाळ पश्चिम जिल्ह्यात माशांची वाहतूक करणारा ट्रक पळविला. या प्रकरणी सुरक्षा दलांनी एका प्रतिबंधित संघटनेच्या चार सदस्यांसह सात जणांना अटक केली आहे, अशी माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली.

प्रतिबंधित युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (पाम्बेई) संघटनेच्या चार सदस्यांना गुरुवारी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक करण्यात आली.

बंडखोरांनी गुरुवारी जिल्ह्यातील महाराबी-फेडिंगा रस्त्यावरून बर्फात ठेवलेल्या माशांच्या पेट्यांनी भरलेला एक ट्रक पळवला. अटक करण्यात आलेल्या बंडखोरांची ओळख पटली असून यात बोरिश सगोलसेम (२५), हिरोजीत शर्मा (३२), असेम अमर मेईतेई (२०) आणि मोहम्मद सलमान खान (३५) आदींचा समावेश आहे.

युएनएलएफने २०२३ मध्ये केंद्रासोबत शांतता करार केला होता, परंतु खंडणी आणि बेकायदेशीर शस्त्रे तस्करीसारख्या कारवायांमध्ये सहभाग असल्याबद्दल त्यांच्या सदस्यांना अटक केली जात आहे.

ट्रक, त्यातील बर्फात ठेवलेल्या माशांच्या पेट्या तसेच पळवलेल्या ट्रकमधून माशांच्या पेट्या हलवण्यासाठी वापरलेले दोन टिप्पर ट्रक जप्त करण्यात आले आहेत, असे पोलिसांनी सांगितले. जप्त केलेल्या वाहनांच्या चालकांसह तीन जणांनाही अटक करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

### चुरचंदपूरमध्ये आयईडी जप्त

गुरुवारी एका वेगळ्या कारवाईत चुरचंदपूर जिल्ह्यातील कांगवाई परिसरातून १६ सुधारित स्फोटक उपकरणे (आयईडी) जप्त करण्यात आली. बॉम्बशोधक पथकाने हे आयईडी निकामी केले.

## चित्रपट वार्ता

### भारती-हर्षच्या दुसऱ्या बाळाचे आगमन

**मुंबई :** छोट्या पडद्यावरील हास्य कलाकार भारतीसिंह दुसऱ्यांदा आई झाली असून शुक्रवारी तिने मुलाला जन्म दिला. शुक्रवारी सकाळी 'लाफ्टर शेफ'च्या चित्रीकरणाआधीच तिला प्रसुतीकळा सुरू झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले. भारती आणि हर्ष यांना पहिला मुलगा आहे. त्याचे नाव लक्ष्य आहे. प्रेमाने सगळे त्याला गोला म्हणतात. भारती गर्भवती असतानाही सातत्याने आपले व्लॉग शेअर करत होती. त्यात तिने अनेकदा मुलगी हवी, असे म्हटले होते. मुलीची इच्छा पूर्ण होऊ शकली नसली तरी दुसऱ्या बाळाचा जन्मही तितकाच आनंददायी आहे. दोन्ही कुटुंबात सध्या आनंदाचे वातावरण असून भारती आणि हर्षवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





राजस्थानातील बिकानेर येथे पौष अमावास्या महोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त एका गोशाळेत जाऊन भाविकांनी गोधनाची पूजा करीत फुलांचा वर्षाव केला

# १६ वर्षांपूर्वीच्या हत्येप्रकरणी दाम्पत्याला अटक

**पालघर, १९ डिसेंबर**

पालघर जिल्ह्यात १६ वर्षांपूर्वी दलालाच्या हत्येप्रकरणी कथित सहभागाबद्दल एका दाम्पत्याला मध्य प्रदेशातून अटक करण्यात आली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली.

आरोपी धर्मेंद्र रामाशंकर सोनी आणि त्यांची पत्नी किरण धर्मेंद्र सोनी यांना मध्य प्रदेशातील इंदूर जिल्ह्यातून ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल २००९ मध्ये मुंबईच्या बाहेरील नलास सोपारा पूर्वेकडील भागात दलालीच्या पैशांवरून झालेल्या वादानंतर एका दलालाची हत्या करण्यात आली होती. यानंतर, सोनी दाम्पत्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींपैकी एकाला अटक करण्यात आली होती, तर इतर तिघे फरार होते. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा सेल-३ ने अलीकडेच हे प्रकरण पुन्हा उघडले आणि मध्य प्रदेशातील इंदूर जिल्ह्यातील महू गावातून या दाम्पत्याचा शोध घेतला, असे वरिष्ठ निरीक्षक शाहूराज रणवरे यांनी सांगितले. या दाम्पत्याला नालासोपाऱ्यात आणले. (वृत्तसंस्था)


### निर्माते शोधताहेत चौथा इडियट!

**मुंबई :** चित्रपटसृष्टीतील विक्रमी ठरलेल्या '३ इडियट्स'चे आजही असंख्य चाहते आहेत. त्यामुळे प्रेक्षक याच्या पुढील भागाचीही आतूरतेने वाट पाहत आहेत. आमीर खान आणि राजकुमार हिराणी देखील या सिक्वलवर काम करण्याची तयारी करत आहेत. २०२६ मध्ये या चित्रपटाचे काम सुरू होईल. मात्र, सध्यातरी याचे नवे शीर्षक समोर आले आहे. निर्मात्यांनी याचे तात्पुरते शीर्षक '४ इडियट्स' असे ठेवले आहे. अर्थात, हे नाव भविष्यात बदलले जाऊ शकते. पण, सध्यातरी बातमी अशी आहे की, यात आणखी एखाद्या सुपरस्टारचा प्रवेश होण्याची शक्यता आहे. त्याचा शोध सुरू आहे. पहिल्या भागाची गोष्ट जिथे संपली होती तिथूनच हा प्रवास पुढे सुरू होईल. यात काही नवीन घटक जोडले जातील.



### 'किक २'मध्ये जॅकलिनच्या जागी क्रिती

**मुंबई :** सलमान खानच्या 'किक'चा दुसरा भाग येऊ घातला आहे. यात सलमान आणि जॅकलिनची जोडी प्रेक्षकांना आवडली होती. या चित्रपटानंतर जॅकलिनला बरेच चित्रपटही मिळाले. मात्र, आता 'किक'च्या सिक्वलमधून तिचा पत्ता कट झाल्याची माहिती मिळते आहे. 'किक २'मध्ये जॅकलिनची जागा क्रिती सेनन घेणार आहे. निर्माता साजिद नाडियादवाला त्यांच्या या आगामी प्रोजेक्टमध्ये सलमानसोबत क्रितीला घेण्याचा विचार करत आहेत. अद्याप याविषयी कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. सध्या सलमान त्याच्या 'बॅटल ऑफ गलवान'च्या चित्रीकरणात व्यस्त आहे. त्यानंतर तो 'किक २'चे चित्रीकरण करणार असल्याचे समजते.



### सुरक्षा जवान, नक्षलवाद्यांमध्ये चकमक

**विजापूर :** छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यात शुक्रवारी सुरक्षा जवान व नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. नक्षलवादी कॅडरच्या उपस्थितीबद्दल माहिती मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दलाचे एक पथक भैरमगड-इंद्रावती परिसरातील जंगलमय डोंगराळ भागात नक्षलविरोधी कारवाईसाठी गेले असताना सकाळी गोळीबाराला सुरुवात झाली, असे त्यांनी सांगितले. यापूर्वी गुरुवारी सुकमा जिल्ह्यात सुरक्षा जवानांसोबत झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले.

# ईपीएफओचे 'ब्रेक'बाबतचे नियम बदलले

## शनिवार-रविवार, सार्वजनिक सुट्ट्या सेवा खंड नाही

**नवी दिल्ली, १९ डिसेंबर**

खाजगी कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे. एखाद्या कर्मचाऱ्याने नोकरी बदलताना मध्ये आलेले शनिवार, रविवार किंवा इतर सार्वजनिक सुट्ट्या आता सेवा खंड मानल्या जाणार नाहीत. १७ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या नवीन परिपत्रकानुसार, योजनेचे नियम अधिक सोपे आणि व्यावहारिक करण्यात आले आहेत.




यापूर्वी, जर एखाद्या कर्मचाऱ्याने शुक्रवारी जुनी नोकरी सोडली आणि सोमवारी नवीन कंपनीत रुजू झाला, तर मधले दोन दिवस (शनिवार-रविवार) सेवा खंड मानले जात असत. यामुळे १२ महिने सतत सेवा पूर्ण नसल्याचे कारण देऊन विम्याचे दावे नाकारले जायचे. आता मात्र स्पष्ट केले आहे की, शनिवार, रविवार किंवा घोषित साप्ताहिक तसेच सरकारी सुट्ट्या ब्रेक मानल्या जाणार नाहीत. या नियमातून राष्ट्रीय सुट्ट्या, राजपत्रित सुट्ट्या आणि राज्यांच्या सुट्ट्यांनाही सवलत मिळणार आहे. दोन नोकऱ्यांमधील ६० दिवसांपर्यंतचा फरक आता सतत सेवा म्हणून ग्राह्य धरला जाईल. (वृत्तसंस्था)

### योजना काय आहे?

**पीएफ खाते असलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याला योजनेंतर्गत कोणत्याही प्रीमियमशिवाय ७ लाख रुपयांपर्यंतचे मोफत जीवन विमा कवच मिळते. जर कर्मचाऱ्याचा नोकरीत असताना दुर्दैवी मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबाला ही रक्कम दिली जाते.**

### कुटुंबांना मिळणार मोठा आधार

**या स्पष्टीकरणामुळे अशा हजारो कुटुंबांना फायदा होईल ज्यांचे विम्याचे दावे केवळ तांत्रिक कारणांमुळे अडकले होते. आता जर शेवटच्या योगदानानंतर ६ महिन्यांच्या आत कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आणि त्याचे नाव कंपनीच्या रेकॉर्डवर असेल, तरीही त्याच्या वारसांना विमा लाभ मिळणे सुलभ होईल.**

## अग्रलेख...

# संसद अधिवेशनाचे फलित आणि बोध

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले. शेवटच्या दिवशी विरोधकांनी नेहमीप्रमाणे गोंधळ घालून 'हम नहीं सुधरेंगे' हे दाखवून दिले. तरीही अन्य अधिवेशनाच्या तुलनेत यावेळचे अधिवेशन अतिशय उत्पादक ठरले. अनेक महत्त्वाची विधेयके सरकारला पारित करून घेता आली; तसेच राष्ट्रीय महत्त्वाच्या अनेक विषयांवर सभागृहात चर्चाही झाली. विरोधकांनी घातलेल्या गोंधळामुळे अधिवेशनाला काही प्रमाणात गालबोट लागले; तरीही यावेळचे अधिवेशन आतापर्यंतच्या अन्य अधिवेशनाच्या तुलनेत छोटे असूनही अतिशय चांगले झाले. संसदेच्या अधिवेशनाचा उद्देश राष्ट्रीय महत्त्वाच्या आणि जनतेच्या जिव्हाळ्याच्या मुद्यांवर दोन्ही सभागृहांत चर्चा व्हावी हा असतो. आजकाल विरोधकांना अभ्यासपूर्ण चर्चेत नाही तर सभागृहात गोंधळ घालण्यात रुची असते, असे वाटते. मुळात प्रश्न सोडवण्यासाठी जनतेने आपल्याला निवडून दिले आहे, याचे भान विरोधी पक्षांच्या बहुतेक सदस्यांना उरले नाही. सरकार चुकत असेल, जनतेच्या हिताच्या विरोधातील निर्णय घेत असेल तर त्याला आक्रमकपणे विरोध करण्याचा विरोधकांना अधिकार आहेच; हा अधिकार कोणी नाकारू शकत नाही. चुकीच्या मार्गावर जाणाऱ्या सरकारला योग्य मार्गावर आणणे ही विरोधी पक्षांची जबाबदारी आहे. पण आपण विरोधी पक्षात आहोत म्हणून ऊठसूठ सरकारला नाहक विरोध करणे, सरकारने व्यापक देशहिताच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयाला विरोध करणे योग्य नाही. आजचा विरोधी पक्ष आपली दिशा हरवून बसला आहे, त्यामुळे त्याची सभागृहात आणि बाहेरही कशी दशा होत आहे हे दिसते आहेच. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधक उपस्थित करत असलेल्या सर्व विषयांवर चर्चा करण्याची आमची तयारी असल्याचे सरकारने स्पष्ट केले होते. मतदारयादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्यावर सरकारने चर्चा करावी, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली होती. या विषयावर सरकार चर्चा करणार नाही, असा विरोधकांचा होरा होता. पण सरकारने या विषयावर चर्चेची तयारी दर्शवत विरोधकांच्या हल्ल्यातील हवा काढून घेतली. एसआयआरवरील चर्चेचे निमित्त करत दोन्ही सभागृहांत गोंधळ घालायचा आणि हिवाळी अधिवेशनाचे कामकाज हाणून पाडायचे, अशी विरोधकांची व्यूहरचना होती; पण या विषयावर चर्चेची तयारी दर्शवत सरकारने ती व्यूहरचना हाणून पाडली. एसआयआरवर संसदेच्या दोन्ही सभागृहांत दोन दिवस चर्चा झाली. या चर्चेत सर्व पक्षांच्या सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाली. एसआयआर हे एका विशिष्ट समाजाच्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यासाठी आहे, असा अपप्रचार विरोधकांनी चालवला होता. एसआयआरवर विरोधक उपस्थित करत असलेल्या आक्षेपांना गृहमंत्री अमित शाह यांनी दोन्ही सभागृहांत अतिशय मुद्देसूद आणि अभ्यासपूर्ण उत्तर दिले.

या देशात अवैध मार्गाने घुसखोरी केलेल्यांना हुडकून काढण्यासाठी एसआयआर आहे. देशातील कोणत्याही जातिधर्माच्या लोकांना लक्ष्य करण्याचा यामागचा हेतू नाही, असे अतिशय समर्पक उत्तर देत अमित शाह यांनी विरोधकांच्या आक्षेपांतील हवा काढली. या देशाचा पंतप्रधान आणि राज्यांचा मुख्यमंत्री कोण होणार हे ठरवण्याचा अधिकार घुसखोरांना आम्ही देऊ शकत नाही, तर तो अधिकार या देशातील मतदारांचा आहे, हा शाह यांचा युक्तिवाद अतिशय बिनतोड असा होता. एसआयआरमधून एका विशिष्ट समाजाच्या नागरिकांना लक्ष्य करण्याचा सरकारचा हेतू असता तर बिहारच्या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला दणदणीत विजय मिळाला नसता. कारण बिहारमध्ये मुस्लिम समाजानेही भाजपाला भरभरून मतदान केले आहे. वंदे मातरम्ला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संसदेत अतिशय अभ्यासपूर्ण चर्चा झाली. वंदे मातरम्वरील चर्चेत लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले भाषण सर्वोत्कृष्ट म्हणावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या तुलनेत लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आपला प्रभाव पाडू शकले नाहीत. राहुल गांधींजवळ वक्तृत्व नाही, मांडणी नाही आणि त्यांचा अभ्यासही फारसा नाही. एकेकाळी विरोधी पक्षनेता भाषणासाठी उभा झाला तर सत्ता पक्ष अस्वस्थ होत असे. पण आता विरोधी पक्षनेता म्हणजे राहुल गांधी भाषणासाठी उभे झाले की, सभागृहातील वातावरणातील गांभीर्य कमी होते. एसआयआर व मतचोरीच्या मुद्यावरून राहुल गांधी वारंवार निवडणूक आयोग आणि सरकारला घेरत होते, पत्रपरिषद घेत आरोप करत होते. पण एसआयआरवरील चर्चेत राहुल गांधी यांचे भाषण काँग्रेस पक्षाच्या सदस्यांची निराशा करणारे होते. आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ कोणताही ठोस पुरावा ते सादर करू शकले नाहीत. याचा दोष अमित शाह यांनी भोळ्याभाबड्या राहुल गांधींवर न टाकता त्यांना भाषण लिहून देणाऱ्या चमूवर टाकला. असे करत शाह यांनी एका दगडात दोन पक्षी मारले. त्यांना भाषण लिहून देणारे लोक कमी क्षमतेचे आहेत, असा शालजोडीतला टोला त्यांनी मारला. राहुल गांधी यांच्यापेक्षा प्रियांका वढेरा या जास्त प्रभावी असल्याचे या अधिवेशनात दिसून आले. राहुल गांधी यांना हटवून काँग्रेस पक्षाचे नेतृत्व प्रियांका वढेरा यांच्याकडे सोपवावे, अशी मागणी काँग्रेस पक्षात अधूनमधून उगीच होत नाही. भाजपा जेव्हा विरोधी पक्षांत होता, तेव्हा अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, सुषमा स्वराजसारखे दिग्गज नेते विरोधी पक्षनेते होते. हे नेते भाषणासाठी उभे होत तेव्हा सत्ताधारी पक्षाला घाम फुटत असे. आता राहुल गांधी भाषणासाठी उभे राहिले की, ते काय बोलणार, आपल्याच पक्षाला तर अडचणीत आणणार नाही ना, याचा विचार करून काँग्रेसच्या सदस्यांनाच घाम फुटतो. राहुल गांधींनी विरोधी पक्षनेता म्हणून सरकारला अडचणीत आणण्यापेक्षा आपल्याच पक्षाला अडचणीत आणण्याचे काम इमानेइतबारे अनेकदा केले आहे. हिवाळी अधिवेशनात मनरेगाऐवजी सुधारित जी राम जी विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाले. या विधेयकावर संसदेच्या दोन्ही सभागृहांत रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली. मनरेगा योजनेतून महात्मा गांधी यांचे नाव वगळण्याचा सरकारचा हेतू असल्याचा आरोप काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केला. खरे तर महात्मा गांधी यांच्या सिद्धांतांची आणि आदर्शांची हत्या काँग्रेसने अनेकदा केली आहे. तरीही या विधेयकावरील मतदानाच्या वेळी काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभागृहात जो गोंधळ घातला, त्याचा करावा तेवढा निषेध कमी आहे. सांसदीय परंपरा काँग्रेसच्या सदस्यांनी पायदळी तुडवल्या, विधेयकाची प्रत फाडत त्याचे तुकडे सभापतींच्या आसनाच्या दिशेने भिरकावण्यात आले. विधेयकावर झालेल्या चर्चेला उत्तर देणे ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांना कठीण झाले होते. त्यामुळे त्यांना आपली जागा सोडून पाठीमागे जावे लागले आणि भाषण पूर्ण करावे लागले. मात्र या गदारोळातही चौहान यांनी विरोधकांच्या आक्षेपांचे आणि आरोपांचे मुद्देसूद निराकरण केले. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या या बेशिस्त आचरणाबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन् यांना तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करावी लागली. फक्त नाराजी व्यक्त करणे पुरेसे नाही. अशा सदस्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आपल्या अशा वागणुकीबद्दल आत्मचिंतन करण्याची गरज आहे. देशातील जनता आपल्याला वारंवार का नाकारते आहे, याचे कारण काँग्रेसने शोधले पाहिजे आणि आपल्या वागणुकीत सुधारणा केली पाहिजे. काँग्रेस सदस्यांची ही हताशा आणि निराशा ते ११ वर्षांपासून सत्तावंचित झाल्यामुळे आहे. महत्त्वाचे म्हणजे आता आपण कधीच सत्तेवर येऊ शकत नाही, याची खात्री काँग्रेसला असावी असे त्यांच्या दोन्ही सभागृहांतील वर्तनावरून दिसून येते. याआधी भाजपाही अनेक निवडणुका हरली होती, पण ती कधीच हताश आणि निराश झाली नव्हती. मात्र काँग्रेसने आपला आत्मविश्वास पूर्णपणे गमावला आहे. काँग्रेसने आपल्या वागणुकीत आणि नेतृत्वात बदल केला नाही तर काँग्रेसची स्थिती आणखी दयनीय झाल्याशिवाय राहणार नाही, हाच संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा शोध आणि बोध आहे.

## रंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव?

"शुक पंजरि वा हरीण शिरावा पाशी, ही फसगत झाली तैशी." म्हणजे ज्याप्रमाणे राघू पिंजऱ्यात अडकतो किंवा हरिण जाळ्यात सापडतं, त्याप्रमाणे मराठी माणसाची फसगत झाली आहे, हे सुरुवातीलाच नमूद करू इच्छितो. आता तुम्ही विचाराल की ही फसगत केली कुणी? आणि झाली कशी व ती फसगत नेमकी आहे तरी काय? याचंही विवेचन पुढे करणार आहे. महाराष्ट्र धर्म हा शब्द समर्थ रामदासांनी दिला. दोन ठिकाणी प्रामुख्याने 'महाराष्ट्रधर्म' हा शब्द आढळतो. "मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा।" हे उपदेशपर वचन आहे. दुसऱ्यांदा हा उल्लेख सापडतो, जेव्हा समर्थांनी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना पत्र लिहिलं, त्यात ते श्रीमंत योगी, जाणता राजा अशाप्रकारे शिवाजी महाराजांची स्तुती करत म्हणतात, "या भूमंडळाचें ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हा कारिणे ॥" या महाराष्ट्रधर्म शब्दावरून आज प्रचंड मोठं राजकारण खेळलं जात आहे. गंमत म्हणजे समर्थांवर त्यांची जात पाहून टीका करणारेही महाराष्ट्रधर्म या शब्दाचा उच्चार करतात. आता मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जवळ आलीय. त्यामुळे आपल्याला काही ठेवणीतली वाक्ये ऐकायला मिळत आहेत. त्यातलं सर्वात जुनं आणि लोकांची फसगत करण्यासाठी परंपरागत वापरलं जाणारं वाक्य म्हणजे, "हा मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव आहे." प्रत्येक प्रांतातली काही प्रादेशिक अस्मिता असते, त्या अस्मितेला आव्हान देणारी विधाने केली तर स्थानिक जनता आकर्षित होते. हा एक डाव आहे. हे एक जाळं आहे!

१९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली. काँग्रेसला मुंबई महाराष्ट्राला देऊ नये, असे वाटत होते. यासाठी मोठे आंदोलन झाले. १०५ हुतात्म्यांनी बळी देऊन हे आंदोलन यशस्वीही केले. मात्र मुंबई केंद्रशासित करण्याची भीती अनेक वर्षे मराठी माणसाला दाखवण्यात आली. लहान मुलाने घास घेतला नाही, तर मोठी माणसं बुवा आला म्हणून घाबरवतात. त्याचप्रमाणे निवडणूक आल्यावर मराठी माणसाने आपल्यालाच मतदान करावे, या हेतूने "मुंबई तोडण्याचा डाव आहे" म्हणत भीती दाखवली जाते. १९६० साली ही परिस्थिती खरोखर होती हे नाकारता येत नाही. पण आता परिस्थिती बदललेली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्राचे नेते तर बुलेट ट्रेनसारख्या विकासकामांनाही विरोध करत हा मुंबई तोडण्याचा डाव म्हणतात. मराठी अस्मितेच्या मुद्यावरून राजकारण करणाऱ्या नेत्यांनी या एका वाक्याच्या बळावर "बंगले" बांधले. पण मराठी माणूस मुंबईच्या बाहेर फेकला गेला. मुंबईतील मराठी टक्केवारी कमी होण्याचे कारण आर्थिक आहेच पण घराचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. आता मुंबईत घरांच्या किमती खूप वाढल्या आहेत आणि सरासरी किंमत प्रति स्क्वेअर फूट ११,००० ते २४,००० रुपये आहे. एक १ बीएचके फ्लॅट ६० लाखांपासून सुरू होतो, तर प्रीमियम भागात १.५ कोटींपर्यंत जातो. लक्झरी घरांच्या किमती ४० टक्क्यांनी वाढल्या आहेत. मराठी निम्न किंवा मध्यमवर्गीय माणूस या किमतींमुळे घर विकत घेऊ शकत नाही. परवडणाऱ्या घरांच्या योजना अस्तित्वात असल्या तरी त्या अपुऱ्या आहेत. यासाठी कोणी प्रयत्न केलेले दिसत नाही. दुसरी गोष्ट, कितीही नाही म्हटलं तरी मुंबईत अन्य राज्यांतून येणाऱ्या कामगारांची संख्या प्रचंड आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी म्हणता म्हणता इथे अनेक लोक आजही येत आहेत. ही समस्या आहे, हे मान्य करून आपल्याला पुढे जावे लागणार आहे. हा भार या इवल्याशा शहरावर पडतोच आहे. पण त्याची कारणे वेगळी आहेत. त्यावर काम करायला हवे. मात्र मराठीचे कैवारी म्हणवून घेणारे राजकीय नेते अशा महत्त्वाच्या विषयांना प्रांतीय वादाचे स्वरूप देतात. पण अशा लोकांचे संबंध अनेक वर्षे मराठी न बोलता येणाऱ्यांशी असतात. हेही लक्षात घेतले पाहिजे.



मराठी भाषा ही समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, समर्थ रामदास यांनी साहित्यात मोलाचा वाटा दिला आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे या वारशाचे रक्षण. पण आज मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत आहेत आणि इंग्रजीचा प्रभाव वाढला आहे. हा मुद्दा मराठीचे कैवारी हाती का घेत नाहीत. कारण त्यांची मुले इंग्रजी शाळेत शिकतात. त्यांची नातवंडे इंग्रजी शाळेत शिकणार आहेत. मग हे भाषेचे डोस सामान्य माणसाला का? आधी केले मग बोलले या संतांच्या वचनाप्रमाणे त्यांनी वागायला नको का? आता महाराष्ट्रधर्म या समर्थांनी दिलेल्या दिव्य शब्दाकडे येऊया. महाराष्ट्रधर्म हा काही स्वतंत्र धर्म नाही. हिंदू धर्माचे मराठी रूप आहे. समर्थ लिहितात, "तीर्थक्षेत्रे ती मोडिलीं । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट जाली । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ देव, धर्म, गोब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली" मग हे सांगत पुढे समर्थ लिहितात, "उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक । धूर्व तार्किक सभानायक । तुमच्या ठायी ॥ या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हा कारिणे ॥" याचा अर्थ इतका स्पष्ट आहे की समर्थ छत्रपतींना धर्मरक्षक म्हणतात. समर्थ आनंदवनभुवनी या काव्यात लिहितात, "बुडाले सर्व ही पापी । हिंदुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनी" तसेच "बुडाला औरंग्या पापी । म्लेंछसंहार जाहला । मोडलीं मांडली छेत्रें । आनंदवनभुवनी ।" इथे समर्थ "हिंदुस्थान, म्लेंछसंहार, औरंग्या" असे शब्द वापरतात. म्हणजे समर्थ रामदासांची भावना किती उदात्त आहे पाहा. छत्रपती शिवाजी महाराज हे परकीय शक्तींचा नायनाट करत आहेत, असं समर्थ म्हणत आहेत. त्यामुळे समर्थांनी दिलेला महाराष्ट्रधर्म हा शब्द प्रांतीय नसून राष्ट्रीय आहे. महाराष्ट्र हा हिंदुस्थानचा खड्गहस्त झाला पाहिजे हे सावरकरांचे विचार आहेत. हेच समर्थ रामदास वेगळ्या शब्दांत मांडतात. त्यामुळे मुंबईच्या काही स्वतंत्र समस्या आहेत. मराठी माणसाच्याही काही समस्या आहेत. या स्वतंत्रपणे कोणाचाही द्वेष न करता सोडवल्या पाहिजेत. मराठी माणसाचे अर्थकारण, त्याच्यासाठी स्वस्तातली घरे, मराठी शाळा, महाराष्ट्रात मराठी भाषा बोलण्यास प्रोत्साहन असे अनेक विषय घेऊन त्याबद्दलच्या समस्या स्वतंत्रपणे सोडवता येतील. त्यासाठी अभ्यास करावा लागेल. पण स्वत:ला मराठीचे कैवारी म्हणवून घेणारे राजकीय नेते स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी मराठी माणसाची माथी भडकावत आहेत. आता कुणीही मुंबई महाराष्ट्रापासून तोडू शकत नाही किंवा वेगळी करू शकत नाही, हे मराठी माणसाने लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच मराठी माणसाने शुक म्हणजे राघू किंवा हरिण बनून यांच्या जाळ्यात अडकू नये.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# प्रत्येक गावात असावा असा 'भोंगा'

आजचा काळ हा आवाजांचा आहे. रस्त्यावर हॉर्नचा गोंगाट, घराघरांत टीव्ही, मोबाईल, सोशल मीडियाच्या नोटिफिकेशनची टिंग टिंग म्हणजे थोडक्यात भोंगा! याशिवाय राज्याच्या राजधानीत सकाळी ९ चा भोंगा अशी राजकीय ओळख असलेले खासदार संजय राऊत यांचा भोंगा! अनेकदा वाजला याचा भोंगा असेही उपरोधिकपणे म्हटले जाते. काही भोंग्यांवर बंदी आणण्याची मागणी राज ठाकरे वारंवार करतात. भोंग्यांचे अनेक प्रकार आहेत. पण, आजचा भोंगा खऱ्या अर्थाने वेगळाच आहे. हा भोंगा वेगळ्या उंचीवर घेऊन जाणारा आहे. भोंग्याच्या या आख्यायनात पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील 'अग्रज धुळगाव!' या गावाचा उल्लेख करावा लागेल. या गावात सकाळ, सायंकाळी वाजणारा भोंगा राजकीय नव्हे तर अभ्यासाचा! येथे गेल्या ३ वर्षांपासून पहाटे ५ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता भोंगा वाजतो. भोंगा वाजताच गावातील टीव्ही बंद होतात, मोबाईल बाजूला ठेवले जातात अन् विद्यार्थी अभ्यासाला बसतात. या अभिनव संकल्पनेने या गावाची ओळख आता 'भोंग्याचे गाव' अशी झाली आहे. यातून गावकऱ्यांतील एकी दिसून येते. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल झाले. त्यांची गुणवत्ताही वाढल्याने गावातील ५३ विद्यार्थी नॅशनल स्कॉलरशिपसाठी पात्र ठरले. दहावीतही ते अव्वल ठरत आहेत. अनेक विद्यार्थ्यांची अनेक स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून निवड झाली आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतच्या वतीने राबवल्या जात असलेल्या उपक्रमाचे गावकरी १०० टक्के पालन करतात. गावातील काही सुशिक्षित व्यक्ती दररोज ३० ते ४० घरी भेट देऊन पाहणी करतात. विद्यार्थ्यांना काही शैक्षणिक अडचण आल्यास ती सोडवण्यासाठी मदतही करतात. पहाटे ५ ते ७ आणि सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा उपक्रम दररोज राबवला जातो.

आज जिथे शाळा, शिकवणी वर्ग (सॉरी कोचिंग क्लासेस) आणि अभ्यासाची महागडी साधनं असूनही मुलं अभ्यासापासून दूर जात असताना अग्रज धुळगावने एक वेगळा आदर्श ठेवला आहे. आपण धूळ या शब्दालाच नाक मुरडतो! पण, ज्या गावाच्या नावातच धूळ आहे. त्यांनी अभ्यासाची धूळ झटकून टाकण्याचा हा विडा उचलला असून ते त्यासाठी 'अग्रज' ठरले आहेत. अग्रज म्हणजे 'मोठा' आणि या अभियानात त्यांनी मोठ्याची भूमिका बजावली असे म्हटल्यास वावगे ठरू नये! इच्छाशक्तीच्या बळावर भोंग्याने क्रांती घडवली, असेच म्हणावे लागेल. या उपक्रमाचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य म्हणजे तो केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित नाही तर या भोंग्याच्या आवाजात संपूर्ण गाव सहभागी आहे. भोंगा वाजताच टीव्ही बंद होतात, मोबाईल बाजूला जातात. त्यामुळे त्या भोंग्याने लहान मोठ्यांना एक दिशा दिली आहे. सध्या मुलं ऐकत नाहीत, अभ्यास करीत नाहीत. मोबाईलचे वेड लागले आहे, असे लहान मोठ्या, शिक्षित, अशिक्षित घरांमधली एकच कम्प्लेंट! अग्रज धुळगावने या प्रश्नावर जालिम उत्तर शोधून काढले आहे. सकाळ आणि सायंकाळच्या ४ तासातच गावात एक ऊर्जा निर्माण होते नव्हे सरस्वती प्रत्येक घरात डोकावल्याशिवाय राहत नसेल. इथे मुलांना अभ्यास कर असे म्हटले जात नाही. त्यांना अभ्यास करता येईल असे वातावरण गावाने दिले आहे. या भोंग्याचा आवाज केवळ कानांवर पडत नाही तो मनावर परिणाम करतो. तो विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याची आठवण करून देतो. या उपक्रमामुळे गावात हळूहळू बदल दिसू लागले आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयी बदलत आहेत. मोबाईलवर घालवला जाणारा वेळ कमी होतो आहे. टीव्ही पाहण्याची सवय मर्यादित होते आहे. परीक्षांचे निकाल सुधारत आहेत. पण याहूनही महत्त्वाचं म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आहे. मंदिरे, व्यक्ती, व्यक्तिमत्त्व, वस्तू, निसर्ग, आंदोलनं, वाद, गुन्हे आदींसाठी देशात अनेक गावे ओळखली जात असताना महाराष्ट्रातील अग्रज धुळगाव हे गाव अभ्यासासाठी ओळखले जात आहे. आज देशभरात 'शांतता क्षेत्र', 'नो हॉर्न झोन' अशा संकल्पना राबवल्या जातात. पण अग्रज धुळगावने 'अभ्यास क्षेत्र' निर्माण केलं आहे. जिथे आवाज बंद होतो आणि विचार सुरू होतात. गावागावात इतर भोंगे वाजल्यापेक्षा वा वाजवल्यापेक्षा प्रत्येक गल्लीत, गावात, शहरात असा भोंगा वाजला तर?

९८८१९०३७६५

## आजचे संघगीत-७८

शनिवार, २० डिसेंबर २०२५

### माते मंगलमय माते देई आशीर्वचनाते

माते मंगलमय माते देई आशीर्वचनाते
वंदनीय तू पूजनीय तू वरदायिनी माते ॥धृ॥

तुझ्या वैभवी अमुचे वैभव
तव सन्माने अमुचा गौरव
स्फूर्ति प्रेरणा देई अभिनव जग उजळायाते ॥१॥

सभोवती शस्त्रांची खणखण
क्रुर रिपूंचे असुरी वर्तन
तुझ्या रक्षणी स्वधर्मरक्षण जागवु ईर्ष्यते ॥२॥

दुष्ट मतलबी घरभेद्यांचे
डाव उधळवू आव्हानांचे
चढू हिमालय कर्तृत्वाचे तुझ्या पूजनाते ॥३॥

प्रबळ उभारू अविचल भक्ती
प्रलयंकारी अजेय शक्ती
तुझ्या कारणी जीवन मुक्ती एकच आम्हाते ॥४॥

अपूर्ण केवळ अमुचे जीवन
चिरवांछित परि ध्येय चिरंतन
याच देहि ते अमुचे हातुन ने पूर्णत्वाते ॥५॥

## दखल

**मुकुंद गायकवाड**

# तांदूळ निर्यातीला वेसण कशासाठी?

भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, त्याला व्यापकपणे शुल्कयुद्ध म्हटले जाते, तो काळ राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. त्याला न बधलेल्या भारताला त्यांनी एका नवीनच मुद्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.

ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की भारताला अमेरिकेत तांदळाचे ' डम्पिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने (तांदळाचे) डम्पिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डम्पिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर (विशेषतः दक्षिण आशियाई समुदायावर) आधारित आहे. धान्य किंवा इतर कृषी उत्पादनांच्या संदर्भात डम्पिंग म्हणजे निर्यातदार देश किंवा कंपनीने आपले उत्पादन संबंधित देशांतर्गत बाजारातील किमतीपेक्षा कमी दराने विकणे. अशा देशात धान्य आयात करणाऱ्या देशात उत्पादनाची किंमत किंवा उत्पादन खर्च तुलनेने जास्त असतो. (जे शेतीच्या बाबतीत अनेकदा सर्वात प्रभावी स्वरूप असते). गेले दोन महिने ट्रम्प हे सारखे अहंपणाची भाषा वापरून भारतावर काही ना काही लादण्याची गरळ ओकत आहेत. वास्तविक, या बातमीने आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची बाजू भक्कम झाल्याचे सहज समजू शकते. कारण अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर आजवर जगाची अर्थव्यवस्था आपल्या मुठीत ठेवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.



ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टेरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. याची दखल माध्यमांनी आणि तज्ज्ञ लोकांनी घेऊन पंतप्रधान मोदींची पाठ थोपटायला हवी होती, परंतु आर्थिक अभ्यासाअभावी ही महत्त्वाची बातमी दुर्लक्षित राहिली. तसा विचार करता गहू आणि तांदूळ ही दोन्ही पिके अनुक्रमे इजिप्त आणि चीनमध्ये निर्माण झाली होती. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उप्तवल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरयाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती. वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी 'आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात.

इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे, परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्रायलचा शेतकरी सधन झाला आहे. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले आहेत. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने 'ऑपरेशन बासमती' करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते. शेतीक्षेत्रामध्येच नव्हे, तर अनेक क्षेत्रांमध्ये अमेरिका आघाडीवर आहे. परंतु व्हिएतनामच्या हो चीनिव्ह यांनी शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याच्या तंत्राचा वापर करून अमेरिकेला दाती तृण धरून शरण यायला भाग पाडले होते. अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. पूर्वीच्या काळासारखी या देशाला अमेरिकेकडे अन्नधान्यासाठी भीक मागावी लागत नाही. भारतीय शेतकरी आणि केंद्र सरकार याबाबतीत निश्चितच अभिनंदनास पात्र ठरतात.

(लेखक ज्येष्ठ कृषितज्ज्ञ आहेत.)

## एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब

पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्षाच्या तृणमूल काँग्रेसचे आमदार मदन मित्रा यांच्या वादग्रस्त वक्तव्याने देशभरात चर्चा आणि वाद निर्माण झाला. भगवान रामांविषयी केलेले विधान केवळ एक वैयक्तिक मत म्हणून न राहता, समाजातील श्रद्धा, इतिहास आणि राजकीय संवेदनशीलता यांना स्पर्श करणारे आहे. भारतीय संस्कृतीत श्रीराम हे केवळ धार्मिक श्रद्धेचेच नव्हे, तर नैतिक मूल्यांचे, आदर्श जीवनाचे प्रतीक मानले जातात. अशा व्यक्तिमत्त्वाबाबत केलेली कोणतीही सार्वजनिक टिप्पणी ही अत्यंत जबाबदारीने करायला हवी. या वक्तव्यावरून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात असून, अशा विधानांमुळे भारतीय इतिहास व सांस्कृतिक परंपरेचा अवमान होतो. यामागे केवळ व्यक्तिगत अज्ञान नसून, एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब दिसते. याच पृष्ठभूमीवर राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेकडेही लक्ष वेधले जात आहे. या संपूर्ण प्रकरणावर त्यांची स्पष्ट प्रतिक्रिया न आल्याने, सार्वजनिक जीवनातील जबाबदारी आणि मौन याविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, संबंधित आमदारांनी आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचे सांगत स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, सार्वजनिक व्यासपीठावरून केलेल्या विधानांचे परिणाम केवळ शब्दांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजमनावर त्याचा खोल प्रभाव पडतो, हे विसरून चालणार नाही. राजकारण करताना श्रद्धा, इतिहास आणि समाजभावना यांचा आदर राखणे ही केवळ अपेक्षा नव्हे, तर लोकप्रतिनिधींची नैतिक जबाबदारी आहे.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### दिल्लीतील सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

दिल्लीमध्ये १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव भारत मंडपम् येथे उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम आपली संस्कृती, इतिहास आणि जुन्या काळातील शौर्याची आठवण करून देण्यासाठी आयोजित केला होता. या महोत्सवात सर्वांत जास्त लक्ष वेधून घेतले ते म्हणजे पारंपरिक भारतीय युद्धकलांनी. यामध्ये आपल्या पूर्वजांनी वापरलेल्या कलांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमात तलवारबाजी, लाठी-काठी आणि दांडपट्टा यासारख्या खेळांची थरारक प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. शिवकाळात मावळे ज्या प्रकारे युद्ध खेळायचे, त्याचे जिवंत दर्शन तेथे घडले. तेथे ऐतिहासिक शस्त्रांचे एक मोठे प्रदर्शन भरवले होते. यामध्ये जुन्या काळातील सुमारे २५० हून अधिक शस्त्रे पाहायला मिळाली. ही शस्त्रे पाहून आपल्या इतिहासाचा अभिमान वाटत होता. केवळ खेळ म्हणून नाही, तर स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि शिस्त लावण्यासाठी या प्राचीन कला आजही किती महत्त्वाच्या आहेत, हे लोकांना समजावून सांगण्यात आले. दोन दिवसांच्या या सोहळ्यात भारताची संस्कृती आणि परंपरा कशी टिकवता येईल, यावर अनेक जाणकारांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम म्हणजे आपल्या संस्कृतीची ओळख करून देणारा एक प्रयत्न होता. तरुण पिढीला आपल्या इतिहासाची माहिती मिळावी, हा त्यामागचा मुख्य हेतू होता. थोडक्यात सांगायचे तर, हा सोहळा भारतीय संस्कृतीचा आणि शौर्याचा अभिमान जागवणारा एक मोठा कार्यक्रम ठरला.




**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# कुणबी दाखले वाटपात दिरंगाई

## सकल मराठा समाज आंदोलनाच्या तयारीत

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि. १९ डिसेंबर -**

कुणबीचे दाखले कुर्डूवाडीचे प्रांताधिकारी यांच्याकडून अडवले जात आहेत त्यात सुसूत्रता यावी. असा आरोप करत सकल मराठा समाज करमाळा यांच्यावतीने जिल्हाधिकारी सोलापूर यांना निवेदन देण्यात आले.

करमाळा तालुक्यातील बहुतांश लोकांच्या कुणबी नोंदी मराठी व मोडी लिपीत स्पष्टपणे आढळून येतात या अगोदर नोंदीचा व इतर आवश्यक पुराव्यांचा अभ्यास करून दाखले तात्काळ मिळत होते मात्र आता त्यात दिरंगाई होत आहे. यामुळे शैक्षणिक, राजकीय व विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यापासून कुणबी लोकांचे नुकसान होत आहे. सकल मराठा समाज करमाळा यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, जर अर्जदार प्रतिज्ञापत्र सादर करताना सही करत असेल तर सेल्फ अटेस्टेड हे कशासाठी ही जाणीवपूर्वक अडवणूक आहे . घरातील एका प्रकरणाला तहसीलदार प्रमाणित प्रत असेल तरी घरातील दुसऱ्या प्रकरणाला ओरिजनल प्रति किंवा पेपर मागून अडवणूक केली जात आहे .कुटुंबामध्ये जुने जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र असतानाही जाणीवपूर्वक प्रकरणे बाजूला ठेवली जात आहे जुन्या जात पडताळणी वैधता प्रकरणाला कवडीची ही किंमत दिली जात नाही . महसुली पुरावे असतानाही अनावश्यक फेरफार ची मागणी जाणीव पर्वक करून आडवणूक होत आहे .



> कुर्डवाडी प्रांत ऑफिस मधून जाणीवपूर्वक मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या दाखले काढण्यास त्रास दिला जात आहे याबाबत लवकरच मोठे जन आंदोलन करमाळा येथे उभा करणार आहोत
>
> **- सचिन काळे**
> **मराठा समन्वय व मराठा सेवा संघाचे करमाळा तालुका अध्यक्ष**

प्रकरण जर करमाळा तहसील कार्यालयाकडून कुर्डूवाडी प्रांत कार्यालयाकडे आवकजावक च्या माध्यमातून जात असेल व त्रुटी लावून परत करमाळा येथे येत असेल तर ते प्रकरण फेर सादर करताना तहसीलदारांची सही घेऊन करमाळ्यातच ऑनलाइन करून देण्यात यावे वरील सर्व अडवणुकीचे मुद्दे सकल मराठा समाज करमाळा यांच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी यांच्यासमोर ठेवण्यात आले.आणि दाखले वाटपात सुसूत्रता येण्यासाठी संबंधितांना तात्काळ सूचना द्याव्यात अन्यथा सकल मराठा समाज करमाळा यांच्यावतीने संबंधितांचा निषेध नोंदवून १ जानेवारी २०२६ रोजी नववर्षाच्या स्वागतावर शासनाचा , कलेक्टर ऑफिस सोलापूर , कुर्डूवाडी प्रांत ऑफिसचा निषेध म्हणून एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येईल असे सांगण्यात आले यावेळी सोलापूर जिल्हा सकल मराठा समाजाचे माऊली पवार सकल मराठा समाज करमाळा चे सचिन काळे दादासाहेब तनपुरे दीपक गायकवाड उमेश काळे पांडुरंग साळुंखे आदी मराठा बांधव उपस्थित होते.

# सीना-भोगावती जोडकालव्याला मंजुरी न मिळाल्यास आमदारकीचा राजीनामा देणार

## आ. राजू खरे : नरखेड येथे ३० कोटी ९२ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि.१९ डिसेंबर-**

मागील तीस वर्षाच्या काळात मोहोळ विधानसभा मतदार संघातील प्रश्नावर विधानसभेत लोकप्रतिनिधिचा आवाज कधी घुमला नाही. तो मी अनगर नगरपंचायत, रस्ते, पाणी, पूर परस्थिती, नुकसान भरपाई, कायदा सुव्यवस्था यासह विविध प्रश्नावर आवाज उठविला. तुम्ही जनतेनी मला दिलेलं मतदान वाया जाऊ देणार नाही याची खात्री देतो. नरखेडसह परिसरातील ३० ते ४० गावाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या सीना -भोगावती जोडकालव्याच्या योजनेला लवकरच मंजुरी मिळिवण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. मात्र या योजनेला मंजुरी नाही मिळाली तर मी माझ्या आमदारकीचा राजीनामा देणार असल्याची घोषणा मोहोळचे आमदार राजू खरे यांनी केली.

मोहोळ तालुक्यातील नरखेड येथे भाजपचे कार्यकारिणी सदस्य संतोष पाटील व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या प्रयत्नातुन नरखेड व परिसरातील विविध गावांसाठी मंजूर झालेल्या भोगावती नदीवरील पूल, जि.प. केंद्र शाळा इमारत, अप्रोच रस्ते यांसह ३० कोटी ९२ लाख रुपयांच्या विविध विकासकामाचा भूमीपूजन सोहळा आमदार खरे यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नारायण राणे हे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी जि.प. चे माजी अध्यक्ष बळीराम साठे, उमेश पाटील, संतोष पाटील, राहुल क्षीरसागर, तालुकाध्यक्ष आण्णासाहेब पाटील, उज्वला थिटे, विजय कोकाटे, अजिंक्य क्षीरसागर, श्रीकांत गायकवाड, संजय विभुते, सुरेश चव्हाण, चंद्रकांत निकम, संभाजी कोकाटे, भीमराव वसेकर, सुनील पाटील, प्रज्ञा बनसोडे, यशस्वी भोसले, सुनीता सोनार, गौरी शिंदे, महेश धुमाळ, दीपक पुजारी, विद्या कोळकुर, पांडुरंग साठे उपस्थित होते. श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले. ज्ञानेश्वर गोटणे यांनी प्रस्ताविक केले. सरपंच बाळासाहेब मोटे यांनी आभार मानले.



> **या गावांना मिळणार निधी**
>
> नरखेड, डिकसळ, मसले चौधरी, देगाव, वाळूज, भैरववाडी- मनगोळी, मलिकपेठ, शिरापूर (सो.), हिंगणी (नी.), मोरवंची, बोपले, भोयरे, खुनेश्वर, दाईगडेवाडी या गावातील रस्त्यांना निधी मंजूर असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# शिक्षकांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवल्याप्रकरणी कुर्डुवाडीतील नूतन हायस्कूलच्या मुख्याध्यापकांवर कारवाई

## प्रशिक्षण खर्चाची वसुली थेट वेतनातून; सेवापुस्तिकेत नोंद होणार

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१९ डिसेंबर -**

शासनाच्या शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.० या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची अंमलबजावणी न करता ३५ शिक्षकांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवल्याप्रकरणी कुर्डूवाडी येथील नूतन हायस्कूलच्या मुख्याध्यापकांवर अखेर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. ही कारवाई शिक्षक भारती संघटनेच्या सातत्यपूर्ण तक्रार व पाठपुराव्यामुळे शक्य झाली आहे.

या प्रकरणात शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी संबंधित मुख्याध्यापकांच्या मनमानी व नियमबाह्य कारभाराबाबत तक्रार दाखल केली होती. मार्च २०२५ मध्ये डायट कार्यालयात वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली गेली नाही. त्यानंतर संघटनेच्या वतीने थेट राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांकडे लेखी तक्रार करण्यात आली. त्याची गंभीर दखल घेत राज्याचे शिक्षण आयुक्त यांनी शिक्षण संचालक (माध्यमिक) यांना पत्रव्यवहार करून संबंधित मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

> 'शिक्षकांचे हक्क अबाधित राहावेत, शाळा शासनाच्या नियमांनुसार व लोकशाही पद्धतीने चालाव्यात, तसेच कोणत्याही स्तरावर मनमानी खपवून घेतली जाणार नाही. शिक्षक भारती संघटना शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने लढत राहील.'
>
> **- विजयकुमार गुंड,**
> **जिल्हा प्रवक्ता, शिक्षक भारती, सोलापूर**

त्यानुसार शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे यांनी दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर यांना पत्र पाठवून, नूतन हायस्कूल कुर्डूवाडी येथील मुख्याध्यापकांच्या वेतनातून शाळेतील ३५ शिक्षकांचे ङ्गशिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.0ङ्ख पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या संपूर्ण खर्चाची वसुली करण्याचे आदेश दिले आहेत.

याशिवाय जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेळापूर यांच्याकडून सदर शाळेतील शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करून घेण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा सविस्तर अहवाल घेऊन, त्या आधारे सर्व ३५ शिक्षकांचे प्रशिक्षण तात्काळ पूर्ण करून घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रशिक्षणासाठी शिक्षकांना कार्यमुक्त न केल्यामुळे जे शिक्षक वंचित राहिले होते, त्यांचे प्रशिक्षण आता अनिवार्यपणे पूर्ण करून घेतले जाणार आहे. या कारवाईअंतर्गत प्रशिक्षणासाठी येणारा संपूर्ण खर्च संबंधित मुख्याध्यापकाच्या वेतनातून वसूल केला जाणार असून, या शास्तीची नोंद त्यांच्या सेवापुस्तिकेत करण्यात येणार आहे. त्यामुळे याचा परिणाम त्यांच्या सेवाशर्ती व सेवानिवृत्ती लाभांवर होणार आहे.

# 'एनओसी'साठी इच्छुक उमेदवारांची गर्दी

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी आयोगाने कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक अर्जासोबत महापालिकेच्या विविध विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्रांची गरज आहे. ती मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवारांची लगबग सुरू आहे. दिवसभरात मिळकत कर एनओसीसाठी सुमारे २२५ अर्ज दाखल झाले आहेत.

येत्या २३ डिसेंबरपासून अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यासाठी नॉर्थकोट प्रशाला येथे जय्यत तयारी करण्यात येत आहे. या ठिकाणी विविध कक्षही स्थापन करण्यात आले आहेत. या निवडणुकीसाठी अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया २३ ते ३० डिसेंबर, अर्ज छाननी दिनांक ३१ डिसेंबर असून त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत राहणार आहे. दिनांक ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येईल.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मोजे नागोबाचीवाडी व ता. बार्शी तसेच आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि सोलापुर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी येथील जमीन गट नं. २७७ या जमीनीपैकी १) अबुबकर अकबर पठाण व २) मैनुद्दीन जहाँगीर पठाण यांचे मालकीची दक्षिण बाजूची जमीन तिचे क्षेत्र हे. 00.५५ आर, आकार रु. 0.७५ पैसे अशी संपूर्ण जमीन यासी चतुः सिमा पुर्वेस- जुना गट नंबर १५0४ ची जमीन, दक्षिणेस- गट नंबर २७६ ची जमीन, पश्चिमेस- गाडेगाव रस्ता व उत्तरेस - सदर गट नंबरपैकी निवृत्ती जगताप यांची जमीन आहे. येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक जमीन आतील झाड, झुडूप वगैरे सर्व तदंगभूत वस्तुसह जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कांसह जमीन.

वर नमूद मिळकत ही रेकॉर्डला १) अबुबकर अकबर पठाण व २) मैनुद्दीन जहाँगीर पठाण यांचे स्वतंत्र खरेदी मालकी वहीवाटीची आहे. अबुबकर अकबर पठाण यांनी तसेच मैनुद्दीन जहाँगीर पठाण यांचे तर्फे कुलमुखत्यार मुस्तफा जहाँगीर पठाण रा. बार्शी यांनी सदर मिळकत आमचे आशिलास विक्री करणेचा ठराव करून आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारुन साठेखताचा दस्त आमचे अशिलांचे नांवे लिहून दिलेला आहे. सदरची मिळकत मिळकतीचे मालकांनी निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा आमचे आशिलांना दिलेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, या उपर अबुबकर अकबर पठाण यांचेशी तसेच मैनुद्दीन जहाँगीर पठाण यांचे तर्फे कुलमुखत्यार मुस्तफा जहाँगीर पठाण यांचेशी इतर कोणाचा वरील नमूद मिळकतीबाबत खरेदी, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा, चोळी, बांगडी कोणत्याही प्रकारचा खाजगी, सरकारी बोजा इ. प्रकारचा कसल्याही प्रकारे हस्तांतरणाबाबत व्यवहार असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर कागदपत्रानिशी आमचे आशिलांना शहानिशा करून द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची हरकत न आल्यास आमचे आशिल वर नमुद ठरावाप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागावून कोणाची तक्रार चालणार नाही, कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. कळावे, ता. १९/१२/२०२५

सही/-
ॲड. आर. ए. शेख
B.A., L.LB
३९0१, ए, भवानी पेठ, बार्शी
आशिल सौ. प्रतिज्ञा सुनिल जानराव तर्फे ॲडव्होकेट
मो. नं. ९0२८५६६८४४



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील सर्व लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब. डि. ता. बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील सि.स.नं. ७२३/३/९ ही घरजागा तिचेफळ ४८९.९७ चौ.मी. आहे. यासी चतुःसिमा पुर्वेस जाधव यांची सि.स.नं. ७२३/१/२१ पैकी जागा, दक्षिणेस- देशमुख यांची सि.स.नं. ७२३/३/१0, पश्चिमेस- भगवंत सहकारी नागरी पतसंस्था यांची सि.स.नं. ७२३/३/८, उत्तरेस - रस्ता, येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक घरजागा आतील सर्व तद्‌गभूत वस्तू हक्कासह व वहीवाटीसह संपूर्ण मिळकत त्यामधील संपूर्ण बांधकाम, लाईट, नळ कनेक्शनसह सदर जागेचे पाणी व वहिवाट ही उत्तर बाजुचे रस्त्याने जाते व आहे.

सदरची घरजागा ही श्री. सुधिर वामन देशमुख, जयश्री दत्तात्रय देशपांडे, आरती परिक्षीत गौड, किर्ती मकरंद हवेली, रेखा विजयकुमार देशमुख, प्रति विजयकुमार देशमुख, विक्रांत विजयकुमार देशमुख यांचे सामाईक मालकी व कब्जेवहीवाटीची आहे. त्याप्रमाणे त्यांची वर नमूद मिळकतीचे हक्कपत्रकी नाव नोंद असून सदरची मिळकत त्यांचे मालकी व कब्जेवहिवाटीस आहे.

सदरची मिळकत ही श्री. सुधिर वामन देशमुख, जयश्री दत्तात्रय देशपांडे, आरती परिक्षीत गौड, किर्ती मकरंद हवेली, रेखा विजयकुमार देशमुख, प्रति विजयकुमार देशमुख, विक्रांत विजयकुमार देशमुख यांचे मालकी हक्काची व नांवे असलेली समाईक कब्जेवहिवाटीची मिळकत असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करुन त्यांनी आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. त्यावेळी त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमीची असलेची खात्री व विश्वास आमचे अशिलास दिलेली आहे.

याउपरही वरिल मिळकती संदर्भाने कोणाची काही हरकत, हक्क संबंध, गहाण, साठेखत, दानपत्र, भाडेकरार, मृत्युपत्र, कोर्ट आदेश, वारसा हक्क वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क संबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन 0७ (सात) दिवसांत खालील पत्त्यावर समक्ष भेट घेवुन योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आमचे अशिलाची खात्री करुन द्यावी. त्यानंतर आमचे अशिल आपसात ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली. ता. १९/१२/२०२५.

सही/-
ॲड. श्री. आर.यू. वैद्य
श्री. विठ्ठल निवास आदित्य कृष्णानगर
वायकुळे प्लॉट उपळाई रोड, दोन
लिंबाजवळ बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९८५0२७७९४४
अशिलातर्फे ॲडव्होकेट


# 'दवणा'च्या अभिवाचन अन् विवेचनास सोलापूरकरांचा प्रतिसाद

## शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेचा समारोप

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**



मराठी साहित्यातील जेष्ठ लेखक विद्याधर पुंडलिक यांच्या दवणा या पुस्तकाच्या अभिवाचन आणि विवेचनास सोलापूरकरांनी प्रतिसाद दिला.

शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेच्या अखेरच्या दिवशी शुक्रवारी डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी (पुणे) हे दवणा या विद्याधर पुंडलिक यांच्या साहित्यावर अभिवाचन व विवेचनाचा कार्यक्रम सादर केला.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा आणि शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्ट यांच्यावतीने हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात ही व्याख्यानमाला झाली. व्याख्यानमालेचे यंदाचे २९ वे वर्ष होते.याप्रसंगी व्यासपीठावर मसापाच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, उपाध्यक्ष दत्ता सुरवसे, वेदांत चंडक, समन्वयक ॲड. जे. जे. कुलकर्णी, बाबुराव मैंदर्गीकर उपस्थित होते.मसापचे प्रमुख कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुवर्णा गुंड यांनी सूत्रसंचालन तर डॉ. देविदास गुरव यांनी आभार मानले.

> **मसापचे माजी कार्याध्यक्ष मैंदर्गीकर यांचा सत्कार**
>
> दरवर्षी होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात राज्यातील एका ज्येष्ठ प्रकाशकाचा सन्मान करण्यात येतो. यंदा हा बहुमान सोलापूरला मिळालेला असून सोलापूरचे ज्येष्ठ प्रकाशक बाबुराव मैंदर्गीकर यांचा सातारा येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सत्कार करण्यात येणार आहे. त्याबद्दल मैंदर्गीकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

मध्य रेल्वे, सोलापूरचे वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रॅलवेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/L/T/2025/22. तारीखः 18.12.2025. कामाचे नावः सोलापूर विभागातील लातूर स्टेशनवरील कोचिंग कॉम्प्लेक्ससाठी लातूर सेवा कक्षांसाठी वीज पुरवठा आणि सामान्य प्रकाश व्यवस्था यांच्या तरतूदीशी संबंधित कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. अंदाजे खर्चः रु. 23,72,277.99. इमारत सुरक्षाः रु. 47500/-. पूर्ण कालावधीः 12 महिने. ऑफरची वैधताः ६0 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळः 12/01/2026 15:00 वाजता. सुरक्षा किंमत www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरली जाईल.

**सीनियर विभागीय विद्युत अभियंता (जी),**
**सेंट्रल रेल्वे, सोलापूर**

DE/Sur-74

रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापुर मधील तमाम रहिवासी विशेषतः नेहरु नगर, माशाळे नगर, तालुका उत्तर सोलापूर येथील रहिवासी व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, पालिकेचे नावः सोलापूर म.न.पा. इतर वर्णन, इतर माहितीः नेहरु नगर येथील जुना सर्व्हे न.३४९/१ नवीन सव्र्हे नं. ४/१ यापैकी माशाळे नगर मधील प्लॉट नं. १९ पैकी दक्षिणेकडील निम्मी जागा प्लॉट नं. १९ (ब) याचे क्षेत्र २३0 चौ. मी. अथवा २४७५ चौ. फूट इतके आहे. यात १३३.७७ चौ.मी. चे बांधकाम केलेले आहे. (विभाग क्र.२९/१0२/१ दर ४८८0/- प्रती चौ.मी.) (Survey Number: जुना सर्व्हे नं. ३४९/१ नवीन सर्व्हे नं.४/१ Plot Number : प्लॉट नं. १९ पैकी दक्षिणेकडील निम्मी जागा) १) २३0 चौ. मीटर वर नमूद जागा रमजान रशीद पठाण वहिवाटीचे असून त्यांनी आमचे अशिल राजू किसन शिंदे (पत्ता, १७, सोनटकले प्लॉट, संतोष नगर, बाळे, सोलापूर नॉर्थ, सोलापूर, महाराष्ट्र-४१३२५५) कब्जे कायम खूशखरेदीने देण्याचे मान्य व कबूल करून आमचे अशिलांकडून इसारापोटी रक्कम स्वीकारून तसा इसारापावती दस्त लिहून दिलेला आहे. तसेच सदर जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद जागेवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, टाय, जप्ती, मृत्यूपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अगर हक्क असल्यास अथवा सदर जागेबाबत कोणाचेही, कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही, कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. तारीखः २0/१२/२0२५.

सही/-
ॲड कृष्णा विजय बाबरे
(LL.B., LL.M.)
१२, जय मल्हार नगर, बाळे, सोलापूर
मोबाईलः ९१६८0१३३३३.



## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १०११६०४९९ | मालमत्ता तारण कर्ज | १. अनिल हनुमंत सुरवसे<br>२. गितांजली अनिल सुरवसे | ०६.१२.२०२५ | रुपये ३,६२,२८२.६८/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** गावठाण निवासी मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल ज्यामध्ये विठ्ठलवाडी ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३३/१, क्षेत्रफळ ३४ फूट द १४ फूट ४७६.00 चौ. फूट, (टॉयलेट क्षेत्रफळ ४×५ फूट), विठ्ठलवाडी येथे स्थित, विठ्ठलवाडी ग्रामपंचायतीच्या स्थानिक हद्दीत, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३११२, एकूण जमीन ४७६.00 चौ. फूट, आणि पूर्वेला हनुमान मंदिर, पश्चिमेला विठ्ठल गोविंद सुरवसे, उत्तरः गावठाण, दक्षिणेला रस्ता. | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६0 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

दिनांक : २०/१२/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र



## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर

मुख्य कार्यालय : ६0/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३00२
फोन -0२१७-२६२२९३४४ / २६२२९३३

**नमुना झेड**
(नियम १0७ पोटनियम ११ (डी-१) पहा)
स्थावर मालमत्ता ताब्यात घेतलेबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर C/O श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली, सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकत बाबत जप्तीची नोटीस देऊन यापुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १0७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणी सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या मालम तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ क्रं. | कर्जदार / जामिनदाराचे /मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | सिसनं / गट नं / क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस व प्रतिकात्मक ताबा ३१.0८.२0२५ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | अरुण नारायण महिंद्रकर (समर्थ गाऊन ॲन्ड ड्रेस मटेरियल प्रोप्रा. सतीश नारायण महिंद्रकर) यांचे जामीनदार | डी.व सब डी. सोलापूर ता. दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी हद्दीतील भावसार सह. गृहनिर्माण संस्था मर्यादित | गट नं. ५४४/५४५ पैकी प्लॉट नं. अ-११५ क्षेत्र- १.८५.२५ आर.चौ. मी. आकार १८.५३ | 0३.१२.२0२१<br>१८.१२.२0२५<br>रु. १४,२५,५२२/- |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे संपूर्ण थकबाकी भरून या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा. अन्यथा, तसे न केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कडे अर्ज करून पार पाडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल. तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

स्थळ : सोलापूर
दिनांक : १८/१२/२0२५

सही/-
विशेष वसुली व विक्री अधिकारी
श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### उजव्या पायाला दुखापत झाल्यामुळे गिलला विश्रांती

**अहमदाबाद :** भारताचा उपकर्णधार शुभमन गिल १६ डिसेंबर रोजी लखनौमध्ये नेट सराव सत्रादरम्यान उजव्या पायाला झालेल्या दुखापतीमुळे शुक्रवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पाचव्या आणि अंतिम टी-२० सामन्यातून बाहेर झाला आहे. गिलच्या जागी यष्टिरक्षक-फलंदाज संजू सॅमसनला अंतिम एकादशमध्ये स्थान देण्यात आले आहे. तो डावखुरा अभिषेक शर्मासोबत सलामीवीर म्हणून खेळत आहे. हा बदल भारत रत्न अटल बिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या चौथ्या टी-२० सामन्यातही होऊ शकला असता, परंतु दाट धुक्यामुळे तो सामना रद्द करण्यात आला होता. गिलच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे, परंतु तो अहमदाबादमधील अंतिम टी-२० सामन्यासाठी निवडीसाठी अनुपलब्ध असेल,'' असे बीसीसीआयने म्हटले आहे.ही घटना अशा वेळी घडली आहे, जेव्हा भारताच्या टी-२० संघात गिलच्या स्थानावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, कारण सॅमसन आणि यशस्वी जयस्वालच्या उपस्थितीमुळे स्पर्धा तीव्र झाली आहे. २५ वर्षीय गिल, टी-२० मध्ये उपकर्णधारपदी बढती मिळाल्यापासून अभिषेकसोबत भारताचा पसंतीचा सलामीवीर राहिला आहे.

# श्रीलंकेला नमवून भारत अंतिम फेरीत

## आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट

**दुबई, १९ डिसेंबर -**

शुक्रवारी येथील आयसीसी अकादमी मैदानावर खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात श्रीलंकेवर ८ गड्यांनी विजय मिळवून भारताने १९ वर्षांखालील आशिया चषक २०२५ स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. विहान मल्होत्रा व ॲरोन जॉर्जने भारतासाठी उत्कृष्ट कामगिरी केली, त्यांनी लक्ष्याचा पाठलाग करताना नाबाद अर्धशतके झळकावली आणि भारताने उपांत्य फेरीत १३९ धावांचे लक्ष्य गाठले. विहान व ॲरोनला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. आता भारत रविवारी त्याच मैदानावर अंतिम फेरीत पाकिस्तानशी लढणार आहे. दुसऱ्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानने बांगलादेशवर ८ गड्यांनी विजय नोंदविला. भारतीय



संघाचा कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून श्रीलंकेला प्रथम फलंदाजीस पाचारण केले आणि त्यांना २० षटकांत ८ बाद १३८ धावांवर रोखले.

भारताने लक्ष्याचा पाठलाग करताना प्रारंभी दोन हादरे सहन केले, परंतु त्यानंतर जोरदार मुसंडी मारत १८ षटकांत २ गडी गमावित विजयाचे लक्ष्य गाठले. श्रीलंकेकडून चामिका हिनातीगाला (४२), कर्णधार विमथ दिनसारा (३२) व सेथमिका सेनेविरत्नेने (३०) भारतीय गोलंदाजांचा धैर्याने सामने केला, परंतु इतर फलंदाज खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरू शकले नाही.

भारताकडून हेनिल पटेल व कनिष्क चौहानने प्रत्येकी २ बळी, किशन सिंग, दीपेश देवेंद्रन व खिलाव पटेलने प्रत्येकी १ बळी टिपला. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना भारताला प्रारंभी दोन हादरे बसले. आयुष म्हात्रे (७) व वैभव सूर्यवंशी (९) ही भरवशाची सलामी जोडी लवकरच बाद झाली. भारताची ३.३ षटकांत २ बाद २५ अशी स्थिती होती, परंतु त्यानंतर ॲरोन जॉर्ज व विहान मल्होत्राने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. ॲरोनने ४९ चेंडूंत ४ चौकार व एका षट्कारसह नाबाद ५८ धावांची, तर विहानने ४५ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ६१ धावांची विजयी खेळी केली.



## पटवर्धन, संगा, साहू आघाडीवर

### पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय बुद्धिबळ स्पर्धा

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय बुद्धिबळ स्पर्धेत चौथ्या फेरीअखेर खुल्या गटात विशाल पटवर्धन, अभिजीत संगा व गौरव साहू हे खेळाडू चार गुण मिळवून आघाडीवर आहेत. पंधरा वर्षांखालील गटात सानिध्य जमादार, आयुष्य जानगवळी, साईराज घोडके, प्रसेंनजित जांभळे, मयूर स्वामी हे खेळाडू चार पैकी चार गुण घेऊन आघाडीवर आहेत.ही स्पर्धा पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजिलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी यांचे हस्ते झाले. यावेळी सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक, पूर्व विभाग वाचनालयाचे उपाध्यक्ष देविदास गोटीपामुल, कार्यवाह अरविंद चिन्नी, सहकार्यवाह विजयकुमार गुल्लापल्ली, वासुदेव इपलपल्ली,संतोष पैकेकरी,प्रा.काशीराज कोळी, सौरव साहू,विशाल पटवर्धन हे उपस्थित होते.

## टी-२० विश्वचषकासाठी संघाची निवड आज

**मुंबई, १९ डिसेंबर -**

कर्णधार सूर्यकुमार यादव व उपकर्णधार शुभमन गिलचा वाईट फॉर्म ही एक मोठी चिंता आहे, परंतु राष्ट्रीय निवड समिती शनिवारी पुढील वर्षीच्या टी-२० विश्वचषकासाठी १५ सदस्यीय संघाची निवड करताना कोणतेही धक्कादायक बदल करण्याची शक्यता नाही. आगामी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धा सुरू होईपर्यंत बीसीसीआयला घोषित केलेल्या १५ खेळाडूंपैकी कोणालाही बदलण्याचे स्वातंत्र्य असेल. या वर्षाच्या सुरुवातीला चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यान, दुबईतील संथ खेळपट्ट्यांचा विचार करून वरुण चक्रवर्तीने यशस्वी जयस्वालची जागा घेतली होती.

## देगांव कनिष्ठ महाविदयालयाच्या श्रावणी सूर्यवंशीला ३ सुवर्ण

### शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

दिल्ली येथील डॉ. शामाप्रसाद मुखर्जी स्विमिंग पुल कॉम्पलेक्स येथे झालेल्या ६९व्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत देगांव येथील स्व. सौ. मिनाताई माँसाहेब ठाकरे क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या श्रावणी प्रताप सूर्यवंशी हिने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व कराताना १९ वर्षांखालील गटात तीन सुवर्ण पदकासह हॅटट्रीक केली आहे.

श्रावणीने ३ मी. स्प्रिंग बोर्डमध्ये (२७३.९५ गुण), हायबोर्डमध्ये (२७१.०० गुण) व १ मीटर स्प्रीग बोर्डमध्ये (२४५.१०) अशी तीन सुवर्णची कमाई केली. तिला आंतरराष्ट्रीय कोच श्रीकांत शेटे व क्रीडाशिक्षक श्री बेलुरे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. दिल्ली येथील संसद भवन आवारात खासदार प्रणिती शिंदे यांनी श्रावणीचा सत्कार करुन तिचे कौतुक केले. तिचे संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय वानकर, विश्वस्त विठ्ठल वानकर, प्राचार्य आर. व्ही खांडेकर आदींनी अभिनंदन केले.



दिल्ली : खासदार प्रणिती शिंदे हे श्रावणीचा सत्कार करताना. यावेळी तिचे प्रशिक्षक श्रीकांत शेटे.

**श्रावणीची १७व्या वर्षात ६७ पदकांची कमाई**

श्रावणीने १७व्या वर्षात आजपर्यंत ४७ सुवर्ण, १५ रौप्य व ५ कांस्य अशी ६७ पदकांची कमाई केली आहे. राज्य :२५ सुवर्ण, ६ रौप्य.१ कांस्य. राष्ट्रीय : २० सुवर्ण, ५ रौप्य, २ कांस्य. आातंरराष्ट्रीय : २ सुवर्ण, ४ रौप्य, २ कांस्य

## शुटिंग बॉल मैदान सुरु केल्यास असोसिएशनकडून साहित्य देणार

### असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत यांची घोषणा

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

प्रत्येक नवीन शूटिंग बॉलचा मैदानास असोसिएशनच्या वतीने शुटींग बॉलचे साहित्य भेट देणार असल्याचे असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत यांनी जाहीर केले

सोलापूर शहर व जिल्हा शुटिंगबॉल असोसिएशन व समृद्धी स्पोर्टस क्लबच्या वतीने सुभाष बाग मैदान शनिवार पेठ सोलापूर येथे ज्युनिअर व सब-ज्युनिअर जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी समृद्धी स्पोर्टस क्लबचे अध्यक्ष प्रा. राजू प्याटी, धाराशिवचे क्रीडा अधिकारी गणेश पवार



उपाध्यक्ष अलीम शेख, सचिव फैजअहमद बेगमपुरे, माजी खेळाडू हनीफ बेदरे, जाकीर जरतार, शेषराव सिरसट, प्रशिक्षक हमीद हिरोळी आणि इकबाल दलाल यांची उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. निवड समिती सदस्य म्हणून रफी दिवाण, श्रीनिवास कामूर्ती आणि अमीर काझी व पंच म्हणून शोएब बेगमपूरे, फरहान लालकोट, अमन शेख व सलीम करणकोट हे काम पहात आहेत.

**इकबाल क्लब, माळशिरसची सलामी**

मुलांच्या गटात येथील इकबाल क्लबने संजय भोसले प्रतिष्ठान माळशिरसचा २१ -१८ असा पराभव केला. सब ज्युनिअर मुलांच्या संघात संजय भोसले प्रतिष्ठान माळशिरसने सोलापूर संघाचा २१-१४ अशा फरकाने सामना जिंकत विजय संपादन केला.

## उमाबाई श्राविका विद्यालयात क्रीडा महोत्सव जल्लोषात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. १९ डिसेंबर-**

येथील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचा जल्लोषात प्रारंभ झाला. याचे उद्घाटन मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथील प्रा.डॉ. अनिल गहिनीनाथ कांबळे, प्रशालेच्या मार्गदर्शिका दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, प्रशालेचे वरिष्ठ लिपिक कांचन आगावणे सांस्कृतिक विभाग प्रमुख माधवी खोत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्रारंभी प्रशालेच्या सहशिक्षिका सोनाली उंडे व पल्लवी खांडवे यांनी गायलेल्या सुमधुर गीताद्वारे पाहुण्यांचे शब्दसुमनांनी स्वागत करण्यात आले. राज्य व जिल्हा पातळीवर क्रीडा क्षेत्रात प्रशालेचा नावलौकिक उंचावणाऱ्या खेळाडूंनी आणलेल्या मशालीद्वारे क्रीडाज्योतीचे



प्रज्वलन, क्रीडांगणाचे पूजन व हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. इयत्ता आठवी अ व ब तील विद्यार्थ्यांनी आरएसपी, स्काऊट गाईडच्या माध्यमातून शिस्तबद्ध पथसंचलनाद्वारे प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली.

मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे यांनी प्रास्ताविक केले. अतिथी परिचय सहशिक्षक अनुप कस्तुरे यांनी करून दिला. क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांनी मागील वर्षी प्रशालेने विविध क्रीडा स्पर्धेत मिळवलेल्या बक्षिसांचे वार्षिक अहवालाचे वाचन केले. इयत्ता पाचवी, सहावी, सातवीतील विद्यार्थ्यांनी यावेळी आकर्षक अशा शारीरिक कवायत, रिंग कवायत, झेंडा कवायत, घुंगरू काठी कवायत, डंबेल्स यांचे प्रशालेतील सहशिक्षक प्रवीण कंदले यांच्या मार्गदर्शनाखाली एकाच वेळी नेत्र दीपक सादरीकरण करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. सोलापूरचे पारंपरिक लोकनृत्य म्हणून लेझीमचा उल्लेख करावा लागतो. सहशिक्षक सुकुमार वारे यांच्या मार्गदर्शनाखाली लेझीमच्या सादरीकरणाच्या वेळी अक्षरशः विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधान आले होते. सोलापुरी संबळच्या तालावर विद्यार्थ्यांनी ठेका धरला. यावेळी झांज या कवायत प्रकाराचे इयत्ता नववी अ तील विद्यार्थ्यांनी सहशिक्षक अभिनंदन उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली नयन मनोहर असे प्रात्यक्षिक सादर केले. ब्राझील या परदेशी नृत्याचे सादरीकरणही प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सहशिक्षिका पल्लवी खांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली केले. विद्यार्थ्यांना आत्मसंरक्षण देण्यासाठी कराटे व मन संतुलनासाठी सूर्यनमस्कार,योगाचे धडे दिले जातात. त्याचेही प्रात्यक्षिक यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केले. सूत्रसंचालन सहशिक्षक अभिजीत पाटील तर आभार माधवी खोत यांनी मानले.



## जि.प. अंत्रोळीची गौरी शिंगण हिची राज्य खो-खो स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

मुंबई येथे २५ ते २८ डिसेंबर यादरम्यान होणाऱ्या राज्य किशोरी स्पर्धेसाठी जि.प. शाळा अंत्रोळी शाळेची गौरी शिंगण हिची निवड झाली. तिचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

वीट (ता. करमाळा) येथे झालेल्या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेसातून तिची निवड झाली. तिचे शिक्षण अधिकारी कादर शेख, उपशिक्षणाधिकारी रूपाली भावसार, गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार, विस्तार अधिकारी गुरुबाळ सनके, आयुब कलबुर्गी, केंद्रप्रमुख आमसिद्ध म्हेत्रे, मुख्याध्यापक युवराज राठोड, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष श्रीशैल कोरे सचिव सोमलिंग कोळी, शिक्षिका कीर्ती जाधव, पुष्पा बनसोडे, मीनाक्षी राठोड यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तिला शाहू स्पोर्ट्स दक्षिण सोलापूरचे सचिव श्रीरंग बनसोडे, खजिनदार नागनाथ म्हमाने यांचे मार्गदर्शन लाभले.



## टेबल टेनिस स्पर्धेत अबोली कुलकर्णीला सुवर्ण पदक

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

सुरत येथे झालेल्या वेस्ट झोन टेबल टेनिस स्पर्धेत येथील अबोली प्राणेश कुलकर्णी हिने पुणे विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करताना सुवर्ण पदक पटकाविले. या कामगिरीवर पुणे विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. तिला मनीष रावत, डॉ. नितीन तोष्णीवाल यांचे मार्गदर्शन लाभले. अबोलीचे सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजीव प्रधान यांनी अभिनंदन केले.

## 'जिव्हाळ्या'च्या आर्यन खांडेकरची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**कुर्डूवाडी, दि. १९ डिसेंबर-**



सोलापूर जिल्हा तायक्वांदो असोसिएशन यांच्यामार्फत १४ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेमध्ये जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी येथील इयत्ता नववीचा विद्यार्थीआर्यन महेश खांडेकर याने प्रथम क्रमांक मिळवला. या कामगिरीवर त्याची गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. त्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक लक्ष्मण कारंडे यांनी अभिनंदन केले.

# सोलापूर, परभणी, बीड, अहिल्यानगर, धाराशिवची बाद फेरीत धडक



## ६१वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**बीड, दि. १९ डिसेंबर-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने आणि बीड जिल्हा ॲम्युचर खो-खो संघटनेच्या आयोजनाखाली बीड येथील श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलावर सुरू असलेल्या ६१ व्या पुरुषमहिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत दुसऱ्या दिवशीही थरार कायम राहिला. पुरुष व महिला गटात सोलापूरसह रायगड, अहिल्यानगर, रत्नागिरी, परभणी व बीड संघांनी आपली आगेकूच सुरू ठेवत उपउपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

**पुरुष गट : परभणी, बीड, रायगड, रत्नागिरीची दमदार कामगिरी**

पुरुषांच्या सामन्यात यजमान बीडने जळगाववर ३२-२२ असा १० गुणांनी विजय मिळवला. बीडकडून अभिजित हिवाळे (३.३० मि. संरक्षण), अभिषेक हिवाळे (१.३० मि. संरक्षण व ४ गुण), शुभम बहिर (१.३० मि. संरक्षण व १२ गुण), तुकाराम कारंडे (१.३०, ३.१० मि. संरक्षण) तर पराभूत जळगावकडून संजय पवार (२, २.१० मि. संरक्षण) आणि मोहित महाले (१२ गुण) यांनी चमकदार खेळ केला.

परभणीने हिंगोलीवर ३१-८ असा एका डाव राखून २३ गुणांनी एकतर्फी विजय मिळवला. परभणीकडून अभय कोंडगीर (२.२० मि. संरक्षण व २ गुण) आणि अर्जुन काळे (२ मि. संरक्षण व २ गुण), ओमकार बारहाते (८ गुण) तर पराभूत हिंगोलीच्या ओमकार भोसले व कृष्णा यांनी निर्णायक योगदान दिले.

नंदुरबारने सिंधुदुर्गाचा ३७-२२ असा १५ गुणांनी पराभव केला. नंदुरबारकडून कैलास पाटील (२.३०, नाबाद ३.२० मि. संरक्षण), सचिन गोसावी (२.२० मि. संरक्षण ६ गुण), रोहित गावित (२, १.४० मि. संरक्षण व ४ गुण) तर सिंधुदुर्गकडून रॉड्रीग क्रिस्टन (२.५५ मि. संरक्षण व २ गुण), महादेव, सिद्धेश व भूषण (प्रत्येकी ४ गुण) यांनी जोरदर लढत दिली.

रत्नागिरीने लातूरचा ३१-१४ असा एक डाव राखून १७ गुणांनी विजय मिळवला. रत्नागिरीकडून सार्थक कदम (४.२० मि. संरक्षण), ओम पवार (२.१० मि. संरक्षण व ८ गुण), अजय पवार (६ गुण) यांनी चांगला खेळ केला. अन्य सामन्यात मुंबई उपनगरने नंदुरबारवर एक डाव राखून ४९-१६ असा विजय मिळवला. बलाढ्य सांगली कडून जळगाव ४८- १६ असा १डाव ३२ गुणांनी पराभूत झाला. रायगडने छत्रपती संभाजीनगरवर २८-१२ अशी बाजी मारली. मुंबईने परभणीवर २९-२२ असा १ डाव राखून ७ गुणांनी पराभव केला.

**महिला गटात सोलापूरची अहिल्यानगरवर मात**

महिला सामन्यात रत्नागिरीने नंदुरबारवर ५०- ६ असा १ डाव राखून ४४ गुणांनी विजय संपादन केला. रत्नागिरकडून साक्षी लिंगायत (३.१० मी. संरक्षण), तेजल पवार (२.५० मी. संरक्षण), वैष्णवी फुटक (८ गुण) तर पराभूत नंदुरबारकडून नेहा वसावे (१ मी. संरक्षण) यांनी जोरदार खेळ करत वाहवा मिळवली.

मुंबई उपनगरने मुंबईवर ३०-२६ असा निसटता ४ गुणांनी विजय मिळवला. उपनगरच्या साक्षी वाफेलकर (२.३०, नाबाद २.१० मि. संरक्षण ४ गुण), साक्षी पारसेकर (१.३० मी. संरक्षण व ६ गुण) सिद्धी हिंदळेकर (२ मी. संरक्षण व ४ गुण) तर पराभूत मुंबईच्या खुशबू सुतार (१.०५ मी. संरक्षण व १२ गुण), सेजल यादव (२.२८, नाबाद १.२० मि. संरक्षण), इशाली आंब्रे (२.२० मी. संरक्षण व ४ गुण) यांनी धमाकेदार खेळ करत शेवटपर्यंत प्रेक्षकंना खिळवून ठेवले.

ठाण्याने धुळ्याचा ४२-१४ असा १ डाव २८ गुणांनी विजयी मिळवला. सोलापूरने अहिल्यानगरवर ३४- १४ असा १ डाव २० गुणाने विजय मिळवला. धाराशिवने लातूरवर ३४- १० असा एक डाव राखून २४ गुणांनी विजय मिळवला. धाराशिवने रत्नागिरीवर ५७ -१६ असा विजय मिळवला.

**उपउपांत्य फेरीची तयारी; प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

साखळी सामन्यांनंतर विजयी संघ उपउपांत्य फेरीत दाखल झाले असून, बाद फेरीत विजयासाठी चुरस पाहायला मिळणार आहे. बीडच्या क्रीडारसिकांनी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, प्रकाशझोतातील सामने पाहण्यासाठी मोठी गर्दी होत आहे. विशेष म्हणजे उद्घाटनप्रसंगी साडेचौदा हजारांहून अधिक प्रेक्षकांची उपस्थिती नोंदवली गेली, त्यामुळे बीडचे क्रीडावातावरण अक्षरशः भारावून गेले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# ग्रामीण डाक जीवन विम्यातून मिळाले १० लाख ९७ हजार

## मिरे येथील शिरगिरे कुटुंबियांना मिळाला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ डिसेंबर -**

मिरे (ता.माळशिरस) येथील अविनाश निवृत्ती शिरगिरे यांनी उतरवलेल्या भारतीय डाक विभागाच्या ग्रामीण डाक जीवन विम्यातून त्यांच्या निधनानंतर रु. १० लाख ९७ हजार ८२१ चा धनादेश त्यांच्या वारसदार पत्नी कोमल अविनाश शिरगिरे याना अधिक्षक डाक, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांच्या कार्यालयामध्ये नुकताच सुपूर्द करण्यात आला.




आजच्या धावपळीच्या काळामुळे कधी काय होईल हे सांगता येत नाही याची जाण ठेऊन माळशिरस तालुक्यातील मिरे येथील अविनाश निवृत्ती शिरगिरे यांनी आपण नसल्यानंतरही आपल्या कुटुंबाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये ही गोष्ट लक्षात घेऊन बचत आणि सुरक्षा यांचा विचार करून भारतीय डाक विभागाची ग्रामीण डाक जीवन विमा पॉलिसी त्यांनी ऑक्टोबर २०२२ मध्ये घेऊन वार्षिक हप्ता रु. ५४ हजार ३५० भरून गुंतवणुकीस सुरुवात केली.

विमा स्वीकृती नंतर तीन वर्षाच्या आतच अविनाश शिरगिरे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून रीतसर प्रक्रिया पूर्ण करून पंढरपूर डाक विभागामार्फत त्यांच्या वारसदार पत्नी श्रीमती कोमल अविनाश शिरगिरे याना विमाच्या रकमेचा रु. १० लाख ९७ हजार ८२१ चा धनादेश मंगळवारी (दि.१६ डिसेंबर) अधिक्षक डाकघर, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांच्या कार्यालयामध्ये पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर, जन तक्रार निवारण अधिकारी राजेश शर्मा, पंढरपूर मुख्य डाकघरचे पोस्ट मास्टर सोमनाथ गायकवाड, विकास अधिकारी सोमनाथ कोरके सह कार्यालयातील इतर कर्मचारी यांच्या उपस्थित सुपूर्द करण्यात आला.

> ग्रामीण डाक जीवन विमा ग्रामीण भागातील कायमचे वास्तव्य असणारी आणि आगामी वाढदिवसादिवशी ज्यांचे वय १९ ते ५५ दरम्यान असणारी कोणतीही व्यक्ती या योजनेचा लाभ घेऊ शकते. या योजनेचा लाभ १० लाखापर्यंत घेऊ शकतो. तसेच भारतीय डाक विभागाची डाक जीवन विमा योजना केंद्र व राज्य कर्मचाऱ्यांसोबतच आता डिप्लोमा, पदवीधर यांच्याकरिता हिताची आहे. कोणत्याही शाखेचे पदवीधरांसाठी उपलब्ध झाली आहे. या योजनेत कमी हप्ता व जास्त बोनसचा लाभ मिळतो. ही योजना पूर्णपणे सुरक्षित आहे. या योजनेचा लाभ ५० लाखापर्यंत घेऊ शकतो. या योजनेचा सर्वांनी फायदा घ्यावा, असे आवाहन पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर यांच्याकडून करण्यात आले आहे.

## महत्वाचे...

### नविन कायद्यानुसार दाखल पहिल्या खून खटल्यातील आरोपीस उच्च न्यायालयात जामीन

**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

पार्टीसाठी तगादा लावला म्हणून मित्र विनायक हक्के याचा डोक्यात दगड घालुन खून केल्याप्रकरणी अटकेत असलेला आरोपी नागेश अण्णाराव चिक्काळे (रा. जुळे सोलापूर) याच्या जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाचे न्यायमुर्ती शिवकुमार डिगे यांच्यासमोर होवुन न्यायमुर्तींनी आरोपीची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. या प्रकरणाची हकीकत अशी की, यातील मयत विनायक हक्के व आरोपी नागेश चिक्काळे हे दोघे मित्र होते. दि. १ जुलै २०२४ रोजी यातील विनायक हक्के याने आरोपीस दारु पिण्यासाठी पैसे दे म्हणून तगादा लावला होता. या कारणावरुन मयत विनायक व आरोपी नागेश यांच्यात वाद विवाद होऊन धक्काबुक्की झाली व त्यातुन झालेल्या भांडणात रागाच्या भरात आरोपी नागेश चिक्काळे याने विनायक हाके याचा डी मार्ट समोरील पटांगणात रात्रीच्या सुमारास डोक्यात दगड घालुन खून केला असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. आरोपी नागेश चिक्काळे याचा जामीन अर्ज सोलापूर सत्र न्यायालयाने फेटाळल्यानंतर आरोपीने ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात येथे जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्कीट बेंचचे न्यायमूर्ती श्री. शिवकुमार डिगे यांच्यासमोर झाली. सदर जामीन अर्जाच्या सुनावणीवेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तिवादात आरोपी व मयत हे दोघे जिवलग मित्र होते, त्यामुळे आरोपीने खून करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही व सरकार पक्षातर्फे दाखल करण्यात आलेला पुरावा विश्वासार्ह नाही असा युक्तिवाद केला. दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकुन न्यायमुर्तींनी आरोपीची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. याप्रकरणी उच्च न्यायालयात आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. मनोज गिरी यांनी तर सरकारतर्फे ॲड. प्रियांका राणे यांनी काम पाहिले. नवीन फौजदारी कायदा भारतीय न्याय संहिता १ जुलै २०२४ पासून अंमलात आला व या नवीन कायद्या अन्वये महाराष्ट्रातील दाखल झालेला पाहिलाच खुनाचा गुन्हा होता.

### बार्शीत पोस्ट ऑफीस पासपोर्ट सेवाकेंद्र सुरु करा : खा. राजेनिंबाळकर

**बार्शी, दि. १९ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यात पासपोर्ट सेवा किंवा पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र स्थापन करावे, अशी मागणी धाराशिव मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याकडे केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, धाराशिव लोकसभा मतदारसंघातील बार्शी हा एक महत्त्वाचा तालुका आहे. येथील रहिवाशांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना, पासपोर्ट सेवेसाठी सोलापूर किंवा परभणी येथील जवळच्या पासपोर्ट सेवा केंद्र येथे १०० किलोमीटरपेक्षा जास्त प्रवास करावा लागतो. त्यामुळे मोठी गैरसोय होते. वेळेचा व पैशाचा अपव्यय होतो. त्याचबरोबर आरोग्याशी संबंधित समस्या निर्माण होतात. मंत्रालयाच्या जानेवारी २०१७च्या मार्गदर्शक तत्वांनुसार, १ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ठिकाणी पोस्ट ऑफीस पासपोर्ट सेवा केंद्र सुविधांची शिफारस केली जाते, त्यानुसार बार्शी या सुविधेस पात्र ठरते. बार्शी मुख्य पोस्ट ऑफिसमधील सध्याची पायाभूत सुविधा या उद्देशासाठी आदर्श आहे. बार्शीत पासपोर्ट सुविधा सुरु झाल्यास हजारो नागरिकांना या सुविधेचा लाभ होईल. डिजिटल इंडियास गती मिळेल.

## निधन वृत्त...

### मधुकर कुलकर्णी



**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

पोस्टल कॉलनी सोलापूर येथील रहिवासी व सेवानिवृत्त उपलेखापाल मधुकर गोविंद कुलकर्णी (शिरापूरकर, वय ८०) यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले .त्यांचे पश्चात एक मुलगा एक मुलगी डॉ. स्वप्ना कुलकर्णी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### सुधीर भालेराव



**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

येथील डॉ. सुधीर भालेराव (वय ६८) यांचे नेपाळ येथे १८ डिसेंबरला निधन झाले. त्यांची अंतयात्रा शनिवारी २० डिसेंबर रोजी लष्कर भागातील मॉडर्न हायस्कूलसमोरील उद्धार हौसिंग सोसायटीतून सकाळी ९ वाजता निघणार आहे. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा व चार बहिणी असा परिवार आहे.

### रेवणसिद्ध चौगुले



**सोलापूर, दि. १९ डिसेंबर-**

रेवणसिद्ध व्यंकटेश चौगुले (वय ७२) वर्षे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले असून ते सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे उपायुक्त नागनाथ चौगुले यांचे वडील होत. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी (आज) सकाळी १० वाजता त्यांचा राहत्या घरापासून दत्तनगर न्यू डब्ल्यू आयटी कॉलेज पासून निघणार आहे.

रेवणसिद्ध चौगुले यांनी कला शिक्षकाची सेवा बजावली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे व त्यांना सख्खे सात भाऊ व सहा बहिणी असा मोठा परिवार आहे.

### रमेश ठोकडे



**कुर्डूवाडी, दि. १९ डिसेंबर-**

येथील रमेश जगन्नाथ ठोकडे यांचे शुक्रवारी सकाळी ९च्या सुमारास सोलापूर येथे उपचारा दरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षाचे होते. आध्यत्मिक क्षेत्रात ते लिंगायत समाजाचे मार्गदर्शक होते. तहसीलदार शिल्पा ठोकडे व आडत व्यापारी रविंद्र ठोकडे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### शंकर काळे



**अकलूज, दि. १९ डिसेंबर-**

येथील पत्रकार शंकर बबनराव काळे (वय ५० वर्षे) यांचे आज पहाटे शुक्रवार, दि. १९ डिसेंबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, मुलगा, विवाहित मुलगी, जावई, सुन, नातवंडे असा परिवार आहे.



## एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग ॲन्ड रिसर्चतर्फे आंतरराष्ट्रीय ई-वाहन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १९ डिसेंबर-**

बार्शी येथील एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्चच्यावतीने आणि ईव्ही फार्म इंडिया पुणे यांच्या सहकार्याने आयोजित 'इलेक्ट्रिक व्हेईकल्स, बॅटरीज अँड सेन्सर्स' या तीन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी एनआयटी गोव्याचे सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. सुरेश मिक्किली, ईव्ही फार्म इंडियाचे संचालक भूषण नावरकर, एम आयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्चच्या मार्गदर्शक प्रा. प्रभा कासलीवाल, प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात प्रा. स्वाती कराड चाटे यांनी सांगितले की, 'विकसनशील देशांनी प्रगती करताना पाश्चिमात्य देशांकडून झालेल्या चुकांमधून शिकून आणि स्थानिक गरजा ओळखून विकासाची दिशा ठरवली पाहिजे. निसर्गातील विविध घटकांचे सहअस्तित्व आणि शाश्वततेकडे नेणारा विकास हाच खरा भविष्याचा मार्ग आहे.' पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, 'आजचे विद्यार्थी भविष्यात देशाच्या विकासाचे एक घटक असणार आहेत, तेव्हा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना वर्गातील शिक्षणाबरोबर तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभवासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळांचे आयोजन आवश्यक आहे.' डॉ. सुरेश मिक्किली यांनी ई-वाहन क्षेत्रातील संशोधन व नवकल्पनांसाठी उपलब्ध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय निधी आणि भारतात ई-वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारतर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले. भूषण नावरकर उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, भारतातील ई-वाहन तंत्रज्ञानातील प्रगती व भविष्यातील संधी याबाबत माहिती दिली.

प्रा. प्रभा कासलीवाल यांनी इलेक्ट्रिक वाहनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करत शाश्वत विकासामध्ये त्यांची भूमिका मांडली तर प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे यांनी संस्थेची दृष्टी, शैक्षणिक गुणवत्ता आणि संशोधनाभिमुख उपक्रमांची माहिती दिली. ई-वाहन तंत्रज्ञान, बॅटरी व्यवस्थापन, सेन्सर प्रणाली, ईव्ही पायाभूत सुविधा आणि स्मार्ट एनर्जी सिस्टिम्स अशा विविध विषयांवर या कार्यशाळेत तज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. संजय माने यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया जोशी यांनी केले.

## बार्शी कृषी बाजार समितीच्या सभापतीपदी गरड; उपसभापतीपदी बाबासाहेब गायकवाड यांची निवड



### बाजारपेठेत शेतकरी केंद्रबिंदू म्हणून काम करा : माजी आ. राजेंद्र राऊत यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १९ डिसेंबर -**

येथील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी पांगरीतील विजय गरड यांची तर उपसभापतीपदी वैराग भागातील शेळगाव (आर) चे बाबासाहेब गायकवाड यांची आज सर्वानुमते निवड झाली सभापतीपदी निवड झालेले विजय गरड हे माजी आमदार राजाभाऊ राऊत यांचे गेली तीस वर्षे निष्ठावंत समर्थक असून त्यांनी यापूर्वी बार्शी तालुका पंचायत समितीचे उपसभापतीपद व जिल्हा नियोजन आणि विकास मंडळाचे सदस्य पद भूषविलेले आहे तर उपसभापतीपदी निवड झालेले बाबासाहेब गायकवाड हे वैराग भागातील शेळगाव (आर)चे शिक्षण संस्था चालक आहेत. आज बाजार समितीच्या कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे सहा. निवडणूक अधिकारी अनिस सय्यद यांच्या उपस्थितीमध्ये ही निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी विजय गरड यांचे नाव खामगाव येथील प्रभाकर डमरे यांनी सुचवले तर उपसभापतीपदी गायकवाड यांचे नाव सुरेश गुंड यांनी सुचवले.

माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर आढळ विश्वास ठेवून काम करत आहे. यापुढे बाजार समितीला पणन मंत्री जयकुमार रावल यांची सदिच्छा भेट ठरवली आहे. तसेच यापुढे नूतन संचालक मंडळाने बाजार समितीचा कारभार करताना सर्वांना विश्वासात घेऊन आणि शेतकरी केंद्रबिंदू मानून काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. बाजार समितीचे माजी सभापती रणवीर राऊत यांनी सर्वच घटकांनी एकजुटीने काम केल्यामुळे विजय झाला आहे, असे मत व्यक्त केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील बाजार समितीचे माजी संचालक रावसाहेब मनगिरे तसेच सुधीर बारबोले, संतोष निंबाळकर, अरुण कापसे, बाबासाहेब कापसे, भाऊसाहेब आंधळकर, दादा गायकवाड बाजार समितीचे सर्व नूतन संचालक सौ सुमन पाटील, सौ मनीषा ताकभाते, भरतेस गांधी, प्रवीण गायकवाड, यशवंत माने, अजित बारंगुळे, विक्रम धायतिडक, सुरेश गुंड, अभिजीत कापसे, संजय माळी, गजेंद्र मुकटे, माजी संचालक साहेबराव देशमुख, सचिव तुकाराम जगदाळे आदी उपस्थित होते. यावेळी संदीप मिरगणे यांनी सूत्रसंचालन तर यशवंत माने यांनी आभार मानले.

## गुरु शिष्य परंपरेचा दीपस्तंभ

**श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजीनी सन १९३९ रोजी रथसप्तमीच्या दिवशी सोलापुरातील उत्तर कसबा येथे श्री मद्वीरशैव गुरुकुल स्थापना केली.या गुरुकुलात अनेक बटु शिकून जगद्गुरु, शिवाचार्य, पुरोहितकार, पंडित बनले. महास्वामीजीनी भवानी पेठ येथे सिद्धलिंग आश्रम काढून खेड्यापाड्यातील मुलांना राहण्याची सोय केली त्यामुळे आज हजारो विद्यार्थी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करित आहेत. पुढे ६ फेब्रुवारी १९५६ रोजी महास्वामीजी लिंगैक्य झाले .गुरु वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांचे अनेक संकल्प अपुर्ण राहिले .त्यांचे शिष्य तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजीनी गुरुंचे संकल्प पूर्ण करण्याचे विडा उचलला आणि पुढे आपल्या गुरुंच्या नावाने शाळा काढून ज्ञान गंगा खेड्यापाड्यात पोहोचली. असे ज्ञान योगी ,महान तपस्वी तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजीनी सन १९५९ मध्ये एसब व्ही सी एसब हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय होटगी व एसब व्ही सी एसब हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बोरामणी येथे पहिल्यांदा शाळा सुरू केली.**



सन १९८० मध्ये भगवती गौरीमाता प्रशाला धोत्री, सन १९८४ मध्ये श्री वीरतपस्वी प्राथमिक शाळा एमब आय डी सी.सोलापूर,सन १९८४ एसब व्ही सी एसब हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, एम आय डी सी,सोलापूर,सनब १९८४ मध्ये श्री वीरतपस्वी प्राथमिक शाळा भवानी पेठ , सोलापूर,सन १९८४ श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य अध्यापक विद्यालय एमआयडीसी सोलापूर,सन १९८५ साली श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य हायस्कूल वक्कलगेरा गुलबर्गा,सनब १९८७ मध्ये एसब व्ही सी एसब हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय भवानी पेठ,सनब १९८९ मध्ये जगद्गुरु रेवणध्देश्वर हायस्कूल, लिंबीचिंचोळी, सनब १९९० मध्ये श्री वीरतपस्वी कन्नड प्राथमिक शाळा भवानी पेठ, सोलापूर,

सनब १९९२ मध्ये श्री स्वामी समर्थ प्रशाला अरळी,सन १९९२ मध्ये कर्नाटक येथे वीरतपस्वी स्कूल, बिद्दापूर कॉलनी गुलबर्गा,सनब १९९७ मध्ये श्री मल्लिकार्जुन प्रशाला बोरेगाव,सनब २००३ मध्ये मातोश्री रत्नाबाई जिवबा काळे प्रशाला सातनदुधनी,सनब २००३ मध्ये श्री लक्कमा देवी प्रशाला दर्गनहळ्ळी,सन २००८ मध्ये वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र विद्यालय एम.आय.डी.सी सोलापूर,देशाची राजधानी दिल्ली येथे सन २०१० मध्ये एस व्ही सी एस पब्लिक स्कूल संगम विहार नई दिल्ली, सन २०१० मध्ये वीरतपस्वी इंग्लिश मीडियम स्कूल एम.आय.डी.सी. सोलापूर,सनब २०१२ मध्ये श्री सिद्धेश्वर मराठी प्राथमिक शाळा विडी घरकुल सोलापूर,सन २०१२ श्री मार्कंडेय हायस्कूल विडी घरकुल, सोलापूर,सनब २०१३ मध्ये श्री सिद्धेश्वर कनिष्ठ महाविद्यालय विडी घरकुल सोलापूर,सन १०१५ मध्ये वीरतपस्वी इंग्लिश मीडियम स्कूल बोरामणी व

एसब व्ही सी एसब हायस्कूल, तळवारगेरी कर्नाटक यासह पूर्व प्राथमिक ते प्राथमिक , वाचनालय, वसतिगृह असे ५३ विविध विद्या शाखा काढल्याने खेड्यापाड्यातील हजारो मुला-मुलींना शिक्षण घेता येणे शक्य झाले. या सर्व शाखा समृद्ध होण्यासाठी महास्वामीजीनी पुढे मुख्याध्यापक ए.जी. कुंभार सर यांच्यावर पुर्ण जबाबदारी दिली. ए.जी. कुंभार सर यांनी गुरुंची आज्ञा शिरसावंद्य मानून अहोरात्र मेहनत घेतली.

गुरु शिष्य नात्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गुरु शिष्याच्या जीवनाला योग्य दिशा दाखवितात .शिष्याला अज्ञानाच्या अंधारातून बाहेर काढून ज्ञानाचा प्रकाश देतात. त्यामुळे शिष्याचे जीवन उजळून जाते. प्राचीन काळात गुरुकुल पद्धतीत गुरु शिष्याचे नाते फार घट्ट होते. गुरु शिष्याला चांगले शिस्त, संस्कार आणि मूल्य शिकवतात. शिष्यामधील क्षमतांना ओळखून गुरु त्याचा विकास करून घेतात. हे नाते विश्वास ,आदर ,समर्पणावर आधारित असते .उत्तम आचरण असणाऱ्या गुरूमुळे समाजात सुसंस्कृत आणि विवेकी व्यक्तिमत्त्वाचे जडणघडण होते. अशी अनेक उदाहरणे आपण प्राचीन काळापासून पाहत आलो आहोत. द्रोणाचार्य -अर्जुन , सांदिपनी -कृष्ण ,वशिष्ठ -राम, आचार्य चाणक्य- चंद्रगुप्त मौर्य, अशीच जोडी १९ व्या शतकात मी स्वतः अनुभवलेली ती म्हणजे श्री बृहन्मठ होटगी मठाचे मठाधिपती श्री गुरु तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी व त्यांचे शिष्य श्री ए जी कुंभार सर .खेडोपाडी शिक्षणाची गंगा या दोन्ही गुरु शिष्याने त्यांना शक्य तेवढी पोहोचवली. धर्म व शिक्षण या दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे श्री गुरु वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजीनी त्यांचे शिष्य श्री तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजीना सांगितले व त्यांनी त्यांचे शिष्य श्री ए.जी. कुंभार यांना सांगितले. आपल्या गुरूंच्या आज्ञेनुसार श्री तपोरत्नम योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींनी अध्यात्माची गंगा तपोनुष्ठानाच्याद्वारे दारोदारी पोहोचविली. आपल्या गुरुंनी दाखविलेल्या अध्यात्माच्या मार्गावर मार्गक्रमण करत असताना ते श्रावण मासात ४१ दिवस, धनुर्मासात ३० दिवस नवरात्रीत ९ दिवस तपोनुष्ठान करीत असत. त्यांनी भक्ताच्या उद्धारासाठी आपले अनुष्ठान जगद्गुरूंच्या पंचपीठाच्या क्षेत्री,भारतातील वेगवेगळ्या तीर्थस्थानाच्या ठिकाणी, नदीच्या काठी, ग्रामीण भागातील वाडी- वस्त्यावर केले. अनुष्ठानाच्या ठिकाणी धर्मग्रंथाचे पारायण व प्रवचनाचे आयोजन करून धार्मिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबर भारतीय संस्कृतीची जोपासना कशी करावी याचेही ज्ञान सर्वसामान्य भक्तगणांना मिळत असे. श्रावण महिन्यात तिसऱ्या सोमवारी श्री सिद्धेश्वर महाराजांच्या मंदिरात भेटीला येणाऱ्या सर्व पालख्यांचे स्वागत सोबत येणाऱ्या भाविकांच्या खाण्यापिण्याची ,झोपण्याची, विश्रांतीची व्यवस्था आप्पाजी अन्नछत्रात करायला लावीत. शालेय शिक्षणासोबत पौरोहित्याचे शिबिर प्रतिवर्षी मे महिन्यात आयोजित केले जात. त्या शिबिरात महास्वामीजी स्वतः जातीने लक्ष देत असत.भक्तासाठी शिक्षणाचे प्रसादाची सोय करणारे महास्वामीजी मात्र स्वतः पत्राच्या शेडमध्ये राहत असत. स्वतःच्या विश्रांतीसाठी चटईचा वापर करत त्यांनी स्थापन केलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांना आपल्या गुरूंचे नाव दिले. प्रत्येक मठामध्ये आपल्या गुरूंचे मंदिर त्यांनी बांधले. समाजातील भक्तगणांना आपल्या गुरूंची ओळख आपल्या कार्यातून आपल्या आचरणातून करून दिली. स्वतःजवळ अगदी काहीही नसताना अपूर्व अशा थाटामाटातील श्री वीरतपस्वी मंदिराची, मठाची उभारणी त्यांनी केली. मठाला अभेद्य अशा भक्तांची मांदियाळी उभी करून दिली. भक्तांना त्यांचे वैराग्यधारी जीवन पहावत नव्हते. भक्त त्यांना राहण्यासाठी चांगले बांधकाम असलेले मठाचे आग्रह धरून स्वतः देणगी देऊन बांधून देण्यास आग्रही होते. त्यांना फिरायला अनेक भक्तांनी वेगवेगळ्या गाड्या मठात आणून लावलेल्या होत्या. जर महास्वामीजींच्या मनात आले असते तर त्यांनी या सगळ्याचा स्वीकार केला असता पण त्यांच्या गुरूंची विचारधारा खूप प्रभावी असल्याने त्यांनी कधीही शिवाचार्य आचरण सोडलेले नाही व समाजासमोर उच्च असे स्वतःचे उदाहरण प्रस्थापित केले .श्री वीरतपस्वी मंदिराच्या बांधकामासाठी महाराज झोळी घेऊन स्वतः अनवाणी दारोदारी भक्ताच्या घरी जाऊन भक्त देतील तेवढे वर्गणी आनंदाने घेत असत. त्याच्या अनवाणी फिरण्याने त्यांच्या पायाला झालेला जखमांचा दाह आजही त्यांच्या प्रत्येक भक्ताच्या मनामध्ये जिवंत आहे. महास्वामीजींच्या संकल्पनेतून, त्यांच्या मार्गदर्शनातून व ए जी कुंभार सरांच्या कष्टातून, त्यागातून उभी राहिलेली श्री बृहन्मठ होटगी शिक्षण संस्था ही आज वटवृक्षात रूपांतरित झालेली आहे. प्रत्येकांच्या घरापर्यंत ज्ञान गंगा पोहोचवणाऱ्या ज्ञानयोगी सद्गुरू २० डिसेंबर २०१७ ला आपला देह त्यागून ते अनंतात विलीन झाले .महास्वामीजींनी आपल्या संकल्प सिद्धीच्या कार्यक्रमाची जबाबदारी आपल्या सर्व भक्तांवर सोपविली. जाताना

***सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः ।***
***सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिदब दुःखभाग्भवेतब ।***

जगाचा ,भक्तांच्या कल्याणाचा विचार करीत महास्वामीजींनी निरोप घेतला. आपल्या गुरुशिवाय मठात ए. जी. कुंभार सरांनाही कामात निरुत्साह जाणवू लागली. सरांनी प्रकृतीच्या कारणास्तव मठाच्या व शैक्षणिक संस्थेच्या कार्यातून स्वेच्छानिवृत्ती घेतली. या गुरु शिष्याच्या मांदियाळी ला २४ ऑगस्ट २०२५ रोजी श्री काशी पीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ.मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजीनी कुंभार सरांना 'श्री होटगीश्वर चिंतामणी रत्न' पुरस्कार देऊन गौरव केला.

आपल्या गुरूंना थोर करणाऱ्या या दोन्ही गुरु-शिष्यांना मी मनस्वी कोटी कोटी वंदन करते.

**- सौ. वैशाली सिद्धाराम कुंभार**
**राजराजेश्वरी बालक मंदिर**
**प्राथमिक शाळा. सोलापूर**

# ‘चाऊर चाऊर चांगभले’च्या निनादाने घुमला शिवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

शेतातील पिकांच्या रक्षणार्थ केली जाणारा वेळ अमावस्येनिमित्तची पांडवपूजा आज जिल्ह्यात मोठ्या उत्साहात करण्यात आली. शेतशिवारात आहार, भक्ती अन् सामुदायिक एकतेची सांगड घालणाऱ्या या उत्सवात प्रत्येकाच्या शेतात पांडवपूजेनंतर होणाऱ्या‘चाऊर चाऊर चांगभले..पाऊस आला चल भले’ च्या निनादाने शेतशिवार शहारून गेला होता. यानिमित्त शेतशिवारात आप्तेष्टांसह सर्वांनी विशेष भोजनाचा तसेच रानमेव्याचाही आस्वाद घेतला.

## जिल्ह्यात वेळ अमावस्या उत्साहात; पांडवपूजेसह बाजरीचे उंडे, भज्जीची भाजी अन् अंबिलाचा घेतला आस्वाद





मार्गशीर्ष महिन्यातील शेवटच्या दिवशी वेळ अमावस्या साजरी केली जाते. कृषी संस्कृतीचा आत्मा मानला गेलेल्या मार्गशीर्ष महिन्यातील या अमावास्येला सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत शेतशिवारात माणसांची गर्दी होते. निसर्गाच्या ऋणाची जाणीव ठेवत हा उत्सव साजरा केला जातो. शेती ही केवळ उपजीविका नसून जीवनपद्धती आहे, हे अधोरेखित करणारा हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला गेला आहे. यादिवशी शेतकरी आपल्या शेतात नवधान्याची कोपी उभारतात. या कोपीचे तोंड पूर्वेकडे ठेवले जाते, जे समृद्धीचे आणि नव्या ऊर्जेचे प्रतीक मानले जाते. कोपीमध्ये पाच दगड ठेवले जातात आणि त्यांची पूजा पंचमहाभूते किंवा पांडव म्हणून केली जाते. माती, पीक आणि निसर्गालाच देव मानले जाते. या सणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वनभोजन. शेतातच सर्व कुटुंब एकत्र येऊन जेवण करतात. बाजरीचे ऊंडे, भाकरी, शेंगापोळी, खीर, विविध पालेभाज्यांपासून तयार केलेली पौष्टिक भज्जीची भाजी आणि ज्वारीच्या पिठासह ताकाचे केलेले चविष्ट आंबिल ही या दिवसाची खास मेजवानी असते. थंडीच्या दिवसांत शरीराला उष्णता आणि पोषण देणारे हे पदार्थ आरोग्यदायी मानले जातात. विशेष म्हणजे या दिवशी जात-पात, धर्म यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वजण एकाच पंगतीत जेवतात. त्यामुळे सामाजिक समतेचा संदेश देणारा हा सण ठरतो. जिल्ह्यातील शिवारात आज दिवसभर या विशेष मेनूच्या जेवणावळी झडल्या. यामधील शहरी मठ्ठ्याला लाजवणाऱ्या अंबिलावर अनेकांनी यथेच्छ ताव मारला. यावेळी शिवारात फेरफटका मारताना अनेकांनी बोरे, चिंचा, ऊस, मक्याचे कणीस, हरभरा या रानमेव्याचाही आस्वाद घेतला.

सायंकाळी रानातून घरी येताना शेतात पूजन केलेल्या पांडवपूजेतील मोगा (मातीपासून बनवलेला तांब्या) घेऊन तो दिव्यासह एका टोपलीत ठेवून त्या टोपलीला नवधान्याने बांधून ‘लक्ष्मीची पाटी‘असे संबोधत घरी आणण्यात आली. शिव पार्वते शिव हर हर म हादेव...च्या गजरात अनेक गावात या पाट्यांची एकत्रित मिरवणूक काढण्यात आली. घरी आलेल्या या नवधान्यरूपी लक्ष्मीचे घरच्या सुवासिनींकडून पूजन करण्यात आले.




# ‘विहिंप’च्या पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्षपदी प्रा.धरणे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ डिसेंबर-**




विहिंप अर्थात विश्व हिंदू परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्षपदी सोलापुरातील सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकचे प्राचार्य गजानन धरणे यांची नियुक्ती करण्यात आली. विद्यार्थी दशेपासून ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये अनेक दायित्व सांभाळले आहेत.



हस्तिनापूर येथे झालेल्या प्रन्यासी बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी मुंबई क्षेत्र मंत्री रामचंद रामुका, सहमंत्री प्रा.अनंत पांडे, पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण, सहमंत्री ॲड.सतीश गोरडे, सहमंत्री नीतीन वाटकर, संघटनमंत्री अनिरुध्द पंडित आदींची प्रमुख उपस्थिती होती. भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, सोलापूर जनता सहकारी बँक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र, हिंदू वीरशैव लिंगायत मंच, श्री सिध्देश्वर शिक्षण मंडळ यांसह अन्य संस्थांवरही त्यांनी काम पाहिले-पाहत आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# ‘महाविकास आघाडी’चा फॉर्म्युला उद्या ठरणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ डिसेंबर**



सोलापूर महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने ‘महाविकास आघाडी’च्या प्रमुख नेत्यांची बैठक रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी सोलापुरातील एका हॉटेलमध्ये होणार आहे. तीत ‘महाविकास आघाडी’चा फॉर्म्युला ठरणार आहे. दरम्यान, इलेक्टिव्ह मेरिटवर भर देण्याविषयी काँग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार गट, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या अध्यक्षांचे एकमत झाल्याचे सांगण्यात आले.

**इलेक्टिव्ह मेरिटवर भर देण्याविषयी एकमत**

सर्वप्रथम मागील निवडणुकीचा इतिवृत्तांत पाहून ज्या प्रभागात आघाडीतील मित्र पक्षांचे प्राबल्य आहे, ती जागा आघाडीतील मित्र पक्षांच्या वाट्याला येतील. नंतर ज्या प्रभागात आघाडीतील पक्षांचे बलाबल पाहता त्या-त्या जागा सोडल्या जातील. अशी प्राथमिक चर्चा यापूर्वी महेश गादेकर यांच्या हॉटेल सिटी पार्कमध्ये झाली होती. तोच इलेक्टिव्ह मेरिटचा फॉर्म्युला पुढे नेण्याचा मनोदय चारही मित्रपक्षांच्या नेत्यांचा कायम आहे. सोलापूर शहरातील प्रभाग १ ते २६ मधील माजी नगरसेवकांना प्राधान्यक्रम राहणार आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी बूथ यंत्रणा मजबूत करण्यावर भर राहणार आहे. सत्ताधारी पक्षाच्या विरोधात जनतेत प्रचंड रोष आहे. ही बाब लक्षात घेवून महाविकास आघाडीतील मित्रपक्ष आपल्या इलेक्टीव्ह मेटवरच भर देतील. यासाठी रविवारी सविस्तर चर्चा केली जाणार आहे, असेही सांगण्यात आले.

आघाडी संदर्भात महत्त्वाची बैठक त्यानंतर निर्णय : जनता आमच्या पाठीमागे आहे. भाजपाला पराभूत करणे हे प्रमुख उद्देश राहणार आहे. आगामी महापालिका निवडणूक जागा वाटप प्रभाग रचनेप्रमाणे आखले जाईल. त्यासाठी रविवारच्या बैठकीत सविस्तर चर्चा होईल. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांसोबतही बैठक होईल. सर्वजण एकत्र येऊन पुढील रणनीती आखणार आहोत, असे काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी सांगितले. आमचे लक्ष केवळ भाजपचा सुफडा साफ करणे : आमचे लक्ष केवळ भाजपचा सुफडा साफ करणे हाच राहणार आहे. आमच्या पक्षातील इच्छुकांच्या मुलाखती येत्या दोन दिवसात घेतले जातील. त्यासाठी शिवसेना पक्षाचे निरीक्षक लवकरात सोलापुरात येणार आहेत. स्थानिक सर्वे, त्याचा अहवाल तसेच आघाडीतील चर्चेतील मुद्दे वरिष्ठ पातळीवर पाठवले जातील, असे शिवसेना उबाठाचे शहर प्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांनी सांगितले.

**आघाडी निश्चित होणार**

महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्मुला इलेक्टिव्ह मेरिटवरच ठरणार आहे. त्यासाठी महाविकास आघाडीच्या मोजक्याच प्रमुख नेत्यांची बैठक रविवारी घेण्यात येणार आहे. माजी नगरसेवकांना त्यांचे प्रभाग सोडण्यात येईल. उर्वरित प्रभागावर चर्चा केली जाईल. आघाडी निश्चित होणार आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी सांगितले.

### ‘राकाँ’चे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिला

# सोलापूरच्या पदाधिकाऱ्यांना राजकीय बुस्टर डोस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक सक्षम पध्दतीने लढवा, राष्ट्रवादी पक्षाची संपूर्ण ताकद आपल्या पाठीशी उभी करतो, असे सांगत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी सोलापूरच्या पदाधिकाऱ्यांना जणू राजकीय बुस्टर डोस दिला.



मुंबईस्थित कुलाबा येथील महिला विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या पक्षसंघटनेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून जोरदार तयारी सुरु आहे. गेल्या ३ दिवसात तब्बल ४१२ इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. हा आकडा ५०० च्या वर जाईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. इच्छुकांचा सर्व्हे करण्यासाठी टीम येणार आहे. त्यांच्याकडून प्रदेशला अहवाल येईल. त्यानंतर उमेदवार निश्चित होतील. स्थानिक पातळीवर महायुती करण्या संदर्भातला निर्णय संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे आणि सहसंपर्क प्रमुख अण्णा बनसोडे घेणार आहेत, असे सांगण्यात आले. महानगरपालिका निवडणुकीसाठी सोलापूरच्या राष्ट्रवादी पक्षाच्या इतिहासात प्रथमच ४१२ इच्छुक उमेदवारांचे अर्ज आले, असे शहराध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ नेते चंद्रकांत दायमा, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले उपस्थित होते.

# ‘वाडिया’मध्ये एक हजार रुग्णांचा टप्पा पार

**सोलापूर, दि.१९ डिसेंबर-**

सन १९३४ साली स्थापन झालेले वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल मध्यंतरीच्या काळात बंद होते. गत गुरुपौर्णिमेच्या दिवशी सदर हॉस्पिटल पूर्ववत सुरु करण्यात आले. गुरुपौर्णिमा ते आजपर्यंत १००० पेक्षा जास्त रुग्णांनी लाभ घेतला. ३५० पेक्षा जास्त रुग्णांनी मोफत तपासणी सेवेचा लाभ घेतला. वाडियातील रुग्ण आणि इतर नागरिकांना याचा लाभ होत आहे. २२ ज्येष्ठ सेवाव्रती कोणताही मोबदला न घेता वाडियामध्ये रुग्णांच्या मार्गदर्शनासाठी व आधारासाठी निस्वार्थ सेवा देत आहेत.



सोलापूर : शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते मरिआई चौकातील पाडलेल्या रेल्वे पुलाच्या उर्वरित कामासाठी शुक्रवारी मेगाब्लॉक घेण्यात आला.

# शहर-जिल्ह्यात १४ लाख ३३ हजार नागरिकांकडे आयुष्मान कार्ड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१९ डिसेंबर-**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार राज्यात आयुष्यमान भारत ही महत्वाकांक्षी योजना सर्वसामान्यांसाठी राबविली जात आहे. सोलापूर जिल्ह्यातील या योजनेची गतीमानता तपासण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जि.प.चे सीईओ कुलदीप जंगम यांनी नुकतीच आढावा बैठक घेतली. शहर-जिल्ह्यात ४० लाख ९१ हजार लाभार्थींपैकी १४ लाख ३३ हजार जणांना आयुष्मान कार्ड मिळाले आहे. नागरिकांना आयुष्मान कार्ड करुन देणाऱ्या सेवाधारकांना प्रतिकार्ड ८ ऐवजी ३० रुपये मानधन दिले जाणार आहे.




आयुष्मान भारत या योजनेत सोलापूर महापालिका प्रशासन व योजनेच्या तत्कालिन जिल्हा समन्वयकांची कामगिरी असमाधानकारक असल्याची खंत आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी सोलापूर दौऱ्यात व्यक्त केली होती. त्यानुसार जिल्हा समन्वयकाची बदली करण्यात आली होती. त्यांच्या जागी जिल्हा समन्वयक म्हणून आता डॉ.प्रवीण गुंजाळ यांची नियुक्ती करण्यात आली.


डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या सोलापूर दौऱ्यातंर्गत आयुष्मान योजनासंदर्भात बोलाविलेल्या बैठकीस सोलापूर महापालिकेकडील एकही अधिकारी, कर्मचारी उपस्थित नव्हते. याकडे लक्ष वेधत त्यांनी महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांना खडे बोल सुनावले होते. यामुळे आयुष्मान भारत योजनेवरील मनपाच्या कामात आता सुधारणा होत आहे. दरम्यान, या योजनेची सध्यस्थिती पाहण्यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी बैठक घेवून मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. जिल्ह्यातील ११४ हॉस्पीटलमध्ये आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वैद्यकीय उपचार देण्यात येतात. रुग्ण व हॉस्पीटल या दोघांचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे. जिल्ह्यातील ४०-४५ टक्के लाभार्थ्यांना कार्ड वितरित करण्यात आले आहेत. ग्रामीण भागात चांगले काम असून शहरातही या योजनेस गती देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

### ‘वय वंदना’तून वृध्दांना १० लाखांची मदत

‘वय वंदना आरोग्य योजना’ ही आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेली एक विशेष आरोग्य विमा योजना आहे. जी त्यांना दरवर्षी ५ लाखांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार (कॅशलेस) पुरवते, त्यात आता सुधारणा करुन १० लाखांचे उपचार केले आहेत. यासाठी कोणतेही उत्पन्न किंवा सामाजिक-आर्थिक निकष तपासले जात नाहीत. यासाठी 'आयुष्मान वय वंदना कार्ड' दिले जाते. आपल्या जिल्ह्यात अशी ८ हजार ४०० आरोग्य कार्ड दिली आहेत, असे जिल्हा समन्वयक डॉ.प्रवीण गुंजाळ यांनी सांगितले.

### ८ ऐवजी ३० रुपये प्रतिकार्ड मानधन

आयुष्मान भारत ही योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या आणि प्रत्येक नागरिकांचे आरोग्य कार्ड काढणाऱ्या आशाताई, रेशन दुकानदार आणि महाईसेवा केंद्रधारकांना आता प्रतिकार्ड ८ ऐवजी ३० रुपये मानधन दिले जाणार आहे. यामुळे जिल्ह्यातील कार्डसंख्या गतीने वाढण्यास मदत होईल, असे जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी सांगितले.



धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तुळजापूर न.प. वाढीव हद्दीत अंगणवाडी सुरू करा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ डिसेंबर -**

शहरातील नगरपरिषद वाढीव हद्दीत नवीन अंगणवाडी सुरू करण्याची मागणी येथील रहिवाशांनी महिला व बालकल्याण अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगरपरिषदेच्या वाढीव हद्दीतील पांडुरंग नगर, सहारा गौरव, लमान तांडा, मोतीझरा, तुळजामाता इंग्लिश स्कूल परिसर, वंदे मातरम् नगर व शिक्षक कॉलनी या भागांमध्ये सध्या कोणत्याही प्रकारची अंगणवाडी उपलब्ध नसल्याने येथील लहान मुले अंगणवाडी सेवांपासून वंचित राहत आहेत, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या सर्व परिसरांतील लहान मुलांच्या सोयीसाठी अपसिंगा रोडवरील मध्यवर्ती ठिकाणी नवीन अंगणवाडी सुरू करावी, अशी ठाम मागणी वाढीव हद्दीत नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे.

निवेदनावर जयकुमार पांढरे, चेतन पांडागळे, सुमित मोरे, कुलदीप ढाले, अनूप लोखंडे, धनंजय पवार, आनूप गवळी, उषा जाधव, विजया भालेराव, बालाजी पानढवळे, सज्जन पांडागळे, विशाल शिंदे यांच्यासह परिसरातील सर्व रहिवाशांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### अभिषेक ढगारे यांची सैन्य दलात निवड

**कळंब, दि.१९ डिसेंबर -**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयातील ५३ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेनेचा (एन.सी.सी.) कॅडेट अभिषेक ढगारे याची भारतीय सैन्य दलात भरती झाली असून, ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या यशासाठी त्यांना एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट डॉ.के.डब्ल्यू. पावडे यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, अध्यक्ष अनिल मोहेकर, उपाध्यक्ष प्रा. आबासाहेब बारकुल व संचालक डॉ. संजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१७ डिसेंबर रोजी महाविद्यालयात अभिषेक ढगारे यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत भगवान, सुनील पवार व उपप्राचार्य डॉ.के.डी. जाधव यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

### सरिता उपासे यांची निवड

**उमरगा, दि.१९ डिसेंबर -**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने आयोजित शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या स्पर्धेत




जिल्हा परिषद प्रशाला, मुळज येथील प्राथमिक पदवीधर शिक्षिका सरिता उपासे यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. लातूर येथे नुकत्याच पार पडलेल्या विभागीय स्पर्धेत 'बालमानसशास्त्र केस स्टडी' या विषयावर त्यांनी प्रभावी सादरीकरण केले. त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाची दखल घेत परीक्षकांनी त्यांची मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली आहे. या यशामुळे शाळा, गाव व तालुक्याचा नावलौकिक वाढला असून सरिता उपासे यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिक्षकवर्ग, शिक्षणप्रेमी व नागरिकांकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.



### पोलिस पाटील वर्धापन दिन साजरा

**कळंब, दि.१९ डिसेंबर -**

कळंब येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने पोलिस पाटील वर्धापन दिन उत्साहात व सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. गावपातळीवर शासन व नागरिकांमधील दुवा म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पोलिस पाटील बांधवांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे युवक तालुका प्रमुख राजे सावंत यांच्या हस्ते उपस्थित पोलिस पाटील बांधवांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास पोलिस पाटील राज्य कार्यकारिणी सदस्य राजाभाऊ वाघमारे, संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रदीप वायसे यांच्यासह उमेश पाटील, अमोल पाटील, महादेव आटकुरे, पांडुरंग मस्के, तात्यासाहेब शिंदे, धोंडीराम झांबरे आदी पोलिस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आळणी शाळेस दोन व्हाईट बोर्ड भेट

**धाराशिव, दि.१९ डिसेंबर -**

पुणे येथील डॉ. अभिषेक यशोध व डॉ. प्रियंका अभिषेक यशोध या दांपत्यांनी मुलगी आधीरा हिच्या सहाव्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आळणी या शाळेत बोर्डची गरज लक्षात घेऊन दहा हजार रुपये किमतीचे दोन व्हाईट बोर्ड शाळेस भेट स्वरूपात दिले. आज-काल वाढदिवसानिमित्त प्रचंड खर्च केला जातो पण जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये व्हाईट बोर्ड आवश्यकता पाहून अनावश्यक खर्चाला फाटा देऊन या डॉक्टर दांपत्यांनी शाळेला दोन व्हाईट बोर्ड भेट दिल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक बशीर तांबोळी व सर्व शिक्षकांनी सदर दांपत्याचे कौतुक केले. याकामी शाळेच्या शिक्षिका सीमा भंडारे यांनी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचेही आभार मानले.

### बाळासाहेब मस्के यांचे निधन

**तुळजापूर, दि.१९ डिसेंबर -**

तुळजापूर येथील प्रगतिशील शेतकरी आणि राष्ट्रीय



हॉलीबॉल खेळाडू बाळासाहेब सिद्धलिंगआप्पा मस्के यांचे शुक्रवार सकाळी आकस्मित निधन झाले. माजी नगरसेविका दीपाबाई मस्के यांचे ते पती होते. संस्कार भारतीच्या ज्येष्ठ पदाधिकारी रेणुका मस्के शीलवंत व लोककला जिल्हा संयोजक रतन मस्के यांचे ते वडील होते.

# निर्दोषांना विनाकारण गुन्ह्यामध्ये ओवू नका

**भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन; पदाधिकाऱ्यांची गर्दी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ डिसेंबर -**



शहरात दोन गटात झालेल्या हाणामारीत कुलदीप मगर यांच्या वर झालेल्या हल्ल्याप्रकरणी दोशींवर कार्यवाही करणे व विनाकारण राजकीय कोणाच्याही दबावांमध्ये न येता निर्दोष व्यक्तीची नावे गुन्ह्यामध्ये न घेण्याची मागणी येथील भाजपा पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पोलीस अधीक्षकांना पोलीस निरीक्षकामार्फत निवेदन दिले आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, दि.१६ रोजी सायंकाळच्या सुमारास कुलदीप मगर यांच्यावर शहरातील काही तरुणांनी हल्ला केला व त्यांना जखमी केले.

यामध्ये त्यांच्या डोक्याला दुखापत होऊन त्यांना सोलापूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आलेले आहे. कुलदीप मगर व मगर परिवारावर झालेली घटना ही निषेधार्य आहे व तसेच आम्ही कोणीही या घटनेचे समर्थन करीत नाहीत व झालेल्या घटनेचा निषेध करतो.

सदरील गुन्हयामधील आरोपी पोलिसांनी आज रोजी अटक केलेली आहे व त्यांच्यावरती तपासाअंती योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी तसेच पोलिसांनी सदरील घटनेमध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण न येऊ देता तसेच कुठल्याही राजकीय पुढाऱ्याच्या दबावाला बळी न पडता योग्य तो तपास करून दोषींवरती कोठारात कठोर कार्यवाही करावी.

सदरील घटनेत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद गंगणे यांचे राजकीय विरोधक गुन्ह्यामध्ये नाव घेण्याचा प्रयत्न करत आहेत. तरी सदरी घडलेल्या घटने दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज व सीडीआर तपासून योग्य कार्यवाही करावी व विनाकारण निर्दोष व्यक्तीचे नाव गुन्ह्यामध्ये घेऊ नये असे म्हटले आहे.

निवेदन देताना भाजपाचे सचिन रोचकरी, संतोष कदम, आनंद कंदले, औदुंबर कदम किशोर साठे, अध्यक्ष संदीप गंगणे, शांताराम पेंदे, माऊली भोसले, लखन पेंदे यांच्यासह शेकडो भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# अणदूर परिसरात कृषी संस्कृतीचा जिवंत वारसा; 'वेळ अमावास्या' उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा / श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.१९ डिसेंबर -**

अणदूर व परिसरात कृषी संस्कृतीचा जिवंत वारसा असलेला वेळ अमावास्या हा पारंपरिक सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी शेतशिवार माणसांनी फुलून गेले होते, तर गावे मात्र जणू अघोषित संचारबंदी लागू असल्यासारखी ओस पडलेली दिसून आली.

भारत हा कृषीप्रधान देश असून कृषीशी निगडित अनेक सण येथे साजरे केले जातात. त्यातीलच एक महत्त्वाचा सण म्हणजे वेळ अमावास्या. या दिवशी बळीराजा आपल्या शेतातील पांडवांची पूजा करून शेतातील देवदेवतांचे आगमन करून घेतो. या सणानिमित्त शेतकरी आपल्या नातेवाईकांना व मित्रपरिवाराला वनभोजनाचे खास आमंत्रण देतात.



निसर्गाशी नाते जपण्याची जिवंत परंपरा म्हणजे वेळ अमावास्या. जमीन ही केवळ उत्पादनाचे साधन नसून सहजीवनाचे जिवंत अस्तित्व आहे,

ही भावना या सणातून व्यक्त होते. जमिनीला व शेतकऱ्याला विसावा देणारी ही परंपरा केवळ शेतीचा नव्हे तर शेती संस्कृतीचा सण आहे. जमिनीला आई मानण्याची भावना, उत्पादनापेक्षा संवर्धनाला प्राधान्य, अधिक कामापेक्षा योग्य वेळेवर काम करण्याची शिकवण आणि सर्व कुटुंब एकत्र येऊन आनंद साजरा करण्याची संधी-हे या सणाचे वैशिष्ट्य आहे. अणदूर पंचक्रोशीतील सर्व ग्रामीण भागात हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वेळ अमावास्या हा सण केवळ वनभोजनापुरता मर्यादित नसून नातेसंबंधांमध्ये ओलावा निर्माण करणारा आहे. या निमित्ताने कुटुंबीय, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी एकत्र येऊन संवाद साधतात. सामाजिक सलोखा, आपुलकी व परस्पर सन्मान याचे सुंदर दर्शन शेतशिवारात घडले. ज्यांच्याकडे शेत नाही अशा शेजारी व गावातील नागरिकांनाही वनभोजनाचे आमंत्रण देण्यात आले होते.

या सणासाठी पुणे, मुंबईसारख्या शहरांत नोकरी-व्यवसायासाठी गेलेले चाकरमानी एक दिवसासाठी काळ्या आईचे दर्शन घेण्यासाठी गावाकडे आले होते. डोक्यावर अंबीलची गाडगी घेऊन ज्येष्ठ मंडळी पहाटेच शेताकडे रवाना झाली. त्यानंतर घरातील लहान मुले व महिला परंपरागत बैलगाडीतून शेतात पोहोचल्या.

शेतात पांडवांची व संपूर्ण शिवाराची पूजा करून नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर भजी, उंडे, अंबील, वांग्याचे भरीत, गव्हाची खीर, शेंगाची पोळी, तूप, दाळ-भात अशा पारंपरिक पदार्थांवर मनसोक्त ताव मारत कुटुंबीयांनी एकत्रित वनभोजनाचा आनंद घेतला.

यानंतर शिवारफेरीदरम्यान चिंचा, बोरे, डहाळे, ऊस, मोहळाचा मध, ऊसाचा रस असा रानमेवा चाखण्यात आला. गच्च भरलेल्या विहिरीत पोहण्याचा आनंद घेतला गेला, तर शेजारील शेतकरी व मित्रांसोबत गप्पा-टप्पाही रंगल्या.

संपूर्ण गाव शेतात गेल्याने एक दिवस सर्व व्यवहार बंद होते. अशा आनंदी, आपुलकीच्या व निसर्गस्नेही वातावरणात वेळ अमावास्या हा सण अणदूर परिसरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## कळंब न.प. सार्वत्रिक निवडणूकीची उद्या मतमोजणी




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१९ डिसेंबर -**

नगर परिषद कळंब अंतर्गत सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दि.२ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असून, या मतदानाची मतमोजणी रविवार, दि.२१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे.

सदर मतमोजणी प्रक्रिया श्री संत गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), कळंब येथे पार पडणार आहे. मतमोजणी नियोजित वेळेत पूर्ण व्हावी यासाठी कळंब शहरातील एकूण १० प्रभागांसाठी १० टेबलचे नियोजन करण्यात आले आहे.

यामध्ये प्रभाग क्र. १, ४, ५, ६, ९ व १० या प्रभागांमध्ये प्रत्येकी २ मतदान केंद्रे असल्याने २ फेऱ्यांत मतमोजणी पूर्ण केली जाणार आहे. तर प्रभाग क्र. २, ३, ७ व ८ या प्रभागांमध्ये ३ मतदान केंद्रे असल्याने ३ फेऱ्यांत मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

मतमोजणी प्रक्रियेसाठी १० टेबलांवर २० प्रशिक्षित कर्मचारी, तसेच वर्ग-४ मधील १० कर्मचारी नेमण्यात आले आहेत. याशिवाय संगणक व सारणी कामकाजासाठी ६ कर्मचारी, तर इतर सहाय्यक कामांसाठी ८ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने पोलिस विभागातर्फे उपविभागीय पोलीस अधिकारी १, सहाय्यक पोलीस निरीक्षक ४, पोलीस उपनिरीक्षक ३, इतर पोलीस कर्मचारी ७५ व होमगार्ड ५०, असे एकूण १३३ पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

तसेच पत्रकार बांधवांसाठी मतमोजणी केंद्राबाहेर स्वतंत्र पत्रकार कक्ष उभारण्यात आला असून, या कक्षामार्फत वेळोवेळी अधिकृत माहिती प्रसारित केली जाणार आहे.

### लोहारा तालुक्यात येळवस उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१९ डिसेंबर -**

लोहारा शहरासह संपूर्ण तालुक्यात सोमवारी दर्शवेळा अमावस्येचा येळवस (वेळ अमावस्या) हा पारंपरिक सण शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या सणामुळे शहर व तालुक्यातील गावांमध्ये दिवसभर शुकशुकाट दिसून आला, तर दुसरीकडे शेतशिवार मात्र माणसांनी गजबजून गेले होते.

या निमित्ताने लोहारा तालुक्यातील शेतकरी व नागरिकांनी दैनंदिन कामांतून वेळ काढून काळ्या आईचे ऋण व्यक्त करत विधिवत पूजन केले आणि वनभोजनाचा आनंद घेतला. शेतकऱ्यांसह शहरी भागातील अनेक कुटुंबीय ग्रामीण भागात जाऊन येळवशीच्या वनभोजनात सहभागी झाले.

## पोदार प्रेप, धाराशिव येथे 'रेल्वे स्टेशन' थीमवर आधारित थीमॅटिक टूर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ डिसेंबर -**

पोदार प्रेप, धाराशिव येथे दि. १५ ते १९ डिसेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या परिसरातच 'रेल्वे स्टेशन' या थीमवर आधारित थीमॅटिक टूर चे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासारखा शैक्षणिक आभास मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या उपक्रमांतर्गत शाळेच्या परिसरात तिकीट बुकिंग काऊंटर, प्लॅटफॉर्म, रेल्वे सिग्नल, तसेच ट्रेनचे स्टेशनवर आगमन अशा संकल्पनांची सृजनशील मांडणी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी रेल्वे प्रवासी, तिकीट तपासनीस, गार्ड आदी विविध भूमिकांमध्ये सहभाग घेतला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी रेल्वे व्यवस्थापन, प्रवासातील शिस्त तसेच वेळेचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीद्वारे आत्मसात केले. अभिनय, निरीक्षण व संवाद यांसारख्या विविध कौशल्यांचा अनुभव घेतल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह व आनंद द्विगुणित झाला.

### नळदुर्ग परिसरात वेळा अमावस्या उत्साहात; शहरात शुकशुकाट

**नळदुर्ग, दि.१९ डिसेंबर -**

नळदुर्ग शहर व परिसरात वेळा अमावस्याचा सण शेतकरी बांधवांनी साजरा केला. या सणानिमित्त शेतीशिवार माणसांनी फुलून गेले होते, तर दुसरीकडे शहरातील रस्ते दिवसभर अक्षरशः ओस पडले होते.

या दिवशी शेतकऱ्यांसह अनेक नागरिकांनी शेतात जाऊन काळ्या आईचे ऋण व्यक्त करत विधिवत पूजा केली व निसर्गाच्या सानिध्यात वनभोजनाचा मनमुराद आनंद लुटला. वेळा अमावस्याच्या निमित्ताने बहुतांश नागरिक शेतात गेल्याने शहरात सर्वत्र शुकशुकाट जाणवत होता. बाजारपेठा बंद होत्या आणि शहरात जणू काही अघोषित कर्फ्यूसारखे वातावरण निर्माण झाले होते.

## दिव्यांग लाभार्थ्यांना ५ टक्के निधीचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१९ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील रायगव्हाण येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने दि.१८ डिसेंबर रोजी दिव्यांग बांधवांना ५ टक्के निधीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत एकूण १६ दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी ७०० रुपये देण्यात आले.

या कार्यक्रमास गावच्या सरपंच माधवी गिराम, उपसरपंच जयश्री एडके, ग्रामविकास अधिकारी अमोल अंधारे यांच्यासह किसन भिसे, रत्नलिंग गिराम, सिद्धेश्वर गिराम, भाऊसाहेब एडके, मधुकर गिराम, बालासाहेब एडके, मुख्याध्यापक मेंढेकर, जगन्नाथ भिसे, रावसाहेब गिराम, रविशंकर गिराम, विश्वंभर गिराम, चंद्रकांत गिराम, विनायक एडके, विकास गिराम, शाहूराज सुरवसे, हनुमंत नरसिंगे, विनायक यशवंत एडके, हनुमंत एडके, विठ्ठल एडके, विजयकुमार गिराम, शीतल भिसे, शिवकन्या सुरवसे, कांचन कडके, सुशालाबाई गिराम, सीताबाई भिसे, कुमारी प्रतिभा एडके, आराध्या गिराम यांच्यासह गावातील सर्व प्रतिष्ठित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नळदुर्ग नगरपालिका निवडणुकीच्या निकालचे काऊंटडाऊन सुरु

**निवडणूक चुरशीची; निकालाकडे सर्वांचे लक्ष...**

**चार वर्षापासुन नगरपालिकेत सुरु असलेले प्रशासकराज संपुष्टात येणार...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेची यावेळची सार्वत्रिक निवडणूक अतिशय चुरशीची व अटीतटीची ठरली असून, या निवडणुकीचा निकाल आता अवघ्या एका दिवसावर येऊन ठेपला आहे. त्यामुळे सर्वच उमेदवारांमध्ये धाकधूक वाढली असून, कार्यकर्ते मात्र विजय आपलाच असे सांगत उमेदवारांना दिलासा देताना दिसत आहेत.

या निवडणुकीत कोण बाजी मारणार आणि पुढील पाच वर्षांसाठी नळदुर्गचा नगराध्यक्ष कोण होणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

गेल्या चार वर्षांपासून नळदुर्ग नगरपालिकेचा कारभार प्रशासकीय नियंत्रणाखाली होता. मात्र दि. २१ डिसेंबर रोजी मतमोजणी झाल्यानंतर प्रशासकराज संपुष्टात येऊन, लोकांनी निवडून दिलेले नगराध्यक्ष व नगरसेवक नगरपालिकेचा कारभार हाती घेणार आहेत.

यावेळेसची नळदुर्ग नगरपालिकेची विशेषतः जनतेतून थेट निवडल्या जाणाऱ्या नगराध्यक्षपदासाठी अत्यंत चुरशीची झाली आहे.



नगराध्यक्षपदासाठी भाजपचे बसवराज धरणे, काँग्रेसचे अशोक जगदाळे, एमआयएमचे शहेबाज काझी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे संजय बताले, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे महेबुब शेख आणि वंचित बहुजन आघाडीचे राठोड यांच्यात लढत झाली आहे.

या लढतीत आजही कोणताही उमेदवार छातीठोकपणे मीच निवडून येणार असे सांगू शकत नाही, इतकी ही निवडणूक अटीतटीची ठरली आहे. दि.२१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीनंतरच नळदुर्गच्या नव्या नगराध्यक्षावर शिक्कामोर्तब होणार आहे.

मतमोजणी अवघ्या एका दिवसावर येऊन ठेपल्याने उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी प्रभागनिहाय आपल्याला किती मते मिळू शकतात, याचे अंदाज बांधण्यास सुरुवात केली आहे. कोणत्या प्रभागातून मताधिक्य मिळेल आणि कुठे पिछाडी राहू शकते, याचा आढावा घेतला जात आहे.

या निवडणुकीत १ नगराध्यक्ष व २० नगरसेवक निवडण्यासाठी मतदान झाले असून, नगराध्यक्षपदासोबतच काही प्रभागांमध्ये नगरसेवक पदासाठीही अत्यंत चुरशीच्या लढती झाल्या आहेत.

त्यामुळे दि.२१ डिसेंबर रोजी मतमोजणी पूर्ण झाल्यानंतरच कोण विजयी होणार आणि कोणाचा पराभव होणार, हे स्पष्ट होणार आहे.

# देवणी तालुक्यात वेळ अमावस्या रानवनात साजरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १९ डिसेंबर :** वेळ अमावास्या साजरी करण्याची शेकडो वर्षापासून परंपरा मराठवाड्यात आजही पाळली जाते. कोणत्याही पुरानात किंवा इतिहासात नसलेला मात्र शेकडो वर्ष जुना सण म्हणजे वेळ अमावास्या. या सणाला हिरवाईचा अपूर्व सोहळा असंही म्हटलं जात.

हा सण लातूर आणि उस्मानाबाद, सोलापूर आणि बीड जिल्ह्याच्या काही भागात साजरा केला जातो. दरवर्षी या सणाची घराघरात जय्यत तयारी सुरु असते. तुरीच्या शेंगा, चवळी, भुईमूग, हरभरा, मेथीची भाजी, कांद्याची पात हा सगळा रानमेवा हरभरे पिठात कालवून चिंच आणि अंबिवलेल्या ताकाच्या पाण्यात शिजवलेली भज्जी, भाकरी, गव्हाची खीर केली जाते. २० ते २५ लोक जेवतील एवढा स्वयंपाक वाजत गाजत घरातून डोक्यावर घेऊन शेतात जातात. तिथे शेताची पूजा केली जाते. त्यानंतर सर्वजण जेवण करतात. विशेष म्हणजे आजच्या दिवशी जिल्हा प्रशासनाकडून सुट्टी दिली जाते. आसराची पुजा वेळा अमावास्येच्या दिवशी प्रत्येक शेतात ज्वारीच्या कडब्याच्या पेंड्याची कोप करुन भक्ती भावाने केली जाते. आणखी एक परंपरा म्हणजे शेतकऱ्याने आलेल्या पिकातील केवळ अडीच मुठी धान्य कापावे. शेताच्या ईशान्य कोपऱ्यात गंध, फुले, धूप,निवद यांनी धान्याची पूजा करून मगच धान्य कापावे. असाही एक रिवाज चालत आलेला आहे.

संध्याकाळी ज्वारीच्या पेंडीचा टेंबा करुन रब्बीचा गहू, हरभऱ्याच्या वावराला ओवाळून काढायची प्रथा आहे. त्यानंतर तो टेंबा मिरवत जावून गावातील मंदिराच्या समोर टाकायचा. मोठी आग करुन ती शमली की तिच्या राखेतून विस्तव असतानाच ती ठोकरुन घरी जायची परंपरा आहे.

पेरणीनंतर येणाऱ्या सातव्या अमावास्येला हा उत्सव होतो. या दिवशी मातीची लक्ष्मीची मूर्ती



तयार केली जाते. गावातील सर्व थोर, लहान शेतात गोळा होत या काळ्या आईची पूजा करतात. तिला गोडाधोडाचा निवद दाखवत आणि वनभोजनाचा आनंद लुटतात. आज शेतातील पांडवांना नवा रंग दिला जातो.

तसेच रब्बी हंगामातील गहू, हरबरा, ज्वारी, करडई, सुर्यफूल आदी पिकात चर शिंपून रब्बीचा हंगाम चांगला होऊ दे, अशी देवाकडे प्रार्थना केली जाते. मूळ कर्नाटकी असणारा हा सण महाराष्ट्रात उस्मानाबाद, लातूर, सोलापूर आणि परळीचा उर्वरित भागात साजरा होतो.

मार्गशीर्ष अमावास्येला हा उत्सव साजरा केला जातो. वेळ अमावस्या साजरी करताना लातूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक सरचिटणीस (एन सी पी) प्रताप कोयले, बोरोळ ग्राम पंचायत सदस्य उषा कोयले, प्रतीक कोयले सह अदिंची उपस्थिती होती.



# कासार सिरसी परिसरात येळवस उत्साहात साजरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**कासार सिरसी, १९ डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी व परिसरात प्रति वर्षाप्रमाणे यंदाही वेळ आमवश्या ( येळवस) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बळीराजा या वर्षी अतिवृष्टीने संकटात आला असतानाही या सणात उत्साह मात्र नेहमी सारखाच होता.

वेळ अमावस्या हा सण मुळात कर्नाटक राज्यात साजरा केला जाणारा सण आहे पण मराठवाड्यातही हा सण उत्साहात साजरा केला जातो. वेळ अमावस्या ही पेरणीनंतर सातव्या अमावस्येला साजरी करण्यात येते. या दिवशी शेतातील पांडवांचे शेतकऱ्याकडून मनोभावे पूजन करण्यात आले. व विविध भाज्या पासून बनविलेले भजी, आंबील, खीर, बाजरीची भाकर (रोडगा) व बाजरीचा उंडा आदींचे नैवेद्य दाखवून संपूर्ण शेताला प्रदक्षिणा घालण्यात आली. पूजेनंतर जेवणाची पंगत बसविण्यात आली.

वेळ अमावस्या निमित्त प्रत्येक शेतकरी कुटुंब हा आप आपल्या शेतात असल्याने शेत शिवार माणसांनी फुलून गेले होते तर शहर व गावा गावात स्वयंघोषित संचार बंदी होती. विविध अन्नपदार्थावर ताव मारल्यानंतर शेतशिवारातील रानमेव्याचा आनंद ही या दिवशी घेण्यात आला.



# शिरूर अनंतपाळ तालुक्यात प्रत्येक गावात येळवस

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १९ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यासह गावोगावी येळवस साजरी करण्यात आली. असाच एक सण म्हणजे वेळ अमावास्या शेतातील काळ्या आईचे ऋण फेडण्यासाठी आज तीची मनोभावे पूजा केली जाते. गावातील लहान थोर या दिवशी वन भोजनाचा आस्वाद घेतात. ग्रामीण भागात 'येळवस अमावस्या' असं म्हटलं जातं.

या दिवशी, शेतात समृद्धी, सुबत्ता लाभावी अशी प्रार्थना घरच्या लक्ष्मीसह शेतकरी मायबाप लक्ष्मीआई पुढे करत असतात. सर्वदात्या धरती माय-माऊलीचे आपण काहीतरी देणं लागतो, या पवित्र भावनेने कर्नाटक आणि लगतच्या भागात म्हणजे आपल्या मराठवाड्यातील लातूर जिल्हासह बीड, धाराशिव आणि इतर काही भागात शेतकरी बांधव येळवस हा सण मोठ्या आनंदाने साजरी करण्याची जुनी प्रथा आहे. वेळ अमावस्येदिवशी शेतामध्ये कडब्याची खोप करून शेतातल्या लक्ष्मीची पूजा केली जाते. ही पुजा करुन खोपी भवताली ओलगे ओलगे सालन पोलगे असं म्हणत खोपीवर आंबिल शिंपडत पाच फेऱ्या मारतात. तसेच पिकांची देखील पूजा केली जाते. 'ओलगे ओलगे सालन पोलगे' म्हणतात कारण हा शेती आणि निसर्गाशी जोडलेला सण आहे, जिथे शेतकरी पेरणीनंतर शेतात पिकं बहरल्यावर काळ्या आईची पूजा करतात, हा दिवस निसर्गाची आणि शेतीची पूजा करण्याचा दिवस आहे. काळ्या मातीतून लक्ष्मी साकारणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा मोठा सण असतो. 'ओलगे' हा शब्द त्यांना शेतात येण्याचे आवाहन करतो, जेणेकरून शेतीची भरभराट होईल.

# माळेगाव नगरीत 'जय मल्हार'चा येळकोट येळकोट

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १९ डिसेंबर :** दक्षिण भारतातील सर्वात मोठी आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली नांदेड जिल्ह्यातील माळेगाव यात्रेला दि१८ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात सुरूवात झाली.

दर्श अमावस्येच्या शुभ मुहूर्तावर नाईक घराण्याची आणि त्यानंतर भगवान खंडोबारायाची पालखी निघून या ३५० वर्षांची परंपरा असलेल्या यात्रेचा श्रीगणेशा झाला.१५ दिवसांच्या सांस्कृतिक आणि पशु बाजाराच्या महोत्सवास प्रारंभ; भाविकांचा 'येळकोट येळकोट जय मल्हार'चा जयघोष भक्ती आणि परंपरेचा संगम: पालखी सोहळा गुरुवारी परंपरेनुसार प्रथम नाईक घराण्याची पालखी निघाली आणि त्यापाठोपाठ खंडोबारायाची पालखी मंदिराबाहेर पडली. पालखी निघण्यापूर्वी ग्रामदैवताची षोडशोपचार पूजा, अभिषेक, महाआरती आणि नैवेद्य अर्पण करण्यात आला. 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या जयघोषात, ढोल-ताशा आणि हलगीच्या



कडकडाटात पालखीने गावफेरी केली. माळेगावला फेरा घालून पालखी पुन्हा मंदिरात विसावली.

यावेळी अनेक भाविकांनी नवस फेडण्यासाठी दंडवत घातले, तर काहींनी श्रद्धेने पालखी खांद्यावर घेतली.

माळेगाव यात्रा ही विशेषतः तिथल्या विशाल पशु बाजारासाठी ओळखली जाते. यंदाही यात्रेत घोडे, उंट, गाढवे आणि शिकारी कुत्र्यांची मोठी आवक झाली आहे. महाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटक या राज्यांतील व्यापारी व शेतकरी येथे मोठ्या प्रमाणावर एकत्र आले असून, ही यात्रा आर्थिक उलाढालीचे प्रमुख केंद्र बनली आहे.

या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे येथे आजही विविध समाजांच्या पारंपरिक 'जाती-पंचायती' असत वर्षभरातील सामाजिक वाद येथे सामोपचाराने मिटवले जातअसत, जे माळेगाव यात्रेच्या सामाजिक महत्त्वाची साक्ष देते होते. यात्रेत शिस्त व बंदोबस्त साठी पोलिस यंत्रणा सज्ज आहे.

यात्रेच्या यशस्वी नियोजनासाठी सरपंच श्रीमती कमलबाई रुस्तुमराव धुळगंडे, ग्रामपंचायत अधिकारी देवकांबळे बी. सी., आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य परिश्रम घेत आहेत.

सुरक्षितता आणि सोयी-सुविधांची पूर्ण काळजी घेण्यात आली असून, जास्तीत जास्त भाविकांनी या सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने केले आहे.

# लीळाचरित्र समग्र मराठी भाषकांच्या मालकीचे : भालेराव

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १९ डिसेंबर :** जुन्या सर्वच वाङ्मयापाठीमागची निर्मितीप्रेरणा धर्म असली तरी




त्यातल्या वाङ्मयीन गुणामुळे आणि ऐतिहासिक व सामाजिक दस्तऐवजामुळे लीळाचरित्र हा ग्रंथ केवळ महानुभाव पंथाचा धर्मग्रंथ नसून त्यावर समग्र मराठी भाषकांची मालकी आहे, असे प्रतिपादन इंद्रजीत भालेराव यांनी केले.

उदगीर येथील चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत चालू असलेल्या ३५१ व्या वाचक संवाद मध्ये सुप्रसिद्ध साहित्यिक, ग्रामीण कवी तथा अभ्यासू वक्ते इंद्रजीत भालेराव यांनी आचार्य पंडित म्हाइंभट्ट लिखित लीळाचरित्र या ग्रंथावर संवाद साधला.

लीळाचरित्रात आठशे वर्षांपूर्वीची मराठी भाषा, समाज, संस्कृती यांचे समग्र दर्शन घडते. तत्कालीन कर्मठ वातावरणात अनेक क्रांतिकारक गोष्टीही चक्रधरांनी केल्या असे त्यांनी सांगितले. स्त्रियांना दिलेली समानतेची वागणूक, अस्पृश्यांना लावलेला लळा, मराठी भाषेचा धरलेला आग्रह या गोष्टींवर चक्रधरांनी भर दिला. त्यातूनच आजच्या महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया घातला गेला, असेही भालेराव यांनी सांगितले. या चर्चेत अनेकांनी सहभाग नोंदवला. शेवटी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांनी संवादकाचे कौतुक केले. सूत्रसंचालन हणमंत म्हेत्रे यांनी केले. प्रास्ताविक प्रा.राजपाल पाटील तर संवादकांचा परिचय प्रा.डॉ. बालाजी सूर्यवंशी यांनी करून दिला. शेवटी आभार मुरलीधर जाधव यांनी मानले.

# माजी गृहमंत्री स्व.चाकूरकरांना कासार सिरसीत आदरांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**कासार सिरसी, १९ डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील कासार



शिरसी येथे लातूर जिल्ह्याचे सुपुत्र भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. कासार सिरसी शहरात गुरुवार दि. १८ रोजी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेत विविध पक्षाचे नेते, कार्यकर्ते, व्यापारी, जेष्ठ नागरिकांच्या वतीने चाकूरकरांना आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी निलंगा बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे, सोसायटीचे चेअरमन गुरुनाथप्पा मेलगिरे, व्हा. चेअरमन ओमप्रकाश चिंचनसुरे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बाळूमामा वेल्हाळ, माजी जि.प. सदस्य डॉ. भीमराव पाटील, डीसीसी बँकेचे व्यवस्थापक महेश कल्याणी, माजी सरपंच बडेसाहेब लकडारे, प्रदीप होळकुंदे, विजयकुमार व्यवहारे, एस.एस. बिराजदार, विठ्ठलराव उजळंबे, प्रकाश कडतने, मधुकर किवडे, गट सचिव राजेंद्र वेल्हाळ, हुसेन सय्यद, युसुफ मुगळे, इलाही बलसुरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# भगतसिंग विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १९ डिसेंबर :** चाकूर तालुक्यातील आष्टा येथे शिक्षण विभाग पंचायत समिती चाकूर आणि भगतसिंग विद्यालय आष्टा यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या प्रदर्शनात तालुक्यातील पूर्व माध्यमिक व माध्यमिक गटातून विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण प्रयोगांनी उपस्थितांची मने जिंकली.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन चाकूरचे नायब तहसीलदार शैलेश निकम यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी चाकूरचे गटविकास अधिकारी संतोष वंगवाड यांनी आवर्जून भेट देऊन विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रतिभेचे कौतुक केले. कार्यक्रमाला शिक्षण विभागाच्या वतीने गटशिक्षणाधिकारी मंदोदरी वाकडे, आष्टा गावचे सरपंच सावता माळी, भगतसिंग विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिक्षण विस्तार अधिकारी संजय अलमले, अशोक पांचाळ, मुख्तार पटेल, आष्टा येथील केंद्रप्रमुख मुजीब शेख तसेच सर्व साधन केद्राचे व्यक्ती व तालुक्यातील केंद्रप्रमुखांच्या सहकार्यामुळे हे प्रदर्शन यशस्वी झाले.

या स्पर्धेमध्ये प्राथमिक गटातून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा झरी बु. येथील जगताप श्रुती व धनश्री घायाळ यांनी प्रथम, अनंत तुळजाराम नाईक विद्यालय नळेगावच्या आनंदी टोम्पे हिने द्वितीय, तर यजमान भगतसिंग विद्यालय आष्टाच्या समर्थ गायकवाड याने तृतीय क्रमांक पटकावला. माध्यमिक गटात कै. नरसिंगराव चव्हाण विद्यालय नळेगावचा दुर्गेश सावंत प्रथम, जगत जागृती विद्यामंदिर चाकूरची अनुष्का मोरगे द्वितीय, तर हाकानिया उर्दू हायस्कूल चाकूरचा रियान शेख तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला. दिव्यांग गटातून श्रद्धा हुंडेकर (जानवळ) व सय्यद फैजान (नळेगाव) यांनी यश मिळवले. शिक्षक गटात प्रमोद हुडगे व मंगल सगर, तर प्रयोगशाळा सहाय्यक गटात समाधान तलवारे यांनी



बाजी मारली.

प्रदर्शनाचे परीक्षण शिवजागृती महाविद्यालय नळेगाव येथील प्रा. अविनाश बोबडे, प्रा. जी. बी. पाटील, संजीवनी महाविद्यालय चापोली येथील प्रा. जी. व्ही. गायकवाड, प्रा. आर. एल. पोतकुले तसेच विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चाकूर येथील प्रा. बी. एन. साळुंखे व प्रा. बी. डी. बुंद्राळे यांनी चोखपणे पार पाडले.

या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका विज्ञान विभाग प्रमुख धनराज सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली जाधव एस. आर., भालके पी. एम., चिमणदरे आर. के., राऊत बी. आर., केंद्रे सोमनाथ, देशमुख आर. बी., थोरात ए. डी. आणि मेहताब शेख यांनी विशेष सहकार्य केले. शाळेच्या वतीने ए. जी. बिडवे, पर्यवेक्षक बी. जी. जाधव, विज्ञान शिक्षक प्रशांत मोरे, विज्ञान परिचर के. बी. बोकडे, एस. बी. बेरकिले, विनोद कांबळे, रवी आघाव, जे. यू. राजरुले यांनी परिश्रम घेतले.

# वृक्षरोपणासह अस्थींचे विसर्जन

**तभा वृत्तसेवा,**

**औसा, दि. १९ डिसेंबर :** औसा तालुक्यातील उजनी येथील शिक्षक शिवराज पाटील यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांनी पारंपरिक परंपरेला फाटा देत त्यांच्या अस्थींचे विसर्जन वृक्षारोपण करुन कायमस्वरुपी आठवण जागृत ठेवून केली आहे. कुटुंबियांनी घेतलेल्या या निर्णयाचे ग्रामिण भागात व विशेष करुन तरुण वर्गातून कौतुक होत आहे.

उजनी येथील श्री गणेश विद्यालयात शिवराज पाटील यांनी २३ वर्षे विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन दिले. अशा या शिक्षकाच्या अस्थींचे विसर्जन नदी न करता कायमस्वरुपी आठवण कुटूंबियांना व विद्यार्थ्यांना राहवी. यासाठी नदीत विसर्जन केले नाही.आंबा, चिंच अशा फळझाडांचे वृक्षारोपण करुन पिढ्यानपिढ्या सावली व फळ देर्णाय़ा फळझाडांना अस्थिंचे विसर्जन करुन एक नव्या हरित परंपरेची सुरुवात केली.

आयुष्यभर ज्ञानाची बीजे पेरणाऱ्या शिवराज पाटील यांनी असंख्य विद्यार्थ्यांची आयुष्ये घडवली, त्याचप्रमाणे वृक्षांच्या रूपाने गावकऱ्यांना श्र्वास, सावली आणि फळ पिढ्यानपिढ्या देणार आहेत. अशी भावना त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली. पाटील कुटुंबीयांनी घेतलेला निर्णय केवळ श्रद्धांजली नसून समाजाला दिलेला मौल्यवान संदेश ठरत आहे.

# कै. चाकूरकरांमुळे देशात चाकूरची ओळख : पाटील

**तभा वृत्तसेवा,**

**औसा, दि. १९ डिसेंबर :** चाकूरचे भूमीपुत्र तथा राजकारणातील ऋषीतुल्य व्यक्तीमत्व म्हणून कै. शिवराज पाटील चाकुरकरांना ओळखले जाते.चाकूरची ओळख शिवराज पाटील यांच्यामुळे संपुर्ण देशभरात झाली.राजकीय जीवन जगत असताना नविन पिढीने संयम आणि सहनशिलतेची शिकवण चाकूरकरांनी शिकविली आहे.कै.शिवराज पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वामुळे चाकूर तालुक्याचे नाव जागतिक पातळीवर पोहचले आहे.

तालुक्यातील सोसायटीचे चेअरमन, गटसचिव, शेतकरी व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी पुष्पहार अर्पण करत कै.शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चाकूरच्या वतीने कै.शिवराज पाटील



चाकूरकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन झाल्यामुळे चाकूरसह संपूर्ण देशाची मोठी हानी झाली असल्याचे प्रतिपादन एन.आर. पाटील यांनी केले .

कै.शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत महत्वाची पदे भूषविले आहेत त्यामध्ये लोकसभेचे अध्यक्ष, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल अशा अनेक महत्त्वांच्या पदावर त्यांनी काम केलेले आहे. अतिशय शांत, संयमी, अभ्यासू, तत्वनिष्ठ आणि नैतिक नेतृत्व म्हणून त्यांना संपूर्ण देशात ओळखले जाते. कै.शिवराज पाटील चाकूरकर यांनी जात-धर्म-भाषा-पक्ष या भिंतींच्या पलीकडे जावून सर्वपक्षीय नेत्यांशी आपले जिव्हाळ्याचे, आपुलकीचे असे संबंध निर्माण केले होते. देशाच्या वैज्ञानिक, इलेक्ट्रॉनिक, शेती विषयक अनेक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासात शिवराज पाटील चाकूरकर यांचे मोठे योगदान राहिले आहे.

यावेळी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस एन.आर.पाटील, अनिल चव्हाण, ॲड. धनंजय कोरे, पप्पु शेख, निलेश देशमुख, सलीम तांबोळी, अमजद घोरवाडे, ॲड. रणजीत पाटील शेळगांवकर, खदीर शेख, शिवाजी पाटील, किशन गव्हाणे, अशोक नागीमे, शिवाजी सोळंके, आबासाहेब शिंदेसह जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

तहसिल कार्यालय शिरुर अंनतपाळ (दंडणिय-विभाग) जा.क्र. २०२५/जन्म/प्रगटन/कावी-०१ जाहीर प्रगटन देण्यात येते की अर्जदार मंदोदरी चंद्रराव झांबरे रा.येरोळ ता.शिरूर अनंतपाळ जि.लातूर यांनी तहसील कार्यालय शिरूर अनंतपाळ या कार्यालयात सुवर्णा चंद्रराव झांबरे रा.येरोळ ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर यांनी जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणे करीता मागणी केली आहे. जन्म झालेल्यांचे नाव सुवर्णा चंद्रराव झांबरे सदर व्यक्तीचा येरोळ या ठिकाणी दिनांक ०९ /११/१९९३ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणे करीता तहसिल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे अर्ज सादर केला आहे. वरील जन्म दिनांका बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही,याची नोंद घेण्यात यावी.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आपसिंगा येथील शिक्षकाच्या आर्थिक छळाचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयातील शिक्षक बी.टी. गोरे यांच्यावर मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीच्या गैरकारभाराद्वारे आर्थिक छळ होत असल्याचा निषेध शिक्षक संघाने व्यक्त केला आहे.

शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्र्यांकडे निवेदन पाठवले आहे. निवेदनात म्हटले आहे की, बी.टी. गोरे यांना जुलै २०२४ आणि जुलै २०२५ या दोन वेतनवाढी तसेच वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ अयोग्यरित्या रोखले गेले आहेत. तसेच शिक्षणाधिकारी कार्यालयाला पत्र पाठवून दिशाभूल व फसवणूक करण्यात आली आहे. यात शिक्षकांना प्रलंबित वेतनवाढी व वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ त्वरित द्यावेत, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीच्या गैरकारभाराची एसआयटी चौकशी करून शाळेवर प्रशासक नियुक्त करावा, अन्यथा आंदोलनासारख्या अप्रिय घटना उद्भवू शकतात.

निवेदनावर जे.एस. शेरखाने आणि रमण जाधव यांची स्वाक्षरी आहे.



# भोंजा हवेली येथे भव्य केळी उत्पादक शेतकरी परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ डिसेंबर -**



परंडा तालुक्यातील भोंजा हवेली हे छोटेसे खेडेगाव आज प्रगत शेती व शेतकरी आत्मनिर्भरतेचे प्रेरणास्थान ठरत आहे. दि.१७ डिसेंबर रोजी येथे हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत भव्य केळी उत्पादक शेतकरी परिसंवाद उत्साहात पार पडला. या परिसंवादामुळे कोरडवाहू शेतीतून बागायतीकडे वाटचाल करणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशकथांना नवी दिशा मिळाली.

भोंजा हवेली गावातील सुमारे ९० टक्के शेतकरी पारंपरिक कोरडवाहू शेतीतून बाहेर पडत ऊस शेतीला बगल देऊन केळी व तुती लागवडीकडे वळले आहेत. मनरेगा अंतर्गत फळबागा, सिंचन सुविधा व तुती लागवड यामुळे अनेक शेतकरी आज लखोपती बनत असून, या यशस्वी परिवर्तनाची दखल घेत जिल्हा प्रशासन थेट शेतकऱ्यांच्या दारी पोहोचले.

या परिसंवादास जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे, आत्माचे प्रकल्प संचालक मिसाळ, उपविभागीय कृषी अधिकारी भागवत सरडे, रेशीम विकास अधिकारी वाकुरे, तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे व सुमित सोनटक्के यांच्यासह संपूर्ण तांत्रिक पथक उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

परिसंवादात केळी लागवड व्यवस्थापन तज्ज्ञ सोमनाथ हुलगे यांनी शेतकऱ्यांनी न खचता केळी लागवडीकडे वळावे, असे आवाहन केले. डबल ओळीतील केळी लागवड, ठिंबक सिंचनाचा वापर व आलटापालट पिकांवर भर दिल्यास उत्पादन वाढते, असे त्यांनी सांगितले. केडी एक्सपर्टचे सर्वेसर्वा किरण डोके यांनी केळी ही कमी पाण्यात परवडणारी फळबाग असून रोगराईला कमी बळी पडणारी टिश्यू कल्चर रोपे निवडण्याचा सल्ला दिला. तसेच केळी उत्पादनाच्या निर्यात व साठवणुकीची हमी देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

किरण चव्हाण यांनी केळी लागवडीचा हंगाम व बाजारभाव याविषयी मार्गदर्शन केले, तर कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. अरुण गुट्टे यांनी ऊस पिकाबाबत सखोल माहिती दिली. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी शेतकऱ्यांनी एआय (ख) तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत क्रांती घडवावी, असे आवाहन केले. मनरेगाअंतर्गत फळबाग, तुती लागवड, सिंचन विहीर, भाऊसाहेब फुंडकर योजना तसेच महाडीबीटी अंतर्गत शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यावर शासकीय अनुदानाचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. यानंतर मान्यवरांनी थेट शेतात भेट देत रणनवरे यांच्या तुती लागवडीची व मोरे यांच्या केळी लागवडीची पाहणी करून शेतकऱ्यांचे कौतुक केले. या गावातून उभारण्यात आलेली श्री पाटील बुवा जिल्हा परिषद प्रोड्युसर कंपनी ही अभिमानास्पद बाब असून, या कंपनीअंतर्गत गावातच माती परीक्षण केंद्र सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी डायरेक्टर गणेशदादा नेटके यांच्या श्री गणेश बँक सेवा केंद्रालाही भेट देण्यात आली. मान्यवरांनी प्रायोगिक तत्त्वावर केळी व तुतीची लागवडही केली.

कार्यक्रमास सरपंच राणी कोळी, उपसरपंच आकुबाई घाडगे, तहसीलदार निलेश काकडे, गटविकास अधिकारी मोहन राऊत, भूम, लोहारा, उमरगा, तुळजापूर व वाशी तालुक्यांतील तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, आजी-माजी सरपंच व उपसरपंच, प्रतिष्ठित नागरिक तसेच बचत गटांच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहीर शरद नवले यांनी केले, तर आभार सहाय्यक कृषी अधिकारी रेशमा कामटे यांनी मानले. हा परिसंवाद केवळ मार्गदर्शनापुरता मर्यादित न राहता शेतकरी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणारा नवा विश्वास देणारा ठरल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## येरमाळा येथे गोपीनाथ मुंडे जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१९ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील येरमाळा येथील कै. आबाजी पाटील सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त दुधाळवाडी व बांगरवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस कळंब पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सोपान अकेले व प्रतिष्ठानचे राहुल पाटील यांच्या हस्ते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीमती सुकाळे, अमोल पाटील, गोविंद मुंडे, बालाजी मुंडे व नाना बांगर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या सामाजिक हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे प्रतिष्ठानचे राहुल पाटील यांनी सांगितले.

यावेळी बापुराव बांगर, नितीन लाटे, प्रितेश बारकुल, तात्या बांगर, नदीम मुलानी, अशोक साळुंके, बापु जमदाडे, ओंकार बांगर, ओम बारकुल यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१९ डिसेंबर -**

जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, धाराशिव यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि ग्रामीण रुग्णालय लोहारा येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. रविंद्र पापडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती, लिंग गुणोत्तर, बेटी बचाव-बेटी पढाव या विषयांवर तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन तहसील कार्यालय लोहारा येथील पंचायत समिती सभागृहात करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटन गट विकास अधिकारी जगदेव वगे, नायब तहसीलदार रतन काजळे, पोलीस निरीक्षक विजय पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगदीश बनसोडे, कायदेविषयक सल्लागार डॉ. रेणुका शेटे, डॉ. अदिती खमितकर तसेच डॉ. सुनील मंडले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर यांनी समान लिंग गुणोत्तरासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे असे सांगत, स्त्री भ्रूणहत्येच्या घटना निदर्शनास आल्यास निर्भीडपणे प्रशासनाला कळवण्याचे आवाहन केले. डॉ. रविंद्र पापडे यांनी प्रास्ताविक करत, सोनोग्राफी केंद्रांवर तसेच अवैध गर्भलिंग निदान व गर्भपात करणाऱ्यांवर प्रशासनाची करडी नजर असल्याचे स्पष्ट केले.

## उमरगा जि.प. हायस्कूलला आयबीएल सीएसआर मूल्यांकन पथकाची विशेष भेट

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१९ डिसेंबर -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलला इंडसन बँकेच्या आकांक्षित जिल्हा सीएसआर फ्लॅगशीप कार्यक्रम आयबीएल (IBL) अंतर्गत केरळ राज्यातील तृतीय पक्ष मॉनिटरिंग व मूल्यांकन पथकाने विशेष भेट दिली. या पथकात कार्तिक आर. व डीडीन मॅथ्यू यांचा समावेश होता. धाराशिव जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे थीमॅटिक मूल्यांकन करण्यासाठी ही टीम जिल्ह्यात दाखल झाली होती.

या भेटीदरम्यान पथकाने उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलमधील अटल टिंकरिंग लॅबची सविस्तर पाहणी केली. अटल लॅबच्या माध्यमातून यावर्षी शाळेतील तीन प्रकल्पांची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड झाल्याची माहिती देण्यात आली.



यामध्ये इयत्ता नववीतील आदित्य सगर, इयत्ता आठवीतील वैष्णवी केदारे तसेच कुलसुम उस्ताद या विद्यार्थिनींचा समावेश आहे.

कुलसुम उस्ताद हिने भंडारा येथे झालेल्या राज्यस्तरीय इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शनात सादर केलेल्या बायोपेस्टीसाईड (सेंद्रिय कीटकनाशक) प्रकल्पाची पथकाने प्रत्यक्ष पाहणी केली. प्रकल्पाची अंमलबजावणी, दस्तऐवजीकरण तसेच सुधारणा याबाबत पथकाने उपयुक्त सूचना दिल्या.

याशिवाय विद्यार्थिनीच्या बायोपेस्टीसाईड व बाजारातील इतर कंपनीच्या बायोपेस्टीसाईडमधील घटक, गुणवत्ता व किंमत यांची तुलना करून प्रत्यक्ष उत्पादन व वापरकर्त्यांशी संवाद साधत अभिप्राय जाणून घेण्यात आला.

या विशेष भेटीवेळी वॉटर उपव्यवस्थापक अधिकारी अंकित देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे, एन-पॉवर कार्यक्रम व्यवस्थापक ज्ञानेश्वर मस्के, अटल टिंकरिंग लॅब प्रभारी विद्यानंद सुत्रावे, एन-पॉवर उमरगा तालुका समन्वयक ताजोद्दीन सरवडे तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

# भटक्या व विमुक्त जमातीतील २२ विद्यार्थी रोपट्याचा ४२६ पर्यंतचा शैक्षणिक वटवृक्ष प्रवास





## कराडच्या टिळक हायस्कूल वृंदांची यमगरवाडी संकुल अभ्यास सहल

व्यवस्थेने गुन्हेगारीचा शिक्का माथ्यावर मारून ज्यांना पिढ्या न् पिढ्या भटकंती करायला लावून समाज प्रवाहातून बाजूला केलेले होते अशा व भारतीय राज्यघटनेने हक्क अधिकार बहाल केलेल्या भटक्या व विमुक्त जमातीतील विद्यार्थ्यांच्या साठी प्रयत्न करणारी माणुसकीने ओथंबलेली शाळा भटक्या व विमुक्त जाती-जमातीतील मुला- मुलींची भटक्या व विमुक्त विकास प्रतिष्ठान संचलित एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यमगरवाडीची शाळा हा आगळा वेगळा उपक्रम १७ एकर जमिनीमध्ये या शाळेचे बीजारोपण झाले.

सुरुवातीला दोन झोपड्यांमध्ये २२ विद्यार्थी झोपडपट्टीतले भटक्या व विमुक्त जमातीतील मुलांची सुरुवात झाली. याचा वटवृक्ष आज आश्रम शाळेत १३६ मुली व २९० मुले असे ४२६ विद्यार्थ्यां पर्यंत पोहोचला. तिथे घेतलेले अहोरात्र कष्ट आणि मेहनत शिक्षक,संस्थाचालक आणि समाजातील सामाजिक बांधिलकी असलेले लोक या शाळेची इमारत उभी होण्यासाठी अनेक दानशूर व्यक्तींनी केलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. गोरगरिबांच्या मुलांसाठी ही शाळा अगदी प्रेरणादायी आहे. यांच्या राहण्याचा, खाण्याचा इत्यादी सर्वच खर्च ही शाळा करते. शाळेतले शिक्षक सुद्धा तत्पर आणि अभ्यासू आहेत. विद्यार्थ्यांना शाळेतील अभ्यासक्रमापेक्षा शाळाबाह्य उपक्रमाबद्दल आणि प्रयोगशील तेथून आणि स्वानुभव, प्रसंग घटना, यांच्यातून हे विद्यार्थी घडत आहेत. आई-वडिलांचे मातृत्व हरवलेली मुले मुली ही या शाळेमध्ये आहेत.इथले शिक्षक दादा,मामा,काका, नाना,आप्पा अशाच नातेवाईक संबंधातले शब्द हेच विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आहेत. हेच जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणारे आणि जीवाला जीव देणारे शिक्षक वर्ग संस्थाचालक आणि इतर येणारे घटकही त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहून त्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन देण्याचे काम या संस्थेने केले आहे. जिकडे पहावे तिकडे शैक्षणिक वातावरण आणि या शैक्षणिक वातावरणात ही मुलं आपोआप घडत आहेत. त्यांच्याकडे वक्तृत्वाची देणगी या शाळेने उपलब्ध करून दिलेली आहे. विद्यार्थी ग्रंथालय याचे कामही विद्यार्थीच करतात. विद्यार्थ्यांच्या स्वयंप्रेरणेला चालना मिळणारे आणि विचार करायला लावणारी ही शाळा आहे.सकाळ उठल्यापासून संध्याकाळपर्यंत आश्रम शाळा असल्यामुळे सगळ्याच गोष्टी शक्य होत आहेतअसे लक्षात आले.

विद्यार्थी केंद्रीत शाळा असून सर्वच विद्यार्थी जबाबदारीने काम पार पडतात हे शिक्षकाचे कौशल्य आहे. शिक्षकांनी तसे त्यांना घडवले ही आहे. महापुरुषांची चरित्रे चित्रे त्यांचे वर्णन हे त्यांच्या नसानसात भिनले आहे.विज्ञान वार्ता वर्तमानपत्रातून येणारे लेख त्यातून कात्रने गोळा करणे.छोट्या छोट्या वैज्ञानिक गोष्टीचा संग्रह करून त्याविषयी शोधक वृत्तीचा विकास करणे ही संशोधनाची गोष्ट या शाळेमध्ये आहे. आणि विशेष म्हणजे सर्व शाळाचे डिजिटल वर्ग आहेत.

या शाळेमध्ये ए आय या संकल्पनेचा ही विद्यार्थी वापर करतात. लेखन अचूक करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या चुका शोधण्यासाठी सुद्धा अशा प्रकारचे वापर इथे केला जातो. शुद्धलेखन तपासण्यासाठी इथे ए आय चा वापर करून विद्यार्थ्यांच्यातील लेखन दोष सुधारले जातात तेही काम विद्यार्थी करतात .सकाळची प्रार्थना भोजन तिथली व्यवस्था स्वच्छता स्वच्छतागृहे आणि वसतिगृहे अगदी स्वच्छ असलेले जाणून आले. हेही काम विद्यार्थी मित्र करतात यांना कोणत्याही प्रकारची प्रलोभने नाहीत.

सतत अभ्यास, व्यायाम ,संस्कार वर्ग आणि सर्व काही शिस्तप्रिय अशा गोष्टींचा हा यमगरवाडीचा प्रकल्प आहे येथे भटक्या व विमुक्त जमातीतीलच विद्यार्थी आहेत आणि काही अनाथही मुलेही आहेत. येथे कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाही. सर्व सम समान संधी सर्वांना दिली जाते .अनेक विद्यार्थी चांगले घडून गेलेले आहेत व घडतही आहेत. याचे सर्व श्रेय शिक्षक बंधू भगिनींनाच जाते आहे.

मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, देवकर, भडंगे तसेच त्यांचे सहकारी शिक्षक यांचे अतिशय श्रमपूर्वक प्रयत्न मानवतेला धरून आहेत. आदर्शवत शिक्षण प्रणाली येथे आहे. काम कोणीही करतं परंतु आई वडिलांची माया आणि आपुलकी जिव्हाळा स्नेह या प्रकारचे स्नेहबंध विद्यार्थी आणि शिक्षकांच्यात निर्माण झालेले आहेत. या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे आजूबाजूचा परिसर येथील वातावरण या सर्व गोष्टीतून विद्यार्थ्याला स्वतःतील क्षमता विकसित करण्यासाठी संधी दिली जाते आणि विद्यार्थी तसे घडत आहेत.

या शाळेमध्ये संगणक वर्ग तोही विद्यार्थी चालवतात, तेही डिजिटल वरून शिकतात हे कौतुकास्पद आहे. तसेच बचत व वस्तू भांडार हेही विद्यार्थी चालवतात. या विद्यार्थ्यांना आई-वडील भेटीच्या वेळी दहा-पाच रुपये पासून दिलेले पैसे त्याची नोंदणी आवक जावक आणि त्यांना लागणारा खाऊन त्याच पैशातून तिथे घेता येतो. व्यवहारिक कौशल्य जीवनावश्यक कौशल्य ही या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना दिली जात आहेत.

भविष्यकाळात स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी त्यांचा पाया मजबूत या शाळेमध्ये होत आहे तसेच या विद्यार्थ्यांच्या मध्ये शाळेप्रती अतिशय प्रेम भावना होत्या. त्यांना असेल तर घरापेक्षा या शाळेत रहायला आवडते याचे कारण आमचे मित्र मैत्रिणी आणि शिक्षक आम्हांला खूप जीव लावतात. त्यामुळे आम्हांला येथे रहायला आवडते अशा शब्दात विद्यार्थ्यांकडून आम्हांला ऐकला मिळाले. ही एक कसोटीच आहे ही शिक्षकांनी अवलंबवली आणि विद्यार्थ्यांना दिलेली प्रेरणा ही आजच्या शिक्षणाची खरी गरज आहे.

भोजन व्यवस्था अतिशय योग्य, पूरक आहार, स्वच्छता व भोजन ही सकस चांगले होते. आणि तेही विद्यार्थी वाढत होते . ते काम ही विद्यार्थीच करत होते.किती आपलेपणा असावा आणि आपल्या शाळा माऊलीच्या ऋणात राहावे याचे धडे या शाळेमध्ये दिले जातात. तिथेही बासरी वादन शिक्षकांचे स्वागत इथे फक्त अभ्यास शिकवला जात नाही तर विविध क्षमता ,कला आणि आत्मविश्वास च्या जोरावर जीवन कसे जगावे याचेही धडे या शाळेमध्ये दिले जातात. निवासी शाळा असल्यामुळे शिक्षक ही तिथेच निवास करतात.

येथे वाचन संस्कृतीचा विकास झपाट्याने होत आहे विद्यार्थ्यांनी ती पुस्तके घ्यायची ती वाचायची आणि वेळेत जमाही करायची याची पाहणी करणारे विद्यार्थीच आहेत. अशा या वातावरणात विद्यार्थ्यांना मोठे खेळाचे मैदान आहे खेळामध्ये विविध खेळ खेळले जातात राज्य पातळीपर्यंत विविध खेळांमध्ये विद्यार्थी पोहोचले आहेत. नव्हे तर त्यांनी आपल्या शाळेचा धबधबाच निर्माण केला आहे. इतर शाळेतील विद्यार्थी शिक्षक असा विचार करतात की यमगरवाडी शाळेचे विद्यार्थी पहिल्या क्रमांकातच असणार आपला दुसरा किंवा तिसरा नंबर येणार का? व त्यासाठीच प्रयत्न ते करतात. तालुका, जिल्हास्तरावर विज्ञान उपकरणे गेलेली आहेत. राज्यातही त्यांचा नंबर आलेला आहे. येथील शिक्षक प्रयोगशील आणि उपक्रमशील आहेत. त्यांच्या या प्रयत्नात अशा १८ विश्वे दारिद्र्यातील विद्यार्थ्यांसाठी म्हणजे भटक्या व विमुक्त जमातीतील लोकांसाठी या शाळेने जे राबवले आहे. त्या भटक्या व विमुक्त जमातीचा विकास हाच या संस्थेचा विकास आहे. असे लक्षात येते की खडतर स्तरावर विद्यार्थी गोळा करणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे त्यांच्या स्वच्छतेकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते आणि हे विद्यार्थी त्यांचा भविष्यकाळ त्यांचे आदर्श घडवताना दिसत आहेत. ज्याप्रमाणे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचा पाया रोवला.

खेड्यापाड्यातून मुले गोळा करणे आणि शिक्षणाची गंगा घरोघरी आणणे या उद्देशानेच या यमगरवाडी ची शाळा पारधी वस्तीतील मुले आणि त्यांना मार्गदर्शक अशा विविध जमातीतील विद्यार्थी गोळा करणे व त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि या सर्वांचा विकास करणे हा उपक्रम अतिशय स्तुत्य आणि प्रेरणादायी आहे .शाळेचा परिसर हा शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत भावपूर्ण आणि प्रेरणादायी आहे. शिकण्यासाठी सर्वच गोष्टी आहेत .व्हरांडा हीच त्यांची शाळा शिक्षक नसतानाही विद्यार्थी अभ्यास करतील असेच वातावरण पूरक आहे. त्यांना स्वतःहून त्या शिक्षणाची गोडी लागेल असे शैक्षणिक फलक आणि तक्ते स्वच्छ शाळा अद्ययावत यंत्रणा आसल्याने योग्य व्यवस्थापन हे विद्यार्थी शिक्षक आणि संस्थाचालक देणगीदार यांच्या सुनियोजित नियोजनाप्रमाणे. याचे मूल्यमापन ही त्याच पद्धतीने होत आहे.

शिक्षण मुले कधी घेतील तर यमगरवाडीच्या शाळेतील वातावरणाप्रमाणे वातावरण असेल तेव्हा परंतु समाजातील वातावरणामध्ये गरजांची जाणीव होईल आणि परिस्थितीवर मात करून शिक्षण कसे घ्यावे हे जेव्हा पालक वर्गामध्ये समाजामध्ये जागृती होईल तेव्हाच. शिक्षकाचे महत्त्व अधिक वाढेल. आज आपण गरजेपेक्षा जास्त वस्तू विद्यार्थ्यांना देत आहोत. त्याचे मूल्य कमी होत चाललेले आहे.

यमगरवाडीच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना गरजेनुसारच शिक्षण दिले जाते त्यांना परिस्थिती जाणीव निर्माण करून दिली जाते आणि सगळ्याच गोष्टी स्वयंशिस्तीने त्यांना कराव्या लागतात हे जेव्हा शारीरिक बौद्धिक आणि मानसिक कष्ट विद्यार्थी करतात तेव्हा त्यांचा बौद्धिक विकास चांगल्या प्रकारे होत आहे असे लक्षात आले. परंतु शहरीकरणांमध्ये या गोष्टी रुजवणे फार अवघड आहे. त्यासाठी पालकांचे प्रबोधन करणे ,समाज प्रबोधन करणे आणि विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी जाणीव करून देणे गरजेचे आहे. तर यमगरवाडीच्या शाळेसाठी ज्या गोष्टी विद्यार्थी शिक्षक म्हणून करतात शिक्षकांच्या बद्दलचा आदर आणि स्वतः बद्दलचा आत्मविश्वास हा विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण करता येईल.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते मिळवण्यासाठी स्वतःही कष्ट केलेच पाहिजेत .शोधकवृत्ती वाढवली पाहिजेत. वाचन प्रकल्प वाढवला पाहिजे आणि स्वनिर्मित काही वस्तू स्वतःच करता आल्या पाहिजेत याचे धडे मुलांना या शाळेमध्ये दिले जातात. तसेही शहरांमध्ये असेच व्हायला हवे परंतु विद्यार्थ्यांना हे प्रात्यक्षिक दाखवून करण्यापेक्षा स्वतः मुलांनी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे .प्रत्येक मुलांनी स्वतः त्याच्या पालकांनी त्यांना त्याची जाणीव करून घेऊन या शिक्षणाच्या प्रवाहात आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व सामान्य मुलांची आणि गोरगरिबीत असली तरी तिथं प्रेम स्नेह आणि आपुलकी आहे. या विद्यार्थ्यांना भविष्यकाळात मानाचे स्थान नक्कीच मिळेल अशा प्रकारचे शिक्षण या शाळेमध्ये दिले जात आहे.

या शाळेतील सर्व शिक्षकांना मानाचा मुजरा. अनेक दानशूर व्यक्तींनी जमिनी दिल्या आणि झोपडीचे रूपांतर मजल्यात झाले.आणि आज ही शाळा महाराष्ट्रात नावाजली जात आहे. आणि यापुढेही तिचा विकास होईल अनेक भटक्या व विमुक्त जमातीतील विद्यार्थी भविष्यकाळामध्ये उच्च पदावर काम करताना आपल्याला जाणवतील.

या शाळेला पुन्हा एकदा सलाम! सलाम! सलाम!

(राजेंद्र लाटकर सहसचिव शिक्षण मंडळ, कराड व चंद्रशेखर देशपांडे सचिव, शिक्षण मंडळ कराड यांचे प्रेरणेतून शैक्षणिक अभ्यास सहल)

**- शब्दांकन**
**संध्या महादेव ठाकर व टिळक हायस्कूल, कराड वृंद**

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पोलिसांच्या कारवाईनंतरही ऑटोचालकांत सुधारणा नाही!

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** लातूर शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्याच्याउद्देशाने शहर वाहतूक पोलीस शाखेच्यावतीने ऑटोचालकांवर कडक कारवाई मोहिम राबविण्यात येत आहे. मात्र, पोलिसांच्या या मोहिमेनंतरही ऑटोचालकांच्या वागण्या - बोलण्यात आणि कामात सुधारणा झालेली नसल्याचे पाहावयास मिळत आहे. त्यामुळे सुजाण नागरिक त्रस्त झाले आहेत.

लातूर शहरातील वाहतूक समस्या हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. शहरातील वाहनांची वाढती संख्या आणि वाहनधारकांसह ऑटो चालकांच्याही बेशिस्त वाहन चालवण्यामुळे ही समस्या अधिकच वाढली आहे. यामध्ये सुधारणा व्हावी याकरिता पोलीस यंत्रणेने ऑटोचालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यासाठी विशेष मोहीम राबविली. अजूनही ती मोहीम चालूचआहे. मात्र, ऑटोचालकांमध्ये किमान या घडीपर्यंत तरी कोणतीही सुधारणा झाल्याचे पाहायला मिळत नाही. त्यामुळे काही उद्दाम, मस्तवाल ऑटोचालक आता पोलीस प्रशासनालाही भीत नसल्याचे दिसून येत आहे. अनेक ऑटोचालक शिस्त तोडून अगदी पोलिसांच्या समोरूनही सिग्नल तोंडणे, पुढच्या सीटवर प्रवाशी बसवून ऑटो चालविण्याचे काम करताना दिसत आहेत. ऑटोचालकांमध्ये सुधारणा करण्यासाठी आता ऑनलाईन पद्धतीने दंड वसुलीची मोहीम कार्यान्वित करण्याची मागणी होत आहे.



# लातूर जिल्ह्यात दर्श वेळा अमावस्या उत्साहात साजरी

## लातूरकरांनी घेतला अघोषित 'संचारबंदीचा' अनुभव

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** संपूर्ण लातूर जिल्ह्यात शुक्रवारी दर्श वेळा अमावस्या तथा ग्रामीण बोलीभाषेतील 'येळवस' पारंपारिक पद्धतीने अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जिल्हावासियांनी या सणाच्या निमित्ताने सहकुटुंब सामूहिक वनभोजनाचा आनंद लुटला. या सणाच्या निमित्ताने जवळपास नव्वद-पंच्याण्णव टक्के शहरवासीय शेतात गेल्याने लातूरकरांनी शहरात प्रदीर्घ कालावधीनंतर अघोषित 'संचारबंदीचा' अनुभव घेतला.

दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यात येणारी दर्श अमावस्या लातूर जिल्ह्यात वेळा अमावस्या म्हणून उत्साहात साजरी केली जाते. या निमित्त विविध भाज्यांच्या समूह असणारी भज्जी, ताकापासून तयार केलेली अतिशय पाचक पेय असणारी आंबील, शेंगदाणे - तीळ घालून केलेल्या स्वादिष्ट गोड पोळ्या. धपाटे, ज्वारी-बाजरीच्या भाकरी, चपाती, कडक भाकरी, गव्हाची खीर, विविध चटण्या-लोणची, साधे वरण, तिखट वरण असा पंचपक्वानांनाहीशंभरदा मागे टाकेलअसा स्वादिष्ट भोजनाचा बेत असतो. या सणाचे वैशिष्ट्य असे की, या दिवशी आपल्या शेताच्या जवळून जाणाऱ्या प्रत्येक वाटसरूला शेतकरी बांधव अत्यंत आग्रहाने जेवू घातल्याशिवाय पुढे जाऊ देत नाही. या दिवशी शहरात राहणाऱ्या बहुसंख्य नागरिकांना आपल्या इष्टमित्र-आप्तेष्ठांकडे वनभोजनाचे निमंत्रण असते. या आग्रहामुळे शेती असलेले आणि शेती नसलेले सगळेचजण सामूहिक वनभोजनाचा आस्वाद घेतात.

लातूर शहरात वेळ अमावास्येमुळे शुक्रवारी अघोषित संचारबंदीसारख्या वातावरणाची अनुभूती आली. नेहमी वाहतुकीने गजबजलेले रस्ते अगदी सुनसान झाल्याचे पाहावयास मिळाले. सकाळी अकरा वाजेपर्यंत पन्नास टक्क्यांहून अधिक लातूर जवळपास रिकामे झाले होते. दुपारपासून ते सायंकाळी सात वाजेपर्यंत ९० टक्क्यांहून जास्त शहरवासीय शेतात डेरेदाखल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. नेहमी कामाच्या धबडग्यातूनहा एक दिवस तमाम लातूरकर सुटीसारखा एन्जॉय करताना दिसतात.

शेतात पोहोचल्यानंतर बच्चे कंपनी चिंचा, बोरे, आवळे, डहाळे, तुरीच्या शेंगा, पेरू या रानमेव्याचा आस्वाद घेण्यात गुंततात तर महिला वर्ग निवांतपणे रानमेव्याचा आनंद घेत घेत झोक्याचा मनमुराद आनंद लुटतात. पुरुष मंडळीहीनिवांतपणे पत्त्यांचा डाव खेळताना आढळून येतात.

एकंदरच हा पारंपरिक सण अतिशय आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. दिवसभराचा एक दिवसाचा हा वनभोजनाचा सोहळा आटोपून सायंकाळी घरी परतले. शेतातून शहरवासीय शहरात परतताना पुन्हा एकदा वाहतुकीच्या कोंडीचा आनंद शहरात प्रवेश करणाऱ्या सर्वच चौकात आला.



# अल्पवयीन विद्यार्थिनीवर शिक्षकाचे दुष्कर्म

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** मी तुला नववी, दहावीला शिकविले आहे. तू मला खूप आवडतेस, तू मोठी झाल्यावर तुझ्यासोबत लग्न करतो, अशी फूस लावत सॅमसंग कंपनीचा मोबाईल घेऊन देणे, गरजेवेळी पैसे देणे, हॉटेलमध्ये नेऊन खाऊ-पिऊ घालून एका अल्पवयीन विद्यार्थिनीला लॉजवर नेऊन तिच्यासोबत बलात्कार करणाऱ्या शिक्षकावर बलात्कारासह पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अपहरणासह पोक्सोचा गुन्हा दाखल, नराधम शिक्षक अटकेत**

आरोपी राजकुमार बळीराम गवरे (व्य ४६, रा. खलंग्री, ता. रेणापूर, हा. मु. केशव नगर, लातूर, ता. जि. लातूर) हा परभणी जिल्ह्याच्या सोनपेठ तालुक्यातील नईकोटा येथील एका शाळेवर सहशिक्षक आहे. त्या शाळेत नववी-दहावीचे शिक्षण घेऊन लातूरमध्ये अकरावीला आलेल्या अल्पवयीन विद्यार्थिनीची जुनी ओळख काढली. जुने शिक्षक असल्यामुळे त्या अल्पवयीन भावनेतून त्याची जवळीक साधली. पीडितेनेही शिक्षक या आदरार्थी सदर पीडिता दहावीत असतानाच आरोपी शिक्षक राजकुमार गवरे याने 'तू मला आवडतेस, असे बोलला होता. त्यावर पीडित मुलीने त्याचवेळी 'सर, तुम्ही शिक्षक आहात, तुम्हाला असे म्हणणे शोभते का', असे म्हणाली होती. परंतु, ती पीडिता अकरावी शिक्षणासाठी लातूरला आली.

लातूरमध्ये ती दिसल्यानंतर आरोपी नराधम राजकुमार गवरे याच्यातला राक्षस जागा झाला. त्याने पीडितेसोबत पुन्हा ओळख वाढवत तिला जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. यातूनच त्याने त्या अल्पवयीन विद्यार्थिनीला मोबाईल भेट दिला. यातून आरोपी राजकुमार गवरे याने एका तिला अतिप्रसंग केला फूस लावून अल्पवयीन पीडितेवर सदर आरोपी अत्याचार करीत होता. मागील आठ दिवसांपूर्वी घरात आई वडिलांवर झाल्याने पीडित मुलगी रात्रभर घराबाहेर होती. त्यामुळे तिच्या आई-वडिलांच्या तक्रारीवरून शिवाजी नगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी राजकुमार गवरे याच्याविरोधात पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# औसा नगरपालिकेच्या मतमोजणीसाठी निवडणूक विभाग सज्ज

**सकाळी १० वा. पासून सुरुवात । ११ प्रभागाची ११ टेबलावर मोजणी । दुपारपर्यंत निकाल**

**तभा वृत्तसेवा,**

**औसा, दि. १९ डिसेंबर :** औसा नगरपालिकेच्या झालेल्या मतदानाची मतमोजणीस रविवार दि. २१ रोजी सकाळी १० वा.तहसिल कार्यालयातील प्रशासकीय इमारतीत सुरुवात होणार आहे.दुपारी १ वा. पर्यंत या निवडणुकीचे निकाल जाहीर करण्यासाठी प्रशासन व निवडणुक विभाग सज्ज झाला असल्याची माहिती निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार घनशाम अडसुळ यांनी दिली आहे.

औसा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची मतमोजणी रविवार २१ डिसेंबर रोजी होणार आहे. यासाठी लागणारी तयारी जवळपास पुर्ण झाली असून या निवडणुकीतील एकूण ११ प्रभागांसाठी स्वतंत्र ११ टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र टेबल ठेवण्यात आल्याने मतमोजणीची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होईल, असा विश्र्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

प्रभागनिहाय मतमोजणीच्या फेऱ्यांचेही निश्र्चित नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक ६ साठी ४ फेऱ्यांत मतमोजणी होणार आहे, तर प्रभाग क्रमांक ११ साठी सर्वाधिक म्हणजे ५ फेऱ्यांत मतमोजणी केली जाणार आहे. उर्वरित सर्व प्रभाग क्रमांकांसाठी प्रत्येकी ३ फेऱ्यांत मतमोजणी पूर्ण केली जाणार आहे. मतमोजणी प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या उमेदवारांच्या प्रतिनिधींसाठी स्पष्ट नियमावली जाहीर करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्रात प्रवेशासाठी अधिकृत पास आवश्यक असून, पासशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. नगरसेवक (सदस्य) पदाच्या प्रत्येक उमेदवाराला केवळ एकाच मतमोजणी प्रतिनिधीची परवानगी देण्यात आली आहे.

मतमोजणी केंद्रात सकाळी ९ वाजेपर्यंत प्रवेश करता येणार आहे.मतमोजणी सुरू होण्यापूर्वी सर्व प्रतिनिधींनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने मतमोजणी केंद्रात मोबाईल फोन नेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. केंद्रात प्रवेश करताना सर्वांची तपासणी केली जाणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. मतमोजणी दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित असावी. यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. प्रशासकीय अधिकारी, निवडणूक कर्मचारी आणि सुरक्षादल यांच्या समन्वयातून संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. पारदर्शक, शांततामय आणि नियमबद्ध मतमोजणी प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.तर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांना प्रत्येक टेबलवर एक अशा एकूण ११ मतमोजणी प्रतिनिधी नेमण्याची मुभा देण्यात आली आहे. यामुळे सर्व प्रभागांतील मतमोजणीवर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांचे थेट लक्ष राहणार आहे.

# १० वी, १२ वी बोर्ड परीक्षेवेळी सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** येऊ घातलेल्या नव वर्षात १० वी, १२ वीच्या बोर्ड परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले असले तरी यावेळच्या परीक्षेवेळी वर्ग खोल्यांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे अनिवार्य केले आहे. गतवर्षी बऱ्याच परीक्षा केंद्रांवर कॅमेरे बसविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आल्यावरून यावेळी सक्त ताकीद दिली आहे.

लातूर विभागीय परीक्षा मंडळा अंतर्गत नांदेड, धाराशिव व लातूर या तीन जिल्ह्यांच्या १०वी, १२वीच्या परीक्षा घेतल्या जातात. १०वीची परीक्षा ४५२ केंद्रांवर तर १२ वीची परीक्षा २०७ केंद्रांवर होणार आहे. लातूरच्या विभागीय परीक्षा मंडळाने १०वी, १२वी बोर्ड परीक्षेची जोरदार तयारी सुरू केली आहे. विद्यार्थी संख्या, कर्मचारी संख्या, पोलीस दल, भरारी पथके, कॉपीमुक्त परीक्षेची हल्ली तयारी सुरू असली तरी परीक्षेला आणखी दीड महिना आहे. या दीड महिन्यात परीक्षा मंडळाला सर्वतोपरी सज्जता ठेवावी लागणार आहे. गतवर्षी १०वी, १२वी परीक्षेवेळी कॉपी आढळलेली सुमारे १७ परीक्षा राज्य शासनाच्या निर्देशावरून रद्द केली. रद्द केलेल्या केंद्रांवरील विद्यार्थ्यांना तेथेच किंवा नजीकच्या केंद्रावर परीक्षा देण्याची सोय करण्याची नवी जबाबदारी परीक्षा मंडळावर आली आहे.

> येत्या फेब्रुवारी-मार्च महिन्यात होणाऱ्या १०वी, १२वी बोर्ड परीक्षेवेळी प्रत्येक परीक्षा केंद्राच्या वर्ग खोल्यांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य केले आहे. यासाठी शासनाने आर्थिक मदत केली नसली तरी केंद्र चालविणाऱ्या शाळांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत. लातूर मंडळा अंतर्गत नांदेड, धाराशिव, लातूर या तीन जिल्ह्यांत १०वी परीक्षेसाठी ४५२ तर १२वी परीक्षेस २०७ केंद्र असतील. आणखी परीक्षेची तयारी सुरू आहे. शेवटच्या तारखेपर्यंत परीक्षार्थींना अर्ज करता येणार आहे. परीक्षेसंदर्भात, शासनाकडून आणखी नवे नियम येऊ शकतात. त्याप्रमाणे मंडळ कार्यवाही करेल. **– सुधाकर तेलंग, अध्यक्ष, लातूर विभागीय**

परीक्षेवेळी कॉपीसारखा प्रकार होऊ नये म्हणून राज्य शासनासह परीक्षा मंडळ प्रयत्न करीत असले तरी अजून शंभर टक्के यश आलेले नाही. आता होऊ घातलेल्या १०वी, १२वी परीक्षेवेळी प्रत्येक केंद्राच्या वर्ग खोल्यांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य केले आहे. कॅमेरे बसविणे अनिवार्य केले असले तरी शासनाने त्यासाठी कुठली मदत केलेली नाही. गतवर्षी परीक्षा मंडळाच्या निरीक्षणानुसार ९५ टक्केच केंद्रांवर कॅमेरे बसविण्यात आले होते.

# दुसऱ्या अभिजात आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सवाचा समारोप

## 'ब्रम्हकमळ' सर्वोत्कृष्ट लघुपट – 'सुलतान' व 'डिअर टीचर' ला अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय पारितोषिक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** अभिजात फिल्म सोसायटी व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसऱ्या अभिजात इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचा पारितोषिक वितरण सोहळा प्रसिद्ध लेखक व कवी बालाजी सुतार यांच्या हस्ते पार पडला. वृद्धापकाळातील एका स्त्रीची भावनिक व तरल कथा असलेल्या 'ब्रह्मकमळ' या लघुपटास चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने दिला जाणारा सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच लघुपटाचे दिग्दर्शक आशुतोष जरे यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचाही पुरस्कार मिळाला. 'सुलतान' आणि 'डिअर टीचर' या लघुपटांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात आले. 'इन हाफ' या कलाकृतीस सर्वोत्तम ॲनिमेशनपटाचा पुरस्कार देण्यात आला तर 'वूमन ऑन फायर' या माहितीपटास सर्वोत्कृष्ट माहितीपट म्हणून गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या लेखक बालाजी सुतार यांनी लघुपटातून मांडल्या जाणाऱ्या गोष्टीला अधिक महत्व असल्याचे अधोरेखित करत कुठल्याही व्यावसायिक अपेक्षांचं ओझं नसलेलं लघुपट हे अतिशय नेमकं, प्रखर आणि गरजेचं माध्यम आहे असं मत व्यक्त केलं. तत्पूर्वी लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांनी महोत्सवास सदिच्छा भेट देत असताना लघुपट माध्यमातल्या कलात्मक दृष्टीकोनाबद्दल उपस्थित प्रेक्षकांशी संवाद साधला. विविध विषयावर संवाद साधण्यासाठी लघुपट हे अतिशय वेगवान आणि परिणामकारक माध्यम आहे हे सांगताना भविष्यात हा महोत्सव अजून मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहचावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सुमारे १२ देशातून आलेल्या १९ भाषांमधल्या निवडक १०० लघुपटांचे प्रदर्शन या महोत्सवात झाले. परिक्षक म्हणून ठाणे येथील संतोष पाठारे आणि नवी मुंबई येथील निलेश कुंजीर यांनी काम पाहिले. या कार्यक्रमास डॉ. मिलिंद पोतदार, प्रा. ओमप्रकाश झुरळे यांच्यासह अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, डॉ. विश्र्वास शेंबेकर, डॉ. स्वप्नील देशमुख, धनंजय कुलकर्णी, प्रा शिवशंकर पटवारी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तीन दिवस मेहनत घेणाऱ्या दयानंद महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजात फिल्म सोसायटीचे मधुसूदन कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ दुर्गा शर्मा यांनी केले.







**इतर विभागातले पुरस्कार याप्रमाणे आहेत :** सर्वोत्कृष्ट व्हिडीओ साँग कोलकतार पोरी (प्रथम), माझ्या गणा (द्वितीय). सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय लघुपट क्रेस्ट.

**सर्वोत्कृष्ट स्थानिक लघुपट :** भुताचं पत्र, सर्वोत्कृष्ट स्थानिक माहितीपट योगेश्वरी देवी, सर्वोत्कृष्ट स्टुडन्ट लघुपट एक्स एल १००, ज्यूरी अवॉर्ड दि फर्स्ट फिल्म, सिलेक्टर चॉईस सोच, ऑडियन्स चॉईस डिसकनेक्टेड, सर्वोत्कृष्ट अभिनेता कृष्णा यादव (उन्मेय), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री सुजाता देशपांडे (निरोप), सर्वोत्कृष्ट बालकलाकार सार्थक मसने (व्हॉइस ऑफ ओल्ड, ) सर्वोत्कृष्ट छायाचित्रण हृदय सोनवणे (ब्रम्हकमळ,) सर्वोत्कृष्ट संकलन राम पंडियन (सी यू टूमॉरो), सर्वोत्कृष्ट संवाद

मानसी मोरे, ओंकार मसुरकर, दुर्वा सावंत (ऑटोप्सी), सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शन अतुल लोखंडे (सुलतान), सर्वोत्कृष्ट माहितीपट (पर्यावरण) गटली मॅन, सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत अनिश बसु (दि अल्टर इको), सर्वोत्कृष्ट पटकथा केविन बी. (लंचबॉक्स), सर्वोत्कृष्ट सामाजिक लघुपट के. इनफ्लूवन्सर, सर्वोत्कृष्ट पोस्टर डिजाईन सुनीत वडके (द्वैत).



# 'मुक्तांगण'मध्ये वेळा अमावास्या सण उत्साहात

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये वेळा अमावास्या सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्या सुमेरा शेख यांनी पाच पांडवाचे पुजन करुन दर्शन घेतले. या प्रसंगी शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी वेळा अमावास्या सणाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

शेतात आल्यानंतर एका झाडाखाली पाच पांडव मांडतात. त्यांना चुन्याने रंगवतात. त्यावर कडब्याच्या पाच पेंढ्या उभ्या करून एक सुंदर कोप करतात. लाल शालीने ते बांधतातही. डालग्यातून साहित्य काढतात. पांडवासमोर हिरवे कापड ठेवून लक्ष्मीची पूजाही मांडतात. नैवेद्य म्हणून भजी, वांग्याचे भरीत, ऊस, पेरू, बोरे, शेंगदाण्याचे लाडू, आंबील, आंबटभात, ज्वारी आणि बाजरीचे उंडे ठेवतात. पांडवाची पूजा करतात. शेवटी नारळ फोडून अगदी साध्या पद्धतीने पूजा संपवतात. या निमित्ताने शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.